


# नवी मुंबई विमानतळ : आधुनिक तंत्रज्ञानाचे प्रतीक

**प्रगतीच्या वाटा**

**मुरलीधर मोहोळ**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे महाराष्ट्राच्या आणि संपूर्ण भारताच्या हवाई वाहतुकीच्या क्षेत्रात, एक क्रांतिकारी पायरी ठरत आहे. नवी मुंबईतील उलवे येथे उभारण्यात आलेला हा ग्रीनफील्ड प्रकल्प केवळ प्रवाशांसाठी नव्हे, तर राज्याच्या आर्थिक, औद्योगिक आणि पर्यटन विकासालाही गती देणारा ठरणार आहे. मुंबई महानगर प्रदेशातील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर झालेल्या वाढत्या गर्दी आणि जागेअभावी उड्डाणांना येणार्या मर्यादांमुळे, या प्रकल्पाची आवश्यकता निर्माण झालीच होती. मुंबईपासून सुमारे ३७ किमी अंतरावर स्थित हे विमानतळ ठाणे आणि रायगड जिल्ह्यांच्या जवळ असल्यामुळे, त्याचे भौगोलिक स्थानही अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे.

'नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड' (एनएमआयएएल) ही महाराष्ट्रातील नवी मुंबई येथील ग्रीनफील्ड आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची रचना, विकास, बांधकाम, कामकाज, देखभाल, व्यवस्थापन व विस्तार आदी कामांसाठी स्थापन करण्यात आलेली कंपनी (स्पेशल पर्पज व्हेइकल) आहे. हा संपूर्ण विमानतळाचा प्रकल्प 'मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेड' आणि 'सिडको' यांच्यातील सार्वजनिक-खासगी भागीदारीद्वारे (पीपीपी) उभारण्यात येत आहे.

विमानतळाची स्थापत्य रचना भारताच्या राष्ट्रीय पुष्प कमळावरून प्रेरित आहे. कमळाच्या पाकळ्यांसारखे उंचावणारे स्तंभ आणि भव्य छत या टर्मिनलला एक विशिष्ट ओळख प्रदान करतात. अंतिम टप्प्यात चार टर्मिनल्स तयार होतील, तर सुरुवातीला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय कामकाजासाठी एकत्रित टर्मिनल सुरू होईल. वर्षभरात २० दशलक्ष प्रवाशांची क्षमता या टर्मिनलमध्ये असणार आहे. भविष्यात ९० दशलक्षांपर्यंत तिच्यामध्ये वाढ होईल. विमानतळावर दोन समांतर धावपट्ट्या आहेत. प्रत्येक धावपट्टी ३ हजार, ७०० मीटर लांबीची आणि ६० मीटर रुंदीची आहे. यामुळे सर्व प्रकारच्या विमानांना सुरक्षित उड्डाणाची सुविधा मिळते. प्रवासी विमानांचे २४५ स्टॅण्ड्स, मालवाहू विमानांचे सात स्टॅण्ड्स आणि सामान्य उड्डानासाठी ७९ स्टॅण्ड्स या टप्प्यात असतील. यामुळे विमानांची पार्किंग क्षमताही मोठ्या प्रमाणात वाढते.

**बहुप्रतीक्षित आणि देशाच्या हवाई क्षेत्राला एक नवी उंची प्रदान करणारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे राष्ट्रार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले आहे. या विमानतळामुळे देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईनजीक हवाई वाहतुकीचा एक नवा पर्याय उपलब्ध होणार आहे. या विमानतळाची वैशिष्ट्ये, त्याची रचना या सर्वांचा आढावा...**

'एनएमआयएएल'ने कार्गो हाताळणी पूर्णपणे स्वयंचलित केली असून, प्रत्येक मालाची ट्रॅकिंग १०० टक्के करण्याची सुविधाही दिली आहे. औषधे, नाशवंत पदार्थ, धोकादायक वस्तू, मौल्यवान वस्तू आणि जिवंत प्राण्यांसाठी स्वतंत्र सुरक्षित व्यवस्था राबवण्यात आली आहे. मालवाहतुकीतील प्रक्रियेला तंत्रज्ञानाद्वारे अधिक सुरक्षित, जलद आणि विश्वसनीय बनविण्यासाठी, 'अर्ध-स्वयंचलित साहित्य हाताळणी प्रणाली' (एमएचएस) आणि ट्रक व्यवस्थापन प्रणालीचा वापर केला जातो. विमानतळामध्ये अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाची रचना करण्यात आली आहे. फाईव्ह-जी कनेक्टिव्हिटीमुळे डेटा-ड्रिव्हन टर्नअराऊंड सुधारणा केली जाते. ओळखपत्रे आणि बोर्डिंग पासची मानवरहित तपासणी, स्मार्ट बोर्डिंग आणि स्वयंचलित सामान हाताळणी प्रणाली प्रवाशांसाठी प्रवास अधिक सोपा व वेगवान करतात. तसेच, आयओटीवर आधारित रिअल टाईम देखरेख, भक्कम सायबर सुरक्षा आणि ॲव्हिओ इन-हाऊस ॲप या सुविधांमुळे, विमानतळाचे कामकाज अत्यंत कार्यक्षम बनते.

प्रवाशांसाठी सुविधा आधुनिक आणि सोयीस्कर आहेत. देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय फूड व बेव्हरेज सुविधा, किड्स प्ले झोन, सीआयपी लाऊंजेस, ट्रान्झिट हॉटेल्स आणि सामान सेवा उपलब्ध आहेत. डिजिटल टनेल्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि इंटरेक्टिव्ह अनुभवांमुळे, प्रवाशांना महाराष्ट्राच्या वारशाचा आणि संस्कृतीचा अनुभव मिळतो.

शुल्कमुक्त विक्रीसाठी आणि रिटेलसाठी मोठ्या जागा राखण्यात आल्या आहेत. तसेच, टर्मिनलमध्येही ११० रिटेल व एफअॅण्डबी दुकाने आहेत. यामुळे प्रवाशांचा अनुभव अधिकच समृद्ध होतो. विमानतळाचे नियोजन शाश्वततेच्या तत्त्वांवर आधारित आहे.

अंतिम टप्प्यात ४७ मेगावॅट सौरऊर्जा निर्माण केली जाईल. पाणी व्यवस्थापनासाठी वर्षाजल संचयन, पाणी पुनर्वापर आणि कमी प्रवाहाचे फिक्स्चर्स वापरले जातील. विमानतळ परिसरात इलेक्ट्रिक वाहनांचा वापर, ऑटोमेटेड पीपल मूव्हर्सद्वारे अंतर्गत वाहतूक आणि कमलाच्या स्तंभांच्या जाळीदार संरचनेमुळे, नैसर्गिक थंडावा निर्माण करण्याचे तंत्रज्ञान अंगीकारले गेले आहे. 'नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ' हा प्रकल्प फक्त प्रवासी आणि मालवाहतुकीसाठीच नव्हे, तर महाराष्ट्राच्या आर्थिक, औद्योगिक आणि पर्यटन विकासालाही गती देणारे 'ग्रोथ इंजिन' आहे. या विमानतळामुळे मुंबईवरील हवाई ताण कमी होईल, पुणे आणि पिंपरी-चिंचवडसह पश्चिम महाराष्ट्रातील नागरिकांसाठी प्रवास सोपा व वेगवान होईल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे हा प्रकल्प प्रत्यक्षात उतरला असून, महाराष्ट्राच्या आणि भारताच्या विकासाला नवे पंख देणारा ठरणार आहे. (लेखक केंद्रीय नागरी हवाई वाहतूक आणि सहकार राज्यमंत्री आहेत.)

# नव्या विश्वव्यवस्थेतील नवे नेतृत्व

**विशेष**

**प्रतिनिधी**

इंग्लडचे पंतप्रधान कीर स्टार्मर भल्या मोठ्या लवाजाम्यासह भारत दौर्‍यावर आले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत मुक्त व्यापार करार, तंत्रज्ञान आणि गुंतवणुकीवरील चर्चेला त्यामुळे गती मिळाली. शंभरपेक्षा अधिक सीईओ, उद्योजक आणि १४ विद्यापीठांच्या उपकुलगुरूंसह त्यांनी भारतात आगमन केले. भारतावर दीडशे वर्षे राज्य केलेला इंग्लंड आज भारतात येऊन सहकार्याचा हात पुढे करतो, हे नव्या भारताच्या आर्थिक ताकदीचे प्रतीक असल्याचे म्हणता येईल. भारत-इंग्लंड संबंधांचा प्रवास हा इतिहासाच्या पानांमधून वसाहतवादाच्या सावलीतून उभा राहिलेला आहे. शतकानुशतकांचे राजकीय व आर्थिक बंध आता नव्या वास्तवात रूपांतरित होत आहेत. ज्या इंग्लंडने भारतावर सत्ता गाजवली, त्या देशाचा पंतप्रधान व्यापार आणि तंत्रज्ञान सहकार्यासाठी भारतात येतो, हे परिवर्तन केवळ प्रतीकात्मक नाही, तर नव्या जागतिक सामर्थ्य संतुलनाचे द्योतक आहे. ही भेट म्हणजे, केवळ राजनैतिक औपचारिकता नसून, परस्पर आर्थिक भागीदारीच्या नव्या पायाभरणीचा क्षण आहे. व्यापार, तंत्रज्ञान आणि गुंतवणूक या तिन्ही क्षेत्रांमधून भारत-इंग्लंड संबंध नव्या व्यावहारिक आणि तांत्रिक सहकार्याच्या दिशेने प्रवास करीत आहेत.

स्टार्मर यांच्या भेटीतून भारताला होणारे फायदे म्हणजे उद्योग, रोजगार आणि तंत्रज्ञान असे ढोबळमानाने म्हणता येईल. भारत-इंग्लंड मुक्त व्यापार करार झाल्यास भारतीय उत्पादनांना साहेबांच्या देशात प्रवेशासाठी लागणारे शुल्क कमी होईल. औषधनिर्मिती, कृषी प्रक्रिया, ऑटोमोबाईल पार्ट्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि सेवाक्षेत्र या सर्व क्षेत्रांसाठी बाजार विस्ताराची मोठी संधी निर्माण होईल. विशेषतः सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (एमएसएमई) निर्यातीचा मार्ग खुला होईल, ज्यामुळे ग्रामीण आणि अर्धशहरी भागातील उद्योगांना नवसंजीवनी मिळेल. इंग्लंडकडे कृत्रिम बुद्धिमत्ता, बायोटेक्नोलॉजी, हरित ऊर्जा आणि अ‍ॅडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगमध्ये जागतिक अनुभव आहे. या क्षेत्रातील संशोधन सहकार्य आणि संयुक्त स्टार्टअप इनक्युबेशनमुळे भारतातील तांत्रिक क्षमतांमध्ये मोठी वाढ होईल. 'मेक इन इंडिया' तसेच, 'इनोव्हेट इन इंडिया' या उपक्रमांना इंग्लंडच्या गुंतवणुकीचा पूरक आधार मिळू शकेल. नव्या उद्योग गुंतवणुकीमुळे, उच्च तंत्रज्ञानावर आधारित लाखो नोकर्‍या निर्माण होऊ शकतात. इंग्लंडच्या प्रशिक्षण संस्थांशी भागीदारी करून कौशल्य विकास आणि व्यावसायिक शिक्षणाच्या नव्या अभ्यासक्रमांनाही गती मिळेल. यामुळे भारतीय तरुणांचा जागतिक रोजगार बाजारातील स्पर्धात्मक दर्जात वाढ होईल. इंग्लंडचे फिनटेक, बँकिंग आणि इन्शुरन्स क्षेत्र अत्याधुनिक आहे. भारताच्या डिजिटल पेमेंट क्रांतीशी यांची सांगड घातल्यास जागतिक दर्जाच्या सेवा आणि भांडवली प्रवाहासाठी नवे दार उघडेल. तेथून येणारा गुंतवणूक निधी भारतात प्रवेश करू शकेल, तर भारतीय नवोद्योगांना विदेशी फंडिंग सहजपणे उपलब्ध होईल. पंतप्रधान मोदी आणि कीर स्टार्मर यांचा संवाद हा दोन भिन्न ऐतिहासिक प्रवाहांना एकत्र आणणारा क्षण आहे. मोदींच्या 'आत्मनिर्भर भारता'च्या दृष्टीला इंग्लंडचे प्रगत तंत्रज्ञान परस्परपूरक ठरणार आहे. स्टार्मर यांनी भारताला जागतिक भागीदार म्हणून दिलेले महत्त्व, हे इंग्लंडच्या नव्या परराष्ट्र दृष्टिकोनाचे प्रतीक आहे. या चर्चेत ग्रीन एनर्जी ट्रान्झिशन, डिजिटल इकोनॉमी, आणि डिफेन्स मॅन्युफॅक्चरिंग या तीन क्षेत्रांनाही विशेष महत्त्व दिले गेले. भारतासाठी ही संधी केवळ व्यापारापुरती मर्यादित नाही; तर ती तंत्रज्ञानाच्या सहकार्याने स्वावलंबी औद्योगिक धोरणाला अधिक बळ देणारी आहे.



**एकीकडे अमेरिकेच्या अडेलतट्टू भूमिकेमुळे जागतिक अनिश्चितता वाढीस लागली असताना, इंग्लंडचे पंतप्रधान मोठ्या लवाजाम्यासह भारतभेटीवर आले. भारताबरोबरचा मुक्त व्यापार करार प्रत्यक्षात येण्यासाठी त्यांनी पंतप्रधान मोदींशी द्विपक्षीय चर्चाही केली. त्यामुळे नव्या विश्वव्यवस्थेतील नवे नेतृत्व म्हणून उदयाला आलेल्या भारताच्या आर्थिक प्रगतीचे द्योतक म्हणावे लागेल.**

युरोपियन बाजारपेठेपासून वेगळे झाल्यानंतर व्यापारातील अडथळे, उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि श्रमिकांची कमतरता यामुळे औद्योगिक उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. तेथील महागाई सातत्याने उच्च असून, जीवनावश्यक वस्तूंच्या किमती कडाडल्या आहेत. 'बँक ऑफ इंग्लंड'ला व्याजदर वाढवूनही चलनफुगवटा नियंत्रित करण्यात मर्यादित यश मिळाले, तर गृहनिर्माण बाजार मंदावला असून, ऊर्जा खर्चाने घरगुती अर्थसंकल्प कोलमडला आहे. हरितऊर्जा व डिजिटल परिवर्तनाच्या माध्यमातून इंग्लंडला विकासाचा नवा मार्ग शोधायचा आहे. सध्या दोन्ही देशांदरम्यान एकूण ५४.८ अब्ज डॉलर्सचा व्यापार होतो. त्यातून सुमारे सहा लाख लोकांना थेट व अप्रत्यक्ष रोजगार मिळतो. यात वस्तूंचा व्यापार २३ अब्ज डॉलर्स तर सेवांचा व्यापार तब्बल ३३ अब्ज डॉलर्स आहे. नुकताच झालेला 'कॉम्प्रिहेन्सिव्ह इकोनॉमिक अ‍ॅण्ड ट्रेड अ‍ॅग्रीमेंट 'दोन्ही देशांसाठी परिवर्तनकारी ठरलेले दिसून येते. या करारान्वये इंग्लंडला निर्यात होणार्‍या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील कर कमी करण्यात आले आहेत. यात सागरी उत्पादने, कापड, चामडे आणि प्रक्रिया केलेले अन्न यांचा समावेश आहे. या पार्श्वभूमीवर इंग्लंडचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांची भारत भेट विशेष महत्त्वाची ठरते.

भारताच्या वेगाने वाढणार्‍या अर्थव्यवस्थेचा भागीदार बनून इंग्लंड आपले व्यापार संतुलन मजबूत करू इच्छितो. भारतासाठी ही भागीदारी पश्चिमेकडील बाजारपेठेत सुलभ प्रवेश आणि गुंतवणुकीसाठीचा विश्वासार्ह मार्ग आहे. जागतिक व्यापारातील अस्थिरतेच्या काळात होत असलेला, भारत-इंग्लंड करार हा स्थैर्य, परस्पर विश्वास आणि दीर्घकालीन आर्थिक साखळीसाठी आवश्यक असाच आहे. विशेषतः अमेरिकी राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची भूमिका सातत्याने बदलत असून, दररोज नवनव्या घोषणा करण्याचा त्यांनी सपाटा लावला आहे. परिणामी, जागतिक अर्थव्यवस्था ही अत्यंत अस्थिर झाली आहे. अशा वेळी, इंग्लंड भारतासोबत येत, संपूर्ण जगाला त्याने एक निश्चित संदेश देण्याचे काम केले आहे. भारत-इंग्लंड व्यापार करार हा केवळ दोन देशांमधील आर्थिक करार नाही, तर इतिहासाच्या पुनर्लेखनाची नवी दिशा आहे. ज्या इंग्लंडने भारतावर सत्ता गाजवली, तोच देश भारताच्या उद्योग, तंत्रज्ञान आणि विकास प्रवासात सहकारी म्हणून सहभागी होत आहे, या करारातून निर्माण होणारी रोजगार संधी, तंत्रज्ञानाची देवाणघेवाण आणि गुंतवणुकीचा प्रवाह हे भारताच्या आत्मनिर्भरतेच्या प्रवासाला गती देतील. आज इंग्लंड भारताकडे केवळ बाजारपेठ म्हणून पाहत नाही, तर भागीदार म्हणून हात पुढे करत आहे. हेच नव्या विश्वव्यवस्थेतील भारताची भूमिका ही नेतृत्वाची असेल, ही बाब नेमकेपणाने अधोरेखित करणारे म्हणता येईल.

**अलीकडे पोलिसांकडून होणार्‍या एन्काऊंटरमध्ये अट्टल गुंडांचा अंत होण्याच्या घटना वाढल्या आहेत. सामान्य जनतेचा या एन्काऊंटरना पूर्ण पाठिंबा मिळत असतो. याचे कारण या गुंडांना न्यायालयात शिक्षा होतच नव्हती, उलट त्यांना जामिनावर मुक्त केले जात होते. त्यामुळे एन्काऊंटरमुळेच या गुंडांना न्याय मिळत असल्याची जनभावना निर्माण झाली. आता त्याच्या जोडीला बुलडोझरचा न्याय आला आहे. हे न्यायदान यंत्रणेचे सपशेल अपयश म्हणावे लागेल.**

# बुलडोझरचा न्याय!

**लक्ष्यवेध**

**राहुल बोरगांवकर**

देशाबाहेर गेल्यावर स्वदेशाविरोधात वक्तव्ये करण्याचा मक्ता फक्त राहुल गांधी यांनीच घेतला आहे, असे नव्हे. अलीकडेच भारताचे सरन्यायाधीश बी. आर. गवई यांनीही काहीसे असेच वादग्रस्त वक्तव्य केले होते. मॉरिशसमध्ये एका कार्यक्रमात भाषण करताना न्या. गवई म्हणाले की, भारतात न्याय राज्यघटनेद्वारे दिला जातो, बुलडोझरद्वारे नाही. न्या. गवई यांना बुलडोझरची आठवण होण्यामागे, त्यांच्या मनात असलेला अपराधीपणा होता. कारण, भारतात न्यायालयांकडून न्याय मिळत नाही, हे कटू सत्य आहे आणि न्या. गवई यांनाही ते मनोमन मान्यच आहे. पण, परदेशात भारताच्या न्यायप्रक्रियेचा मान राखणे त्यांचे कर्तव्यच होते. म्हणून त्यांनी असे वक्तव्य केले असावे. पण, थोडा विचार केल्यास बुलडोझरच्या कारवाईने न्यायालयांची थोडीफार तरी लाज राखली गेली आहे, ही गोष्ट न्या. गवई यांनी लक्षात घेतली पाहिजे.

भारतात आजही घटनेचे राज्य असून, राज्यघटनेने केलेल्या कायद्यांद्वारेच न्याय मिळतो हे खरे असले, तरी ते अर्धसत्य आहे. हा न्याय फक्त काही निवडक श्रीमंत, सत्तेशी निकटचे लागेबांधे असलेले नेते आणि काही प्रभावशाली वकील यांनाच मिळतो. सामान्य भारतीयाच्या हाती फक्त न्यायालयांकडून न्याय मिळेल, अशी आशाच करणेच बाकी आहे. त्यांच्या नशिबात फक्त 'तारीख पे तारीख' इतकेच लिहिले आहे. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांनी असंख्य खटल्यांमध्ये स्थगिती आदेश देऊन, हे खटले लटकावून ठेवले आहेत. काही महिनेच नव्हे, तर अनेक वर्षे होऊनही या खटल्यांवरील स्थगिती उठलेली नाही. त्याचप्रमाणे अनेक खटल्यांची सुनावणी पूर्ण होऊनही, न्यायालयांनी त्यावर आपला निकाल राखून ठेवला आहे. या प्रलंबित अवस्थेला कोण जबाबदार आहे? गेल्या काही वर्षांत पोलिसांकडून होणार्‍या एन्काऊंटरच्या घटनांमध्ये, मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. यातील काही एन्काऊंटर हे बनावट असल्याचे आरोपही झाले. पण, सामान्य माणसाकडून मात्र या एन्काऊंटरना पूर्ण पाठिंबा मिळत आहे. याचे कारण कितीही गंभीर गुन्हा केला असला, तरी त्या गुंडांना न्यायालयांकडून सरसकट जामीन मिळताना सामान्य माणूस पाहत होता. त्यांच्यावरील खटला न्यायालयात उभा राहणार कधी आणि त्याचा निर्णय येणार कधी, याची कसलीच शाश्वती नव्हती. इतकेच नव्हे, तर आतिक अहमद, मुख्तार अन्सारी यांच्यासारख्या माफियाप्रमुखांवरील खटल्याची सुनावणी करण्यास, अनेक न्यायाधीश तयार होत नसत. खटलाच उभा राहत नसल्याने त्यावर सुनावणी आणि साक्षीपुरावे होऊन त्याचा निकाल लागेल, (पान ४ वर)



# तुम-एक मारोगे, तो हम चार मारेंगे !

विश्वसंचार

**मल्हार कृष्ण गोखले**



१९३६ सालची गोष्ट. भारतीय क्रिकेट संघ इंग्लंडच्या दौऱ्यावर गेलेला होता. गबी ॲलन हा जलदगती गोलंदाज इंग्लंडचा कर्णधार होता. तो भयंकर शिवराळ होता. त्याच्या गोलंदाजीवर चौकार किंवा षटकार मारणाऱ्या फलंदाजाला तो बेधडक अत्यंत गलिच्छ शिव्या देत असे. यात दुहेरी उद्देश असायचा. एक म्हणजे 'माझ्या चेंडूवर चौकार मारतोस काय?' म्हणून सरळच शिवी घालणे. दुसरा वाकडा उद्देश म्हणजे, अशा शिव्या ऐकून फलंदाजाने भडकावे. त्याची एकाग्रता ढळावी. त्याने रागाने आडव्या बॅटने चेंडूला झोडपावे आणि त्यात त्याची विकेट पडावी. हा प्रयोग त्याने भारतीय फलंदाजांवरही सुरू केला.

महान भारतीय फलंदाज कर्नल सी. के. नायडू हे अत्यंत अनुभवी होते. ते अत्यंत शांत राहिले. पण दुसऱ्या बाजूला होता लाला अमरनाथ. सळसळत्या, उसळत्या रक्ताचा दणकेबाज फलंदाज. लालाने गबीच्या चेंडूवर खाडकन चौकार मारावा आणि गबीने शिव्यांची लाखोळी व्हावी, असे लागोपाठ दोनदा झाले. तिसऱ्यांदा लालाने एक जबरदस्त षटकार ठोकला. लगेच गबी ॲलनच्या तोंडाची गटारगंगा वाहू लागली.

लालाने आपल्या जागेवरूनच गबीच्या दुप्पट आवाज चढवून चौपट शिव्या घातल्या. मात्रा अचूक लागू पडली. गबी गप्प बसला. परत त्याने तोंड उघडले नाही. नॉन स्ट्रायकर एंडला उभे असलेल्या सी. के. नायडूंना हसू आवरता आवरता पुरेवाट झाली. लक्षात घ्या. ते १९३६ साल होते. एका गुलाम भारतीयाने इंग्लंडच्याच भूमीवर इंग्लंडच्या खुद्द कप्तानाला भर मैदानावर शिव्या घालणे, हे सोपे साहस नव्हते. खरी मज्जा तर पुढेच आहे. तंबूत परतल्यावर भारतीय संघातल्या सहकारी

खेळाडूंनी लालाला विचारले, 'पण तू काय बोललास त्याला?' त्यावर लाला उतरला, 'हे बघा मित्रांनो, मला काही तुमच्या इतके फाडफाड इंग्लिश येत नाही. तो समोरून घाणेरड्या शिव्या देतोय, एवढेच मला कळले. मला काही इंग्लिश शिव्या येत नाहीत. मी त्याला माझ्या मातृभाषेत, पंजाबीत, चांगल्या अस्सल आणि कचकचीत शिव्या हासडल्या.

तो गप्प बसला.' सी. के. नायडू सर्वांना म्हणाले, 'बॉईज, यावरून महत्त्वाचा धडा घ्या. तुमची भाषा, तुमचे शब्द, यापेक्षा तुमचा आवेश समोरच्याला बरोबर समजतो.' दॅट इज द स्पिरिट! १९७५ सालचा अत्यंत गाजलेला चित्रपट 'शोले.' नुकतीच त्याची पन्नाशी साजरी झाली. 'मॅग्निफिसन्ट सेव्हन' आणि 'वन्स अपॉन अ टाईम इन द वेस्ट' या दोन वेस्टर्न चित्रपटांकडून मुख्यतः शोले उचललेला आहे. पण इतरही अनेक वेस्टर्न चित्रपटांमधली छोटी-छोटी दृश्ये त्यात फार खुबीने बसवलेली आहेत. तसाच एक प्रसंग- रामगढ गावचा एक तरुण पोरगा (अभिनेता सचिन) गब्बर सिंगच्या हातात सापडतो.

गब्बर त्याला ठार मारतो. घोड्यावरून त्याचे प्रेत रामगढला पाठवतो आणि बरोबर चिठ्ठी पाठवतो की, वीरू आणि जय (अनुक्रमे धर्मेंद्र आणि अमिताभ) यांना माझ्या ताब्यात द्या. नाहीतर मी संपूर्ण रामगढ गाव बेचिराख करून टाकेन. त्यावर वीरू आणि जय मोठ्या युक्तीने आणि बहादुरीने गब्बरच्या चार गुंडांना ठार मारतात आणि पाचव्या जखमी गुंडाबरोबर गब्बरला चिठ्ठी पाठवतात- 'तुम एक मारोगे, तो हम चार मारेंगे.फ दॅट इज द स्पिरीट! १९२१ सालानंतरचा काळ. पॅलेस्टाईन हा प्रदेश तुर्कस्तानच्या साम्राज्यातून काढून इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतला.

राजकीय भाषेत त्याला म्हणायचे- 'ब्रिटिश प्रोटेक्टोरेट.फ या भागातले स्थानिक लोक होते पॅलेस्टाईनी अरब. प्रख्यात ज्यू नेते डेव्हिड बेन गुरियान यांनी ही संधी झडप मारून उचलली. ते स्वतः जेरुसलेमला आले आणि देशोदेशींच्या ज्यू धर्मीयांना आवाहन केले, 'या आणि आपल्या पूर्वजांच्या या पवित्र भूमीत स्थायिक व्हा. १८०० वर्षांनंतर ज्यू लोकांना त्यांच्या पवित्र मायभूमीत परतण्याची संधी मिळाली आहे. ती सोडू नका.' त्यांच्या या आवाहनामध्ये फार मोठे भवितव्य दडलेले होते.

जेव्हा केव्हा इंग्रज हा प्रदेश सोडतील, त्यावेळी या भूमीत ज्या समुदायाची लोकसंख्या जास्त असेल, तोच समुदाय या भूमीचा सत्ताधारी होईल. आज या भूमीत अरब जास्त आहेत. त्यांच्यापेक्षा ज्यूंची संख्या जास्त झाली तरच १८०० वर्षांनंतर ज्यूं ना त्यांच्या मूळ भूमीत राज्य करता येईल. देशोदेशींचे मुख्यतः युरोपीय देशांमधले ज्यू समूह मोठ्या संख्येने पॅलेस्टाईनमध्ये येऊन भडकू लागले. अरबांना हे इंगीत कळल्यावर त्यांनी सरळ-सरळ सशस्त्र दंगे सुरू केले. बेन गुरियान यांना हे अपेक्षितच होते. त्यांनी अरबांना त्यांच्याच भाषेत उत्तर द्यायला सुरुवात केली.

त्या काळात घडलेली एक घटना. मुसलमानांना स्त्री ही उपभोगाची वस्तू वाटते. ते स्त्रीला 'माणूस नव्हे तर 'वस्तू' समजतात. जेरुसलेममध्ये रोज नवीन येऊन थडकणाऱ्या युरोपीय गोऱ्या ज्यू महिला पाहून अरबांच्या तोंडाला पाणी सुटले. अगदी लाळ गळून वाळवंटात झिरपू लागली.

जेरुसेलमच्या रस्त्यांवर ज्यू महिलांची छेडछाड झाल्याच्या तक्रारी वाढू लागल्या. विषय बेन गुरियान यांच्यापर्यंत पोचला. त्यांनी नवागत ज्यू महिलांपैकी काही निवडक बायका उचलल्या. त्यांना हत्यारे चालवण्याचे प्राथमिक शिक्षण दिले आणि सांगितले, 'छेडछाड झाली तर बेधडक ही हत्यारे चालवा. ब्रिटिश पोलिसांचे काय ते आम्ही पाहू.' आणि मग जेरुसलेमच्या रस्त्यांवर अरबांचे बारा-पंधरा मुडदे पडले. फार नाही, बारा-पंधराच. ताबडतोब लंपटपणा आटोक्यात आला.

गोरी चामडी बघून तोंडातून गळणारी लाळ, तोंडातच जिरली. दॅट इज द स्पिरिट! इथे लगेचच स्पष्ट करतो की, ही घटना मला कोणत्याही पुस्तकात, चरित्रात, इंटरनेटवर मिळालेली नाही. ज्याचे नातेवाईक आता इस्रायलमध्ये स्थायिक झालेत, अशा एक मराठी ज्यू माणसाकडून मी ती तोंडी ऐकलेली आहे. म्हणजेच ऐतिहासिक शास्त्रीयदृष्ट्या ती विश्वसनीय नाही, असे म्हणता येईल. नसेलसुद्धा विश्वसनीय कदाचित. पण तिच्यातला आवेश, ते स्पिरीट महत्त्वाचे आहे. ७ ऑक्टोबर २०२३ चा दिवस. संपूर्ण इस्रायल देश

दुसऱ्या दिवशी असणाऱ्या 'सिम्हथ तोराह' या ज्यू धर्मीय सणाच्या तयारीत मग्न होता. गाझापट्टीजवळच्या रीम या परिसरात 'सुपरनोव्हा सुक्कोथ गॅदरिंग' या नावाचा भव्य संगीत जलसा सुरू होता. किमान ३ हजार ज्यू नागरिक तिथे संगीताचा आस्वाद घेत होते. अचानक 'हमास' या अरब अतिरेकी संघटनेचे २५०० कडवे दहशतवादी रीमवर तुटून पडले. बेछूट, अंदाधुंद गोळीबार करत त्यांनी किमान १४०० लोकांना ठार मारले. गाझापट्टी आणि इस्रायल यांच्या सरहद्दीवरच्या नेटिव्ह-हा-असरा, बीरी, होलित, कफ्र आझा आणि नीर ओझ या ज्यू गावांवर ५००० अग्निबाणांचा वर्षाव करण्यात आला.

पाठोपाठ अतिरेक्यांनी तिथे प्रत्यक्ष आक्रमण करून असंख्य लोकांना ओलिस धरले. स्त्रियांवर अत्याचार करून त्यांना ठार मारण्यात आले. लहान मुलांचे शिरच्छेद करण्यात आले. गर्भवती स्त्रियांची पोटे फाडून त्यांचे गर्भ बाहेर ओढून काढून, त्या स्त्रिया आणि ते गर्भ यांच्या माना चिरण्यात आल्या. ही बातमी येताक्षणी इस्रायली संरक्षण मंत्र्याने संपूर्ण गाझापट्टीला वेढा घातला आणि जाहीर केले, 'गाझापट्टीत जाणारी वीज, पाणी, अन्नधान्य, औषधे, माणसे सर्व काही बंद. आम्ही माणसाचे देह असणाऱ्या जनावरांशी लढत आहोत.'

येत्या ७ ऑक्टोबरला या घटनेला दोन वर्षे पूर्ण होतील. गाझापट्टीत घनघोर युद्ध सुरूच आहे. इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी कुणाच्याही दबावाला जराही भीक न घालता गाझापट्टीतल्या हमासच्या लोकांना रगडून काढणे जारीने चालू ठेवले आहे.


गेल्या दोन वर्षांच्या या संघर्षात इस्रायलचे नागरिक आणि सैनिक मिळून सुमारे दोन हजार लोक ठार झालेत. शिवाय २५१ लोक अजूनही हमासच्या ताब्यात ओलिस आहेत तर गाझापट्टीतल्या अरबांचे नागरिक आणि सैनिक मिळून ८८ हजार लोक ठार झालेत. म्हणजे हे प्रमाण एकास चार नव्हे, तर एकास चव्वेचाळीस पडते. ३० सप्टेंबर २०२५ या दिवशी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प तात्या यांनी हमाससमोर २० कलमांचा एक शांतता प्रस्ताव ठेवला आहे. आता निर्णय हमासने घ्यायचा आहे. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

सुखात्म

**डॉ. अविनाश मोहरील**

# त्याला आनंद होईल म्हणून...



मला हे अजिबात पटत नाही. माझे मत याबाबत अतिशय ठाम आहे. श्रद्धा असणे ठीक आहे, पण त्या श्रद्धांचे अशा पद्धतीने सादरीकरण मला मान्य नाही. या सर्व गोष्टींमुळेच आपला धर्म बदनाम होतो. अकारण देवाच्या भोवती निर्माण केलेली ही अंधश्रद्धेची वलयं नव्या काळात थोतांड वाटू लागतात आणि मग लोक देवाच्या पवित्र भावनेशी जोडण्यापेक्षा त्यापासून दूर जाऊ लागतात.

साधारण १७-१८ वर्षांपूर्वी शिमल्याला एका उद्बोधन वर्गासाठी गेलो असता त्या वर्गातील एका देबोजीत नावाच्या बंगाली मित्रासोबत मी तावातावाने श्रद्धा आणि अंधश्रद्धा या विषयावर वाद घालताना हे सारे बोलत होतो. त्या चर्चेमध्ये मी त्याला म्हणालो होतो की, श्रद्धा असावीच; कारण या सबंध विश्वाला संचालित करणारी एक अतर्क्य आणि असीम शक्ती कार्यरत आहे, जी उर्जेच्या स्वरूपात कार्य करते. परंतु त्या शक्तीला आपल्याला प्रत्यक्ष बघता येत नाही म्हणून त्याची वेगवेगळी रूपे परमेश्वर या संकल्पनेतून आपल्यासमोर मांडल्या गेली आहेत. शिवाय समूह श्रद्धेच्या सहवासाने ती ऊर्जा आपल्याला मानसिक बळ देत राहते आणि म्हणूनच देवांची आणि मंदिरांची निर्मिती करण्यात आली. मनोधैर्य टिकवून ठेवण्यासाठी याची फार आवश्यकता असते. कारण माणसाचे प्रयत्न बरेच वेळा फारच थिटे पडतात, तेथे त्याचे मनोबल वाढविण्याकरिता अशा संकल्पनांची गरज असतेच. या सर्व संकल्पना मनोधैर्य वाढविण्याच्या कामात येतात तोपर्यंत सारे ठीक असते. परंतु याला जोडल्या जाणाऱ्या अंधश्रद्धांची जेव्हा माणसाला भीती दाखविली जाते,

प्रकोप आणि अवकृपा यासारख्या बाबी समोर करून सामान्य माणसाची गळचेपी केली जाते त्यामुळे तो असहाय होतो व अंतिमतः तो त्या संकल्पनांपासूनच तुटून जातो. हे बरोबर नाही. निदान शिक्षित माणसांनी देवाच्या या संकल्पनांना योग्य पद्धतीने समजून घेऊन त्याचा संतुलित व सामंजस्यपूर्ण पद्धतीने वापर करावा. त्यामुळे हातात बांधायचे गंडे- दोरे याला काही अर्थ आहे का? या संकल्पनाच मुळात अशा एका ऊर्जास्रोताची प्रतीके आहेत, ज्याला आपल्याला बघता येत नाही तर केवळ अनुभवता येते. जो विचारी आहे त्याने तरी अशा प्रतीकांच्या आड पाळल्या जाणाऱ्या अंधश्रद्धांना खतपाणी घालू नये. आपल्याही भूमिका बदलतात. त्यामुळे त्याच माझ्या मित्राकडून आलेले एक पाकीट व त्यातील एक गोष्ट मला ते सारे आठवून गेली. माझ्या त्या श्रद्धांबद्दल तावातावाने मांडलेल्या मतानंतर त्याने मांडलेले मतही मला आठवले. तो म्हणाला होता, अविनाश तू म्हणतोस ते काही प्रमाणात बरोबर आहे.

प्रत्येक माणसाची मानसिक स्थिती ही वेगवेगळी असते. परमेश्वराची ही सारी रूपे एका मोठ्या एनर्जी सोर्सचीच रूपे आहेत म्हणूनच यांची आवश्यकता आहे. पण या पद्धतीने तार्किक विचार करून जीवन जगणारे सर्वच लोक असतील असे नाही. प्रत्येकाची जडणघडण वेगळी असते. तुझ्या आई-वडिलांनी तुला एक अत्यंत सुरक्षित व संस्कारी वातावरण प्रदान केले म्हणून तुझ्यामध्ये हा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळेच तुला देवासमोर केवळ हात जोडले तरी चालून जाते. परंतु, माझ्यासारख्या मुलाला ज्याची आई मी दोन वर्षांचा असताना मला सोडून गेली, वडिलांनी दुसरे लग्न केले. सावत्र आई मला त्या घरी टिकू देईना. मग मामाकडे राहून शिक्षण झाले. तेथेही फार काही चांगले वातावरण नव्हते. त्यामुळे कायम एका असुरक्षिततेच्या सावलीखाली मी मोठा झालो. ज्या वयात तुला आई-वडिलांचा भरभक्कम पाठिंबा मिळाला. त्यामुळे तुला हातात दोरे बांधावे लागले नाही. त्याच वयात मी मात्र असुरक्षित व भित्रा बनलो. त्यावेळी माझ्या गावाच्या मंदिरात त्या पुजाऱ्याने माझ्या हातावर बांधलेला धागा मला बळ देत होता.

माझ्या परीक्षा चांगल्या जात होत्या. हे सारे विचार त्या कोवळ्या वयात माझ्या मनावर इतके जास्त कोरले गेले की, मला आता त्याबाबत तर्क करता येत नाही. कळते पण वळत नाही. वेगवेगळ्या मनःस्थिती असतात रे. एकाचा तर्क दुसऱ्याला बरेच वेळा लागू पडत नाही. मला मान्य आहे की, बरेच वेळा या अंधश्रद्धांमुळे फसवणूक होते. किंवा काही मंडळी याचा गैरफायदा घेतात. सर्वच धर्मांमध्ये हे होते; तरीदेखील या गोष्टी कमी होत नाहीत. याचे कारणच हे आहे की, जसे जसे आपण विकसित होऊ तसे तसे आपण विज्ञानाच्या आहारी जाऊ व ते आहारी जाणे आपल्याला एका बाजूने सक्षम बनवेलच. दुसऱ्या बाजूने आपल्या मनाची हतबलता वाढवत नेईल आणि आपण आजच्या पेक्षाही जास्त असुरक्षित राहू. ती असुरक्षितता वेगळ्या प्रकारची असेल, पण हे सारे कमी होणार नाही. त्यामुळे मला माझ्या हाताला हा धागा बांधून जर मानसिक बळ प्राप्त होते आहे तर मग तू कशाला विरोध करतोय? त्यावर मी परत काहीतरी बोललो होतो, कारण मला ते मान्यच नव्हते.

परंतु आज त्याने पाठविलेले पाकीट उघडल्यावर जी गोष्ट मला दिसली ती हातात घेतल्यावर मला त्याच्या त्यावेळच्या वक्तव्याला फक्त विरोध करण्यापेक्षा त्याच्या बाजूनेही विचार करता येऊ शकतो, ही शक्यता जाणवली. कदाचित १८ वर्षांत माझ्या विचार प्रक्रियेत झालेल्या बदलामुळे असेल, परंतु मी त्याची बाजू समजून घेता येऊ शकतो, या निर्णयाप्रत आलो होतो. पाकिटातील त्या वस्तूकडे बघत मला ते सारे काही आठवले. त्या वस्तूसोबत माझ्या मित्राने सोबत लिहिलेल्या छोट्याश संदेशामुळे मी विचारात पडलो. त्याने लिहिले होते, प्रिय अविनाश, नुकतेच भूतानला जाण्याचा योग आला. तेथे एका मॉनेस्ट्रीमध्ये गेलो तर मला तेथील धर्मगुरूंनी ही गोष्ट दिली. ते म्हणाले की, तुमच्या मनात याक्षणी ज्या तुमच्या जवळच्या व्यक्तीचे नाव येत असेल त्याला ही द्या. कसे ठाऊक नाही, परंतु मला तू आठवलास. तुझ्यासाठी म्हणून मी हे मुद्दाम पाठवतोय. तुझे विचार मला आठवतात; तरीसुद्धा जर तू याचा स्वीकार केला तर मला आनंद होईल. चिठ्ठीच्या घडीच्या आत एक मनगटावर बांधायचा मण्यांचा बँड होता. आजपासून १८ वर्षांपूर्वी मी असा एखादा बँड हातात आल्याबरोबर फेकूनच दिला असता. आता मात्र मी त्याकडे बराच वेळ बघत राहिलो. माझ्या मित्राने मला ते पाठविण्यामागची भावना माझ्या मनाला स्पर्शून गेली व माझ्या मित्राला आनंद होईल म्हणून मी तो बँड माझ्या मनगटावर बांधला. जीवन जगत असताना आपण आपल्याला येणाऱ्या अनुभवांमुळे, आपल्या वाचनामुळे व आपल्यावरील संस्कारांमुळे आपल्या जीवनाची चौकट आखत असतो व त्यानुसार जगत असतो. परंतु आपल्याला समाजात वावरायचे असेल व लोकांना आपल्या आयुष्यामध्ये सुरेख मैत्रीपूर्ण नात्यांमध्ये बांधून ठेवायचे असेल तर मात्र आपल्याला या चौकटी लवचीक ठेवाव्या लागतात. त्यावेळी आपल्याला ती विचार चौकटीची लवचीकता उपयोगात येते. याच्याही पुढे जाऊन आपल्याला काही गोष्टी पटल्याच नाही तरी केवळ जवळच्या व्यक्तीला आनंद होईल म्हणून करण्यातही मोठा आनंद असतो, हा अनुभव तो बँड हातावर बांधताना मला मिळाला. माझ्या हाताला त्याने पाठविलेला बँड बांधलेला फोटो त्याला पाठविल्यानंतर त्याला झालेला आनंद त्याच्या फोनवरील आवाजावरून जाणवत होता. मला नाही पटत आणि त्यामुळे मी करणार नाही असे म्हणून तोडून टाकण्यापेक्षा, मला पटत नाही, परंतु तुला आनंद मिळत असेल तर मी करीन, असे म्हणून जोडण्याचा प्रयत्न कधी कधी करायला काय हरकत आहे?

---

संस्कारांच्या देशा

**रमा गोळवलकर**

# कृतज्ञता आणि सन्मान - ३

# भूमी आणि जलपूजन

ज्या भूमीवर आपला वावर आहे, आपलं अस्तित्वच जिच्या आधाराशिवाय अशक्य आहे अशा भूमीविषयी वाटणारा विश्वास भारतीय मनाचा एक कोपरा व्यापून आहे. प्रतिदिनी तिच्यावर उभं राहण्याआधी तिची क्षमायाचना करणाऱ्या श्लोकाची उकल आपण या आधीच्या भागात केलेलीच आहे. पण आपल्या संस्कृतीत कोणतं ही शुभ कार्य सुरू करताना ते भूमीच्या ज्या भागावर करायचं आहे, त्याचं भूमिपूजन करण्याची एक विलक्षण परंपरा आहे. मग ते वास्तूचा पाया किंवा विहीर खणण्याची सुरुवात असो, उपनयन, विवाहादि संस्कार असो की गणपती, नवरात्र वा सत्यनारायणाची नैमित्तिक पूजा असो सर्वात आधी होतं ते भूमिपूजन. जी धारण करते ती धा, धरणी, धरित्री, धारयित्रि, धरती अशा एकाच अर्थाची अनेक नावं असलेल्या पृथ्वीला आवाहन करून अर्घ्य पाद्य गंध अक्षत फूल अर्पण करून तिचा सन्मान केला जातो.

आपण भारतीय भूमीला सजीव अस्तित्व मानतो. तिच्यावर आईसारखंच, आईइतकंच प्रेम करतो. नांगरण्यानं चरे पडून तिला त्रास होत असणार याची आपल्या सुप्त मनाला जाणीव असते; पण पर्याय नसतो. मग शेतीच्या कोणत्याही कामाला सुरुवात करताना कृतज्ञतापूर्वक नमन केलं जातं. विदर्भात उन्हाळ्यात केल्या जाणाऱ्या पूजेला उन्हाळवाही म्हणतात तसंच शेतातच एका दगडाला शेंदूर लावून सगळ्या शेताचं प्रतीक म्हणून नागपंचमी, पोळा इत्यादी सणांना पूजन केलं जातं.

जलपूजन



अनेकदा या दगडांची संख्या दोन किंवा तीन ही असते. त्यांना रानजाई, वनजाई अशा नावानं संबोधतात. त्यांचा वास शेताची सीमा निश्चित करणाऱ्या बांधावर म्हणजे धुऱ्यावर असतो. शेतीच्या संरक्षक देवता म्हणून त्यांची पूजा केली जाते. काही शतकं लोटल्यानंतर त्याच जागेवर एखादं राऊळही उभं राहतं. सधन भाविक, मूळ दगडांच्या स्थानाशेजारीच देवीची सुघड मूर्तीदेखील स्थापन करतात.



भूमिपूजन

अनेकदा त्या जमिनीवर उगवलेली झाडंझुडुपं काढून टाकावी लागतात. अनेकदा ती समतल करावी लागते तर कधी तिच्यात भर घालावी लागते. काहीही केलं तरी तिथे माजलेलं रान त्यावर वस्तीला असलेले किडे-मुंग्या, कृमी-कीटक, जीव-जंतू, पक्षी-प्राणी इत्यादींचं आयुष्य उद्ध्वस्त होणारच असतं. हे भूमिपूजन करत असतानाच त्या सर्वांची अनुमती मागावी, त्यांना ते स्थान सोडून जाण्यासाठी विनवावं, थोडा वेळ वाट पाहावी आणि नंतरच पहिली कुदळ मारावी असं शिल्पशास्त्रविषयक ग्रंथात सांगितलेलं आहे.

एकूण या सगळ्या परिसरात वस्तीला असलेल्या सगळ्या स्थूल सूक्ष्म जिवांना कमीत कमी त्रास व्हावा ही मनोमन इच्छा व्यक्त करून मगच आपण ती जागा वापरावी असा दंडक आहे. हा संस्कार पिढ्यान्‌पिढ्या आपल्या मनावर इतका बिंबला आहे की सनातनी भारतीय सहसा कोणावर आक्रमण किंवा कोणाच्या भूमीवर अतिक्रमण करत नाही. जलस्रोतांचं महत्त्व पूर्वापार चालत आलेलं आहे. त्यामुळे विहीर असो की शेततळ, कासार म्हणजे दगडी बांधणीचा तलाव, पावसाचं पाणी साठून तयार झालेलं तळं, तडाग (क) म्हणजे नदीवर बांध घालून तयार केलेला जलसंचय, सरोवर अर्थात भूमीतून झरे स्रवणारा मोठा जलाशय, ओहोळ, झरी, झरे बंधारे, त्यातून झुळझुळ वाहणारं ते सलील, नदी किंवा नदाचं ते वारी, समुद्राचं ते अंभ आणि आकाशातून पडतं ते तोय ही सारीच जलतत्त्वाची रूपं. जागोजागी त्यांचं पूजन करण्याची परंपरा पूर्वी प्रचलित होती.

आजही राजस्थान, हरयाणाचा काही भाग आणि गुजरातच्या वाळवंटी भागांत राहणारे लोक त्यांच्या घरच्या मंगलकार्याची सुरुवात वैशिष्ट्यपूर्ण पद्धतीनं केली जाते. पाण्याचा अभाव असल्यानं त्यांच्या कुटुंबातल्या, सख्याशेजारणी सर्व सुवासिनी सजून धजून बाजा-गाज्यासह जलस्रोताच्या 'जलवा' पूजनाला जातात. तोच विधी आपण कलश पूजनानं करतो. तांब्याच्या किंवा चांदीच्या गडूत पाणी, दुर्वा, सुपारी, हळकुंड, नाणं, त्यातून बाहेर येणारी आंब्याची सदाहरित पानं आणि त्यावर पोटात पाणी असलेला नारळ या समग्र संचाला कलश ही संज्ञा आहे. कलश पूजन हे याच जलस्रोत पूजनाचंच स्वरूप आहे. समुद्र किनारी राहणारे आणि मासेमारी उपजीविका असलेले कोळी, नौकानयन करणारे नाविक, समुद्रापार व्यापार करणारे व्यापारी, आरमार ही सगळी मंडळी समुद्राची पूजा करून वरुणदेवानं रक्षण करावं असं विनवून मगच आपल्या नौका समुद्रात लोटतात.

वैदिकांनी हा वरुण देव सर्वप्रकारच्या जलस्रोत आणि जलनिधींचा अधिपती असून हा अनुबंधाचा म्हणजे कराराचा देव असल्याचं प्रतिपादित केलेलं आहे. पुराणांत हाच वरुण पश्चिम दिशेचा दिग्पाल म्हणूनही दायित्व निभावत असतो. त्यानं आपलं कल्याण करावं म्हणून वेदांत प्रार्थना केली आहे- 'शं नो वरुणः!' भूमीप्रमाणेच नदीही माताच आहे. तिच्या काठी वसलेली गावं आणि नगरं तिच्याच पाण्यावर पोसली जातात. या जगाच्या पाठीवर कुठेही नाही अशी स्वर्गातून पृथ्वीवर अवतरलेली गंगा ही नदी तर महाभारतात साक्षात गंगादेवी म्हणूनच भेटते. भारतीय उपमहाद्वीपात वाहणाऱ्या सगळ्या लहान-मोठ्या नद्यांचं माहात्म्य सांगणाऱ्या स्वतंत्र कहाण्या आहेत. त्यांचे त्यांचे उत्सव आहेत. त्यातून त्यांचं दैवी असणं अधोरेखित करत त्यांचं पावित्र्य जपण्याचा कसोशीचा प्रयत्न होत असे. पण औद्योगिकीकरणाच्या रेट्यात पैशाला सर्वस्व मानणारे भांडवलदार आणि तथाकथित पुरोगामित्वाच्या खुळखुळा वाजवणारे डाव्या विचारसरणीचे सगळे बुद्धिवादी, जमीन आणि पाण्याकडे केवळ संसाधन म्हणजे रिसोर्सेस म्हणूनच बघतात.

अंधश्रद्धा निर्मूलनाच्या नावानं लोकांच्या मनातल्या चांगल्या श्रद्धा ध्वस्त करण्यात आल्यात. आदराची भावना लुप्त होऊन ओरबाडणं सुरू झालं. परिणामी उरलं ते फक्त आणि फक्त प्रदूषण! या सगळ्याचा मथितार्थ एवढाच की, आपण भारतीय आपलं जीवन समृद्ध करणाऱ्या भूमी आणि जलाविषयी पूर्वीच्याच श्रद्धा आणि आपले संस्कार जपलेत तर हे प्रदूषणाचे सगळेच प्रश्न आपोआप सुटतील. शरद ऋतूची नवलाई असलेल्या कोजागरी पौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

# शब्द खेळांचे सांगती अर्थ



## उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

बुद्धिबळ म्हणजे डावपेचांचं युद्ध. केवळ बुद्धीचं नव्हे, तर मनाच्या स्थैर्याचंही आव्हान. नुकत्याच झालेल्या जागतिक महिला बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या दिव्या देशमुख हिने जगज्जेतेपद पटकावून हे सिद्ध केलं. विशेष म्हणजे, तिच्या समोर होती कोनेरू हम्पी- तिच्यापेक्षा दुप्पट वय असलेली एक दिग्गज खेळाडू, जागतिक अनुभव असलेली बुद्धिबळपटू. ती तर वयाच्या १५ व्या वर्षीच ग्रँडमास्टर ठरली होती. शिवाय आधी ग्रँडमास्टर मिळवलेल्या हरिका आणि आर वैशाली या बुद्धिबळपटू देखील ग्रँडमास्टर किताब पटकावलेल्या. अशा प्रसंगी अनेक नवोदित खेळाडूंना दबाव झेपत नाही. पण दिव्यानं मात्र पूर्ण शांतपणे, एकेक चाल अत्यंत तटस्थतेने आणि विचारपूर्वक खेळली.

तिच्या प्रत्येक डावात दिसत होतं ते तिचं डोकं शांत ठेवणं आणि परिस्थिती समजून घेऊन, तिचा आदर करत पुढचं पाऊल उचलणं. गेल्या वर्षी बुद्धिबळात जगज्जेतेपद मिळवणारा गुकेश दोमाराजू हा देखील असाच एक नवोदित गुणी खेळाडू. त्याचं वय फक्त १८ वर्षे होतं. या सगळ्या तरुण आणि नवोदित खेळाडूंमध्ये आढळतो तो मनाचा निर्धार, परिस्थितीचं कोणतंही दडपण येऊ न देता खेळण्याची वृत्ती, अपार जिद्द आणि मेहनत! हे खेळाडू आपल्याला जीवन जगताना उपयोगी पडेल असा महत्वाचा संदेश खेळता खेळता सांगून जातो. खेळ म्हणजे केवळ बुद्धिबळाच्या पटावरील नसतो, क्रिकेटच्या मैदानावरील नसतो, जीवनात देखील नियतीने असा पट मांडलेला असतो, पीच असते आणि त्यावर तुम्हाला खेळावेच लागते. गुकेश किंवा दिव्या यांनी अत्यंत कमी वयात त्यांच्या अंगी असलेल्या ज्या परिपक्वतेचे दर्शन घडवले आहे, तिचा उपयोग आपल्याला आपल्या जीवनातही करून घेता येऊ शकतो.

तुमचा निर्धार पक्का असेल आणि डोळ्यासमोर ध्येयाचा अढळ ध्रुवतारा असेल तर लक्ष्य गाठणे अशक्य नाही हेच या युवा खेळाडूंनी आपल्या खेळातून सिद्ध केले आहे. मग तुमच्या समोर असलेला प्रतिस्पर्धी किती बलाढ्य आहे हे गौण ठरते. या स्पर्धेतील विजयानंतर दिव्याने जी प्रतिक्रिया दिली ती विचारात घेण्यासारखी आहे. ती म्हणाली, इतरांचे ऐकू नका. केवळ आपल्या पालकांचे ऐका. दुसरी गोष्ट म्हणजे आपलं लक्ष्य उच्च ठेवा आणि ते गाठण्याचा प्रयत्न करा. दिव्याच्या लोभस व्यक्तिमत्वाची विनाकारण चर्चा करून इतरत्र लक्ष वळवणाऱ्या युवा खेळाडूंना तिने स्पष्ट शब्दात सुनावले आहे. महिला बुद्धिबळपटूंच्या खेळाची चर्चा करावी. 'दिसण्या 'ची करू नये. तिच्या खेळाबरोबरच तिच्या या शब्दांनी उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी मला विराट कोहलीच्या शब्दांची आठवण होते. भारताने विराटच्या नेतृत्वाखाली जिंकलेला २०२४ चा वर्ल्ड कप अजूनही सर्वांच्या स्मरणात ताजा आहे. प्रसंग अत्यंत आणीबाणीचा होता. भारत यावेळी पराजयाच्या वाटेवर होता. दक्षिण आफ्रिका जिंकण्याच्या निर्णायक स्थितीत होती. पण शेवटच्या पाच षटकात विजयाचा घास भारतीय संघाने त्यांच्या तोंडून काढून घेतला. त्या वेळची भारतीय खेळाडूंची मनःस्थिती आणि विराट कोहलीने व्यक्त केलेली प्रतिक्रिया आपल्याला खूप काही सांगून जाणारी आहे. त्या ऐतिहासिक क्षणी विराट कोहलीने जेव्हा यशाचं रहस्य विचारल्यावर *Prv yoru head down and rerebt the rirvation* असं सांगितलं, तेव्हा त्या एका वाक्यानं संपूर्ण जीवनाचं सार व्यक्त झालं आहे असं मला वाटतं. आपलं डोकं शांत ठेवा आणि समोर असलेल्या परिस्थितीचा आदर करा.

डोकं खाली ठेवणं म्हणजे अहंकार बाजूला ठेवणं, भावनांचं वादळ आवरणं आपलं मन स्थिर ठेवणं. विचलित न होणं. परिस्थितीचा आदर करणं म्हणजे विपरीत परिथतीतही मन शांत ठेवून त्या परिस्थितीला धैर्याने सामोरे जाणे. संकटासमोर झुकून नाही, तर समजून उभं राहणं. अशा वेळी परिस्थिती समजून घेणं, उपलब्ध पर्याय तपासणं, स्वतःच्या ताकदीचं आणि मर्यादांचं भान ठेवणं आणि मग कृती करणंया गोष्टी महत्वाच्या ठरतात. हा प्रवास- शांततेतून सजगतेकडे नेणारा असतो. भारतीय क्रिकेटमध्ये असे विराटसारखे अनेक खेळाडू होऊन गेले, ज्यांनी फक्त खेळ नाही, तर आयुष्याचं तत्त्वज्ञानही शिकवलं. त्यांचं जीवन, त्यांचे विचार हे विराटच्या वाक्याचं मूर्तिमंत उदाहरण आहे. संयम आणि सातत्याचं प्रतीक असलेला राहुल द्रविड म्हणतो, *You don't lê for the browd; you lê for the bounrry.* द्रविडने कधीही आवाज न करता, शांतपणे आपलं काम केलं. *'The Wall'* या टोपणनावाला सार्थ ठरवत, त्याने प्रत्येक बॉलला आदरानं सामोरं जात संयम टिकवला. त्याचं फलंदाजीतील स्थैर्य हेच *Prv yoru head down...* या विचाराचं उदाहरण ठरतं.

१९८३ च्या वर्ल्ड कपमध्ये कोणी भारताला गांभीर्यानं घेत नव्हतं. पण कपिल देवने परिस्थिती समजून घेत, आत्मविश्वास आणि सकारात्मक दृष्टिकोन ठेवत इतिहास घडवला. त्याचं धैर्य आणि मनोबल हे आपल्याला शिकवतं की संघर्षाच्या क्षणी डोकं शांत ठेवणं म्हणजे पराभव स्वीकारणं नव्हे - ते यशाची पूर्वतयारी असते. कपिल देव आपल्याला सांगतात *Poritive thinking ir not ewebting the bert r| haen every time, brv abb{eting that whatever haenr ir for the bert.* प्रत्येक वेळी आपल्याला अपेक्षित असेच घडेल असं नाही. पण आपले ध्येय साध्य करण्यासाठी जे काही घडेल त्याचा स्वीकार करून आपल्याला पुढे जायचे असते. तंत्रशुद्ध खेळणे, आत्मनियंत्रण आणि धैर्य किंवा संयम या गुणांसाठी ज्यांचा गौरव केला जातो, अशा गावस्कर यांनी फास्ट बॉलर्ससमोरही तंत्र आणि संयम यांच्या आधारावर फलंदाजी केली. परिस्थिती कितीही कठीण असली, तरी डोकं शांत ठेवून प्रत्येक चेंडूला सामोरं जाणं हेच त्यांचं वैशिष्ट्य होतं. ते म्हणतात, *To be rubberrful, you need r| be at eabe with yorruelf.*

सुनील गावस्कर यांनी गायिलेलं 'या दुनियेमध्ये थांबायला वेळ कोणाला? हे जीवन म्हणजे क्रिकेट राजा हुकला तो संपला...' हे गाणं प्रसिद्ध आहे. जीवनाच्या मैदानावर फलंदाजी करत असताना समोरून संकटाची भेदक गोलंदाजी तुमच्यावर मारा करत असते. अशावेळी सावध राहायचे असते कोणतीही संधी हुकू द्यायची नसते. जो हुकला, तो संपला. चातुर्याने आपली खेळी करायची असते असाच संदेश गावस्कर या गीतातून आपल्याला देतात. तर ज्याला क्रिकेटचा देव म्हटले जाते अशा सचिन तेंडुलकरचे खेळासंबंधीचे विचार अत्यंत मननीय आहेत. तो म्हणतो... माझ्यासाठी, क्रिकेट हा फक्त खेळ नाही, तर ती माझी 'पूजा' आहे. प्रत्येक खेळाडूने आपल्या देशासाठी आणि आपल्यासाठी सर्वोत्तम देण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. अपयश आले तरी खचून न जाता, त्यातून शिकून पुढे जायला पाहिजे. कठोर परिश्रम आणि समर्पण यांमुळे यश निश्चित मिळते. तुम्ही जे काही करता, त्यात १००% द्या. आपण शांततेनं विचार केला तर आपल्याला असं आढळून या सगळ्या खेळाडूंनी या सगळ्या प्रतिक्रिया खेळाच्या संदर्भात व्यक्त केलेल्या असल्या तरी आपल्या जीवनात देखील त्या अत्यंत उपयोगी आणि मार्गदर्शक आहेत. खेळातील हे नियम जीवनात देखील लागू होतात. जीवनाच्या क्रीडांगणावर अनेक आव्हानांना सामोरे जाताना अनुभवी आणि यशस्वी खेळाडूंचे हे शब्द आपल्याला 'मंत्र' म्हणून उपयोगी पडतील.

अनेक महान व्यक्तींनी संकटांच्या प्रसंगी आपले डोके शांत ठेवून कार्य केले आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्णांना सुद्धा कालयवनासारख्या महाबलाढ्य शत्रूसमोर माघार घ्यावी लागली होती. छत्रपती शिवाजी महाराजांसमोर औरंगजेबासारख्या बलाढ्य शत्रूचे आव्हान होते. काही प्रसंगी त्यांना दोन पावले मागे यावे लागले, प्रसंगी तह करावा लागला, पराक्रमाने हाती आलेले किल्ले सोडावे लागले. पण आपल्याला आढळेल की त्यांनी अशाही परिस्थितीत आपले डोके शांत ठेवले आणि आपले ध्येय दृष्टीआड होऊ दिले नाही. समोर आलेल्या परिस्थतीचा स्वीकार करून पुढील नियोजन केले. लोकमान्य टिळक, स्वा. सावरकर यांनी स्वातंत्र्यासाठी अनेक हालअपेष्टा सोसल्या, तुरुंगवास सोसला पण खचले नाहीत. डॉ आंबेडकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे यांची उदाहरणे आपल्याला हेच सांगतात.

तणाव टाळा असं सांगणं सोपं आहे. पण तणावाला समजून घेणं आणि त्याचं रूपांतर प्रेरणेत करणं हे कष्टसाध्य आहे. तेच यशाच्या वाटेचं खर्या अर्थानं दार उघडतं. आणि ही गोष्ट प्रयत्नाने जमू शकते. (पान ६ वर)



## पावलो विसावा । तुझ्या कृपे

जीवाचे ह्या हाल । झाले रात्रंदिन ।।
तुझेच चिंतन । मन करी ।।१।।

संसाराचे सुख । नाथाने दावीले ।।
जगणेच झाले । दिव्य लेणे ।।२।।

व्यसनाचा संग । कधी न जडला ।।
म्हणूनी भेटला । ज्ञानदेव ।।३।

तृप्त झालो आज । भजनात तुझ्या ।।
अंतरात माझ्या । तुकाराम ।।४।।

मागणे न आता । नाही तुज देवा ।।
पावलो विसावा । तुझ्या कृपे ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## कान्हुला..!

गायीच्या पावलांनी आली आली संध्याकाळ
सांजावले वो गोकुळ डोळ्यामधे ।।
येग तू ग गाई तुझ्या पुढ्यात वासरू
नको गे विसरू माझ्या कान्हुल्याला ।।
येग तू ग गाई चरून रानोरानी
वाट पाहे मनोमनी कान्हा माझा ।।
गाईच्या हंबराला आलं वासरू हुंदडू
आला धावू दुडुदुडु कान्हुला गं ।।
झुरू मुरू झुरू दुधाच्या ग धारा
गाईला हिरवा चारा कान्हा देतो ।।
गायक्या रे दादा तुझी घुंगराची काठी
हाती दुधासाठी वाटी कान्हुल्याच्या ।।
गायक्या रे दादा तुझ्या घोंगडीची चिंधी
कपिलीच्या पायामधी बांधजो गा ।।
गायक्या रे दादा गाईला घेजो पागा
दुधासाठी त्रागा कान्हुल्याचा ।।
दुधाच्या रेशीमधारा भरली चर्वी काठोकाठ
कान्हा मुडपतो ओठ दुधासाठी ।।

प्रज्ञा बापट

# इकडे आड तिकडे विहीर

## कोणे एके काळी

स्वाती काळे (कोलारकर)

काही मंदिरे दूर वेशीवर गूढस्थ उभी असतात. इतिहासाचा जीर्ण महापुरुष त्यांना वाचू शकत नाही. बघू शकत नाही. समजू शकत नाही. पण ती मंदिरे मात्र त्यांच्या अढळ अविचल गूढ अस्तित्वाने आजूबाजूच्या वृक्षवेलींनासुद्धा मोहवून टाकतात. अशा मंदिरांच्या अस्तित्वाने बाजूला शांत वाहणारी नदी उचंबळून वर येते. सूर्याची किरणे परतीची वाट धरताना अडखळतात. अशा मंदिरांची शिखरे विसावतात क्षितिजावर, पण प्रतिबिंब मात्र आवारातल्या विहिरीतच पाहतात. लहानपणी आजीचा पदर धरून मंदिरात जायचे आणि मागच्या पायऱ्यांच्या बाजूला मंदिराला बिलगून उभी असणारी विहीर निरखताना कधी संध्याकाळ व्हायची कळायचं नाही. मंदिराचे गोविंद पुजारी सांगायचे की, विहिरीत लक्ष्मी राहते. पाण्यामधून हळूच डुबुक डुबुक आवाज करीत कासव वरती तोंड काढायचं आणि गोविंद पुजारी हात जोडायला सांगायचे.

महाराष्ट्रात मध्ययुगीन यादव कालखंडात मंदिरांची उभारणी मोठ्या प्रमाणात झाली. इ. स. ९ वे शतक ते १२ वे शतक भक्तिरसाने चिंब भिजलेला कालखंड आहे. या शतकांमध्ये अनेक मंदिरांची उभारणी झाली; त्याचबरोबर गावांची गरज म्हणून विहिरीही खोदल्या गेल्या. या प्राचीन बारवांच्या जन्मकहाण्या अभ्यास करण्यासारख्या आहेत. बारवांसोबतच कुंड, कल्लोळ, तीर्थ या त्यांच्या भावंडांनाही समजून घेणे गरजेचे आहे. हे सर्व बारवांचेच लहान-मोठे भाऊ आहेत. आपल्या संस्कृतीचे हे प्राचीन अवशेष थेट आपल्या पूर्वजांशी नाते सांगतात.

गोदावरी, चंद्रभागा, तापी नद्यांच्या काठी मंदिरे वसली आणि सुंदर घाट बांधले गेले. याच ठिकाणांवर मोठमोठी तीर्थक्षेत्रे नावारूपाला आली. त्र्यंबकेश्वर, परळी वैजनाथ, औंढा नागनाथ, माहूर, तुळजापूर, कोल्हापूर या ठिकाणी कुंडे, कल्लोळ आणि विहिरींची मोठ्या प्रमाणावर निर्मिती झाली. त्या कायम स्वच्छ राहाव्यात, त्यांचे पावित्र्य टिकावे, त्यांचा नेहमी वापर व्हावा या दृष्टीने कुंडांच्या बाबतीत पाप-पुण्याच्या संकल्पनाही जोडण्यात आल्या. कुंडात स्नान केल्याने असाध्य रोग बरे होतात अशा अनेक समजुती रूढ आणि दृढ झाल्या.

पंचोपचार पूजा, अष्टभोग यासाठी लागणाऱ्या अनेक गोष्टींमध्ये मंदिरातील बारव महत्त्वाचा भाग होती. शिवमंदिरात अखंड जलाभिषेक असतो. त्यासाठी बारव निर्मिती झाली. अंबरनाथ, त्र्यंबकेश्वर या प्राचीन शिवमंदिरांमध्ये तर गर्भगृहातच जलाभिषेकासाठी प्रणाल बांधून स्वतंत्र व्यवस्था केली आहे. मंदिर वास्तूच्या पावित्र्यासाठीही मंदिरालगतची लहान आड निर्माण करण्यात आली. देवदेवतांसाठी अंगभोग आणि रंगभोग महत्त्वाचे मानले जातात. अंगभोगात जलस्नान महत्त्वाचे आहे.

रंगभोगात सभामंडपातील रंगशिळेवर गावातील कलावंतांचे नृत्यगायन व्हायचे. पुजारी, नृत्यांगना, आचारी, पाणके, गवळी, माळी अशी एक छोटी वसाहतच मंदिराच्या परिसरात राहायची. वसाहतीसाठी पाणी आवश्यक असतेच. त्यामुळे बारवांचा विकास मंदिरांसोबत आपोआपच झाला. लोणार सरोवर उल्कापातामुळे निर्माण झाले. येथेही अनेक विहिरी खणल्या गेल्या. तेथील लिंबी बारवेला 'वायुतीर्थ' म्हणतात.

असे म्हणतात की, चित्रसेन राजाची कन्या नंदा श्वानमुखी होती. तिला गतजन्माच्या पापापासून मुक्ती मिळविण्यासाठी येथे तप करावे लागले. येथेच सूर्यनारायण प्रसन्न झाले आणि तिला मुक्ती मिळाली. तेथील 'सासू-सुनेची' विहीरही फार प्रसिद्ध आहे. तिच्यात गोडे आणि खारे पाणी दोन्हीचे साठे आहेत.





लोणारची पाण्याची पातळी खाली गेल्यावर ही सासू- सुनेची विहीर दिसते. वाशीममध्ये 'वत्सगुल्म माहात्म्य' यात अनेक वैशिष्ट्यपूर्ण बारवांचे आणि तीर्थांचे उल्लेख येतात. पद्मतीर्थ ही अष्टकोनी पोखरण तसेच दारिद्र्यहरण तीर्थ, तारातीर्थ, लक्ष्मणतीर्थ, कोटीतीर्थ या पावन तीर्थांची वर्णने वाचताना आपण प्राचीन काळात हरवून जातो.

महाराष्ट्रात विहिरींचे बरेच प्रकार आपल्याला बघायला मिळतात. एक दार असलेली वापी म्हणजेच विहीर. एका बाजूनेच जिच्यामध्ये प्रवेश करता येतो ती पायविहीर. या पायविहिरीचेही बरेच प्रकार महाराष्ट्रात आढळतात. वर्तुळाकार, चौरस, अष्टकोनी विहीर असे अनेक प्रकार आहेत. नांदेडमधील कंधार तालुक्यात एक फार जुनी चौरस विहीर आहे. तिला 'खासबावडी' म्हणतात.

राष्ट्रकुल राजा कृष्ण तिसरा याच्या काळातील शिलालेख या विहिरीजवळ सापडला होता. लहानपणापासून नेहमी कुतूहल वाटायचं की, 'इकडे आड तिकडे विहीर'चा अर्थ काय असेल. ढोबळ मानाने दोन्हींकडून सारखीच संकटे असा या म्हणीचा अर्थ असावा. पण आड आणि विहीर या दोन्हींमध्ये फरक आहेच.

विहिरीला एका बाजूने प्रवेशमार्ग असतो. आडाला प्रवेशमार्ग नसतो. आकाराने बारव जर लहान असेल तर तिला 'कल्लोळ' म्हणतात. कुंडासारखाच पण थोड्या मोठ्या स्वरूपात असणारा कल्लोळ मंदिराच्या समोरच असतो. 'पोखरणी' म्हणजे चारी बाजूंनी बांधलेले तळे किंवा जलाशय. कमी खोलीवर प्रशस्त भाग तळाशी ठेवून पोखरणीचे बांधकाम होते. पोखरणीला कमी उंची असते. तिला पूर्वीच्या काळी 'पुष्करणी' म्हणायचे. मुंबईत वाळकेश्वर मंदिराच्या समोर 'बाणगंगा' नावाचा जलाशय आहे. असं म्हणतात की, परशुरामाने येथे बाण मारून गंगा निर्माण केली. एक आख्यायिका अशीही आहे की, प्रभू रामचंद्र वनवासात असताना त्यांना तहान लागली तेव्हा त्यांनी बाण मारून येथे गंगा उत्पन्न केली. म्हणून या तलावाला 'बाणगंगा' म्हणतात. बाणगंगा तलावाला पोखरणी किंवा पुष्करणी असे आपण म्हणू शकतो.

रामटेक येथील 'सिंदूरवावी' प्रेक्षणीय आहे. पुष्करणीच्या आकाराची ही प्रशस्त बारव आहे. तिच्या एका बाजूला थोरला मंडप आणि खाली उतरण्यासाठी लगतच पायऱ्या आहेत. 'कापूरवावी' ही पण चौकोनी आकाराची पुष्करणी आहे. हिच्या तिन्ही बाजूला मंडप बांधला आहे आणि समोरच्या मंडपामध्ये तीन लहान गाभारे तर आहेच; वरती शिखरही दिसते. 'सिंदूरगिरी' स्थलमाहात्म्यामध्ये या दोन्ही बारवांची मनोहर वर्णने वाचायला मिळतात. विदर्भाचे वैशिष्ट्य म्हणजे सगळ्या वाकाटककालीन प्राचीन वसाहती जलाशयांभोवतीच वसलेल्या होत्या. पोखरणीपेक्षा मोठा जलाशय आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी आहे. अशा जलाशयाला 'तडाग' म्हणतात. नैसर्गिक वाहून येणारे पाणी अडवून बंधारा बांधायचा. जो तलाव तयार झाला त्याला तडाग म्हणायचं.

नांदेडमधला 'जंगतुंग तलाव' असाच प्राचीन तडाग आहे. १० व्या शतकात राष्ट्रकूट राजा कृष्ण तिसरा यांनी बांधलेला तडाग आजही दुथडी भरून जनसामान्यांना आशीर्वाद देतो आहे. पाण्याभोवती वसाहती वसल्या. पाण्याने मनुष्याला जीवन दिले. त्यामुळे आपल्या पूर्वजांनी पाण्याला पवित्र मानले. तीर्थस्वरूप मानले. तीर्थ म्हणजे पवित्र जागा. काही विहिरींनाही तीर्थ समजण्यात येते आणि मोठमोठ्या सरोवरांनाही तीर्थस्वरूप मानून तेथे स्नान केल्यास साता जन्मांची पापे धुवून निघतात. ऋग्वेदात तीर्थाचा अर्थ नदीमधून चालत येण्याचा मार्ग असा होतो. महाभारतात तीर्थाचा संबंध यज्ञविधींशी जोडला आहे.

पुष्कर जम्बुमार्ग, रुद्रकोटी, संकुकर्णेश्वर, कुरुक्षेत्र या तीर्थांवर अश्वमेध यज्ञ झाल्यावर चांगली फळे मिळतात, असे महाभारतात उल्लेख आहेत. प्राचीन काळी तीर्थांवर यज्ञविधी करण्यासाठी शेकडो कारागीर तैनात असायचे. आर्थिक दृष्टीने विचार केल्यास यज्ञविधी म्हणजे वर्णव्यवस्थेतील सर्वांचीच पोटाची सोय होती. ज्या नदीकाठी तीर्थे वसायची तेथे सतत वर्दळ असायची. महाभारतातील अंबा सुडाग्नीने होरपळत भीष्मवध करण्याची प्रतिज्ञा करते तेव्हा भीष्माची माता गंगा हिला अतीव दुःख होते.

ती अंबेला टोचून बोलते की, 'अंबे, तू नदी होशील, पण तुझ्या काठी वसलेली तीर्थे निर्मनुष्य असतील. म्हणजेच तू कोणाचे पोट भरू शकणार नाही. तुझ्या काठावर कारागिरांचा राबता राहणार नाही.' पाणी आणि अर्थव्यवस्था यांचं असं हे प्राचीन नातं आहे. कोणत्याही तीर्थावर गेलं तर तेथे कुंड असतेच. कुंड म्हणजे स्नानासाठी बांधलेला मोठा हौद. यातही बारवसारख्या पायऱ्या असतात. महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन कुंड उस्मानाबाद जिल्ह्यात तेर येथे आहे. हे कुंड बांधण्यासाठी त्या काळात भाजक्या विटांचा वापर केला गेला होता. विदर्भातही मांढळ येथे सापडलेले चौथ्या शतकातील कुंड विटांचे आहे.

महाराष्ट्रात विहिरीची स्वामिनी म्हणून ओळखली जाणारी 'पुतळा बारव' बुलढाण्याच्या दक्षिणेला ६४ किलोमीटर अंतरावर आहे. विहिरींच्या शिल्पनिर्मितीची शिरोमणी म्हणजे पुतळा बारव. मधोमध चौरस कुंड आणि त्यानंतर उमलत्या कमळाप्रमाणे तिचे पसरत जाणे सर्वच फार विलोभनीय आहे. संरक्षक भिंत उभारताना एक गजथर उभारून त्यावर मुख्य देवतांसाठी स्वतंत्र असे देवकोष्ट ठेवले आहेत. असे वाटते की देवदेवता, देवांगणा, असुर, देवता परिवार एकाच मंदिरात नांदत आहेत.

पायऱ्यांवरील नक्षी, योद्धे, नृत्यांगना अप्रतिम कोरले आहेत आणि त्यामुळे पुतळा बारव महाराष्ट्रातील विहिरींची स्वामिनी ठरते. मुंबईजवळच्या वसई जिल्ह्यात अजूनही प्राचीन विहिरी बघायला मिळतात. खालचे झरे बंद होऊ नये म्हणून तळाशी लाकडे ठेवण्यात येतात. विहिरीचे झाकणही लाकडाचेच असते. त्यामुळे विहिरीचा संपूर्ण भार जमिनीवर कधीच येत नाही. विहिरीत खांब टाकले जातात. दोतेरी किंवा टोकेरी रहाटाला पर्शियन व्हील म्हणतात. चाकाला चक्र लावले जाते त्याला 'दभडा' म्हणतात. दभड्यावर केळीपासून बनलेला ताग म्हणजेच दोरखंड लावतात आणि त्यावर मातीच्या गाडग्यांची बांडी लावतात. काही विहिरी बांधलेल्या नसत. जलसाठ्यासाठी गड्डे खोदलेले ते 'बावखले' असायचे. या बावखल्यांमुळे जमीन बारमाही ओलसर राहायची.

यादवकाळानंतर महाराष्ट्रात राजकीय आक्रमणाबरोबरच सांस्कृतिक आक्रमणदेखील झाले. असंख्य मंदिरे तोफेच्या तोंडी उद्ध्वस्त झाली. त्यातील मूर्ती उद्ध्वस्त केल्या गेल्या. पण वाऱ्याच्या झुळकीबरोबर दुपारचे मंद डुलणारे विहिरीतले पाणी मात्र शाश्वत राहिले. काही प्राचीन बारवा भग्न अवस्थेत का होईना, पण अजूनही माणसाची मायेने सोबत करीत गावच्या वेशीवर वाटसरूंची तहान भागवतात. बहिणाबाई चौधरी विहिरीचे रसाळ वर्णन करीत जीवनाचे अद्भुत सार सांगतात-

**'वेहिरीत दोन मोटा, दोन्हीमधी पाणी एक,**
**आडोयालो कना चाक, दोन्हीमध्ये गती एक।'**

महाराष्ट्रातील प्राचीन बारवा आपल्या संस्कृतीचे भग्न अवशेष आहेत, पण त्यांची जपणूक करणारे हात कोण जाणे कुठे हरवलेत.

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# शरदातल्या चंदेरी आकाशाचे रुपेरी कवडसे

फार पूर्वी ग्रामीण भागात कणगीच्या मागे लपून बसल्यावर एखादी लहान बालिका खूप वेळ झाला तरी कोणी आपल्याला पकडू शकले नाही म्हणून गालातल्या गालात हसताना ते हसू तिच्या पोटातून बाहेर पडते आणि मग ती पकडली जाते असा काहीसा खेळ ढगा आड लपाछपी खेळणाऱ्या चांदण्या खेळत असाव्यात असे वाटते. एखादी चांदणी ढगा आडून बाहेर पडताना जेवढी सुंदर दिसते त्याहीपेक्षा ती चांदणी मागे असल्यावर त्या काळा ढगाची रुपेरी कडा जास्त आकर्षक असते.

आकाशात वेड असलं की, शरद ऋतू एवढा निर्मल दिलासा देणारा ऋतू कोणताच नसतो. हैदराबादला तारांगण पहिल्यापासून आकाशाचे वेड मी बऱ्यापैकी जपले होते. डीएड कॉलेजला असताना वस्तीगृहात बाहेर पटांगणात लाकडी कॉट टाकून त्यावर सताड उघड्या डोळ्यांनी आकाशाकडे टक लावून पडणे. आकाशात दिसणारे मृग नक्षत्र, त्या मृगाची शिकार करण्यासाठी टपलेला व्याध, कधी या चांदण्याच्या समूहाला जोडून मिथुन, मीन, मकर किंवा कर्क अशा राशीसमूह शोधणे हा एक आवडता छंद होता. आकाशात राशी शोधणे आणि वर्तमानपत्रात राशी वाचणे हे दोन आवडते छंद त्या काळात अनेकांना असायचे. पुढे मोबाईल नावाच्या छोट्याशा राक्षसाने आकाशात राशी समूह शोधण्याचा छंद खाऊन टाकला आणि वर्तमानपत्रातील राशी भविष्य वाचण्याचा आनंद अनेक पमधून धुळीत मिळवला. तसा राशिभविष्य वगैरेचा धुराळा मला जास्त चिटकला नाही मात्र आकाशातील चांदण चुरा अजूनही मला खुणावत राहत. शालेय जीवनात असताना खाट टाकून पटांगणात झोपलेले असताना आकाशात एखादा तारा तुटला की तो तारा कुठे पडला असेल? आता पृथ्वीवर कोठे लोणार सारखे सरोवर तयार झाले असेल? असे प्रश्न पडायचे.

पुढे महाविद्यालयीन जीवनात आकाश न्याहाळताना आवर्जून तुटलेला तारा पाहण्याची इच्छा असायची मात्र तोपर्यंत या तुटलेल्या तार्याचे संदर्भ बदललेले होते.

**तूटा सितारा तो मांगा था रबसे तुझको जानेजहाँ, जो तूट जाये तारे तमाम मागू यही एक दुआ...**



**काळ्याभोर आकाशाच्या विस्तीर्ण पटावर टिपूर चांदणं हसायला लागलं की, शरद ऋतू आपल्या दारात उभा राहिल्याची जाणीव होत. आषाढ श्रावण, भाद्रपद या महिन्यातील मेघाच्छादीत आकाश निरभ्र होऊन आकाशातल्या चांदण्या, नक्षत्र आपल्या संपूर्ण तेजाने पेटून आपले अस्तित्व या सृष्टीला दाखवू लागतात ते शरद ऋतूमध्येच, मध्येच एखादा ढग पुन्हा आपल्या मस्तीत येऊन आकाशात डोकावला तरी नभो मंडलातल्या चांदण्यांना आता त्याचा त्रास होत नाही. उलट त्या ढगांच्या मागे लपाछपी खेळणाऱ्या निरागस बालिकाप्रमाणे त्या ढगाआड लपतात आणि क्षणात दिसतात.**

असे काहीसे गाणे म्हणणारे शाहरुख खानसारखे चित्रपटातील कलावंत त्यावेळी मन आणि मेंदू काबीज करून घेत त्यामुळे साधारणपणे कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व चिमण्या हळदीच्या रंगाने आणि अंगाने भूडर्र उडून जाईपर्यत तरी तारा तुटताना मागितलेले मागणे पूर्ण होत असावे असे वाटत असे. आकाशात चमकणारे वेगवेगळे तारे आपल्याला नेहमी भुरळ घालत असतात. सर्वात तेजस्वी दिसतो तो शुक्र, तो सूर्य मावळल्यावर जितका तेजस्वी दिसतो तेवढाच तेजस्वी पहाटव्याखाली सूर्य उगवण्यापूर्वी दिसतो. सूर्य मावळताच सूर्य क्षितिजाच्या पलीकडे जाऊन धरतीच्या कुशीत विसावला आहे हा निरोप सांगण्यासाठी जणू अगदी थोड्या वेळासाठी बुध ग्रह आपल्याला दर्शन देतो.

उत्तरेकडे निश्चल आणि आपल्या जागेवर अढळ असलेला ध्रुव पाहिला की जगाच्या पसाऱ्यात आपले अस्तित्व किती निश्चित असावे? या प्रश्नाचे उत्तर आपोआप मिळते. ध्रुवबाळाची कथा फार लहानपणी ऐकलेली असली तरी तिच्या प्रेरणेचे पडसाद आपल्या अस्तित्वावर होणाऱ्या प्रत्येक लहान मोठ्या हल्ल्यामुळे आणखी तीव्र होत जातात. एखादेवेळी लाल रंगाचा सर्व जगाला कोड्यात टाकणारा ग्रह आपल्याला सहज दिसतो. लाल रंगाचा अवाढव्य आणि प्रचंड असा हा दगड ज्यावर कदाचित एखादी जीवसृष्टी असावी असा अंदाज काढला जातो तो पृथ्वीच्या आणि त्याच्यामधले प्रचंड अंतर कापून नेमके एखाद्या माणसाला शोधून त्याच्या राशीत कशाला आणि कसा धुडगूस घालत असेल? हा प्रश्न मला फार पूर्वीपासून पडायचा. मंगळाच्या सोबत असलेला त्याचा आणखी एक सोबत म्हणजे शनी, याच्या अंगावर आतापर्यंत भारतीयांनी जेवढे तेल ओतले आहे ते जर प्रत्यक्ष त्याच्या पृष्ठभागावर जमा झाले असेल तर तिथे भविष्यात कधी तुमची जीवसृष्टी निर्माण झाली तर तेलाचा समुद्र त्यांना आयता मिळेल असे मला वाटते.

गमतीचा भाग सोडला तरी हे दोन्ही ग्रह कधी कधी साध्या डोळ्यांनी दिसतात आणि ते खूप आकर्षक आहेत हे नक्की म्हणता येते. सप्तर्षी हा सात ताऱ्यांचा सुंदर समूह कधीतरी आजीने म्हातारीचे खाटले, त्या खाटल्याखाली ठेवलेल्या सोन्याच्या विटा, आणि त्या तीन विटा घेऊन पळणारे तीन चोर अशा कायमस्वरूपी स्मरणात राहणाऱ्या लोककथेनुसार ओळखीचा करून दिला होता, त्यामुळे तो कायम स्मरणात राहिला. आकाशातले तारे पश्चिमेकडेच्या आकाशात आपले तेज आवरून घेत असावेत असे वाटते. तसेही या सर्वसाधारण चांदण्यांचा प्रियकर चंद्र आकाशात आला की अनेक चांदण्या त्याच्या संपर्कात येताच स्वतःचे अस्तित्व विसरून दिसेनाश्या होतात. दररोज विरळ होत जाणाऱ्या ढगा आड चंद्र लपला की कापसाच्या गंजीवर उड्या मारत खेळणार्या बालकांची आठवण येते.

शर्मिष्ठा हा तारकापुंज ययाती कादंबरी वाचल्यापासून खूप दिवस शोधण्याचा विषय होता. अर्थात ययातीमधील शर्मिष्ठा जितकी भावली तितका हा तारकापुंज मला भावला नाही. शरद ऋतूमध्ये वाऱ्याने एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी विनाकारण धावपळ करणारे ढग आणि आपल्या अखंडित गतीने धावत जाऊन क्षितिजा पल्याड लपलेल्या सूर्याला खो देणारा चंद्र मनाला मोहित करणारा असतो.

शरदाच्या ऋतूतील कार्तिक महिन्यात तर सूर्य उडत असतानाच आकाशातील रंगांची उधळण सुरू होते. दिवाळीच्या आकाश कंदील आणि फटाक्यातील आतिश बाजी यांची आकाशातील चांदण्याशी स्पर्धा लागते. आज आकाश कंदीलाचे अनेक प्रकार आपण पाहतो मात्र आकाश कंदील असा शब्द ऐवजी आकाश चांदणी असा शब्दप्रयोग दुकानदार वापरायचे घराघरावर चांदण्यांच्याच आकाराचे आकाश कंदील दिसायचे हे मला आजही आठवते. अर्थात चार दिवसाच्या प्रचंड कोलाहला नंतर आकाशातील चांदणे निवांतपणे कशी जिरवली कृत्रिम चांदण्याची अशा आविर्भावात गालातल्या गालात हसत असतात.

शरद ऋतूच्या आगमनात प्राजक्ताच्या पांढऱ्या फुलांचा सडा अंगणातही चांदण्याची बरसात झाल्याच्या खुणा दर्शविणारा असतो. शहरात घरांची गर्दी आणि त्यावर विजेच्या दिव्या मुळे चांदण्या डोळ्यांना दिसण्यात उजेडाचा अडसर निर्माण होतो असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. मात्र मधल्या काळात लोड शेडिंग या प्रकारामुळे रात्री काळाकुट्ट अंधार आणि बाहेर आकाशात काळ्या कपड्यावर चांदण्याची नक्षी दिसावी तसे आभाळ दिसायचे. शारदातल्या अश्विन पौर्णिमेचा उल्लेख न म्हणजे शरदाच्या चांदण्याच्या अपमान होईल. आश्विन पौर्णिमा अर्थात शरद पौर्णिमा किंवा कौमुदी पौर्णिमा म्हणजेच आपली कोजागरी पौर्णिमा हो! या पौर्णिमेचे महत्त्व वेदपुराणांपासून वात्सायनापर्यंत आणि बौद्ध धर्मापासून हिंदू धर्मापर्यंत सर्वत्र पाहायला मिळते.

प्रामुख्याने कोजागिरी या नावाने ओळखली जाणारी ही पौर्णिमा, त्या पूर्ण चंद्राच्या चांदण्यात दुधातील गोडवा वाढवणारी थंडी, लहान मुलींचे भुलाबाईचे गाणे, त्यांचे ३२ खाऊ, त्या गाण्यातून आणि खाण्यातून स्त्रियांच्या व्यथा वेदना मांडण्याची पद्धत आणि भारतीय संस्कृतीची ओळख देणारी एक परंपरा अशा अनेक गोष्टी कोजागिरी सोबत जोडलेल्या आहेत.

कोजागिरीसाठी एक मंडळ तयार करणे आणि त्यातील एकाने कोजागिरीसाठी अगदी वेळेवर हवे तेवढे दूध मिळवणे म्हणजे ड्रायडेच्या दिवशी दारू मिळवण्यासारखे मोठे हिकमतीचे काम असायचे. अर्थात ही दोन्ही कामे करणारे गटातील एक दोघे असतातच.

(पान ६ वर)

पान १ वरून

## बुलडोझरचा न्याय!

याचीच खात्री नव्हती. या गुंडांनी बळकावलेल्या जमिनी आणि घरांचा ताबाही त्यांच्याकडेच होता. न्यायाची अंधुक आशाही मावळत चालली असताना, योगी आदित्यनाथ यांनी सत्तासुत्रे सांभाळली आणि या प्रस्थापित आणि सत्तेशी लागेबांधे असलेल्या माफियांवर, गुंडांवर कारवाईचा बुलडोझर फिरू लागला. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयांनी आपली विश्वासार्हता बर्याच प्रमाणात गमावली आहे. या पार्श्वभूमीवर अशा माफियांची घरे बुलडोझरने कोसळताना पाहिल्यावर न्याय मिळाला असे सामान्य माणसाला वाटले, त्यात नवल काय! न्या. गवई ज्याला 'कायद्याचे राज्य' म्हणतात, त्याचा अर्थ काय? त्याचा अर्थ असा की, गुन्हेगारांना कायद्याच्या कारवाईची भीती वाटली पाहिजे आणि न्यायालयांकडून आपल्यावरील अन्याय दूर होईल, याची सामान्य माणसाला खात्री वाटली पाहिजे. या दोन्ही गोष्टी प्रचलित न्यायालयांकडून साध्य होतात का? याचे उत्तर नाही असेच येते.

आता तर सर्वोच्च न्यायालय हे जामीन देणारे न्यायालय बनले आहे. त्यामुळे योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगारांवर बुलडोझरद्वारे जी धडक कारवाई सुरू केली, तिचे सर्वत्र स्वागत झाले. बुलडोझर हा मुख्यमंत्र्याच्या मर्जीने चालत नसतो. त्यासाठी न्यायालयाची परवानगी घेऊनच त्याचा वापर केला जातो. यंदा मार्चमध्ये ज्यांच्या घरात कोट्यवधी रुपयांच्या नोटा सापडल्या आणि त्यापैकी काही जाळून टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला, त्या न्या. यशवंत वर्मा यांच्यावर आजपर्यंत साधा 'एफआयआर'ही दाखल झालेला नाही. न्या. वर्मा यांना निलंबित केलेले नसून, त्यांच्याकडील सर्व काम काढून घेण्यात आले आहे, इतकेच! इतकेच नव्हे, तर नुकताच सर्वोच्च न्यायालयात त्यांचा उल्लेख एका वकिलाने केवळ 'वर्मा' असा केल्यावर, न्या. गवई यांनीच या वकिलांना समज देऊन त्यांचा उल्लेख 'मा. न्या. वर्मा' असा करण्याची सूचना केली.

एका व्यक्तीने केवळ १०० रुपयांची लाच घेतल्याबद्दल, त्याच्यावर चाललेला खटला काही दशके उलटून गेली तरी संपलेला नाही. पण, न्या. वर्मा यांच्या घरात कोट्यवधी रुपयांची रोकड जाळण्याचा प्रयत्न होऊनही, त्यांच्यावर कसलीच कारवाई होत नाही याला न्याय देणे म्हणत नाहीत. न्या. गवई यांनी बुलडोझरचा उल्लेख करून, भाजपचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली आहे. पण, सामान्य जनतेचे मत त्यांनी लक्षात घेतले, तर त्यांना त्यास पूर्ण पाठिंबा असल्याचे दिसेल. वरिष्ठ न्यायालयांच्या न्यायाधीशांनी खटल्यांदरम्यान आरोपीवर टिप्पणी करण्यापेक्षा सत्य काय आहे, त्यावर अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे. आपली टिप्पणी आपल्या निकालपत्रात नमूद करण्याची त्यांची तयारी आहे काय? जगातील यच्चयावत् विषयांवर गरज नसताना टिप्पणी करणे न्यायाधीशांनी बंद केले पाहिजे. कारण, ते त्यांचे वैयक्तिक मत असते. खटल्याच्या पुराव्यांशी त्याचा संबंध नसतो. बुलडोझर हे न्यायदानाचेच एक अंग आहे, हे न्या. गवई यांनी लक्षात घेतले पाहिजे. त्यांना जर ही कारवाई थांबावी असे वाटत असेल, तर न्यायालयांना खटले लवकर निकाली काढावे लागतील. ती त्यांची तयारी आहे का? हा खरा प्रश्न आहे.

ललित

डॉ.ऋतुजा कुलकर्णी-भडगांवकर

## मराठीची शिदोरी घरात!



मागच्या आठवड्यात अभिनेते आनंद इंगळे यांचे युट्यूब वर पॉडकास्ट ऐकण्यात आले. फार सुंदर विचार त्यांनी मराठी भाषेबद्दल मांडले. आजकालची पिढी जी कान टवकारते, एखादा अवघड मराठी शब्द ऐकला तर किंवा कुणी अस्खलित मराठी बोलत असेल तर. नवलच वाटतं त्यांना....खरे तर तशी आजच्या नव्या पिढीची ती चुक नाहीच, सध्या मराठी भाषेची शाळांमध्ये बाहेरची अवस्थाच तशी झालीये आहे.

आजकाल सगळ्यांच आई- बाबांना, वाटतं, बाहेरच्या जागतिक स्पर्धेत आपलं मूल टिकायला हवं, इंग्रजीमध्ये फाडफाड बोलायला हवं. तसं इंग्रजीमध्येच फाडफाड बोलता आलं म्हणजेच त्याच्यात आत्मविश्वास आहे असं नाही, काही मुलं इंग्रजी भाषा येत असूनही, बाहेर चार माणसात घडघडा बोलतही नाहीत. त्यांच्या प्रश्नांना व्यवस्थित उत्तरं देत नाहीत. मग ते उगाच घोकंपट्टी करून, लाडात येऊन दिलेल उत्तरही जबरदस्तीनेच दिलेले असते. जसं की, ' I पराश ळी......' तेही बोबडं! मुळात उच्चार स्पष्ट हवेत. किमान आपलं नाव तरी स्पष्ट घ्यायला शिकवा. माझ्या लहानपणी वक्तृत्व स्पर्धा व्हायच्या. पसायदान पठण स्पर्धा, गीताई पठण, विविध आंतरशालेय स्पर्धा ज्याने मोठ्य गर्दीसमोर बोलायला आत्मविश्वास यायचा. किमान चार पाहूणे आले तर, उत्तरही व्यवस्थित द्यायचो. आईबाबांवर उगाच मागे लागून मग,'बोलना ....विचारत आहेत तुला काहीतरी...नाव सांग तुझं...' अशी वेळ नाही आली कधी... या वक्तृत्व स्पर्धांमुळे, स्तोत्रांमुळे, श्लोकांमुळे, आमचे उच्चार स्पष्ट झाले.

आजकाल चार वाक्य मराठीत सलग बोलता आली तरी, पालक धन्यता मानतात आणि म्हणतात,' इंग्रजी छान बोलतो हा..., पण मराठीचा प्रॉब्लेम आहे हं जरा....' म्हणूनच घरातूनच मराठी शिक्षण देणे गरजेचे आहे. आजकाल मराठी शाळा सोडल्यास इतर शाळांमध्ये मराठी प्रार्थना म्हणून घेतल्या जात नाहीत. त्यामुळे इंग्रजी माध्यमांच्या मुलांना आपल्या मराठी प्रार्थना अनोळखी वाटतात. घरी स्तोत्र पठण, श्लोक ऐकताना ही मुले मग कावरी बावरी होतात. मान्य आहे, जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी जागतिक संमती मिळालेल्या भाषेतच आपल्या पाल्याला शिक्षण मिळावे, यासाठी पालक त्यांच्यासाठी इंग्रजी माध्यमात प्रवेश घेतात. परंतू, त्यासाठी आपण आपली मराठी संस्कृती विसरून चालणार नाही. शाळेत ते शिक्षण नसेल मिळत तर घरी आपण पाल्यांना तसे मराठी शिक्षणाचे वातावरण निर्माण करून करून देऊ शकतो. शेवटी आई व वडिलंच तर आपले पहिले गुरु असतात. सध्या आपण बोलत असलेली मराठी भाषा ही प्राकृत मराठी नाही. त्या भाषेचीही उत्क्रांती होऊन, आता आपण जी बोलीभाषा बोलत आहोत ती तयार झाली आहे. त्यात आता इंग्रजाळलेले शब्दही मिश्रित झाले आहेत. कारण त्याचे पर्यायी मराठी शब्द बोली भाषेतला रुळलेला शब्द नाही. उदाहरणार्थ मोबाईलला पर्यायी मराठी शब्द भ्रमणध्वनी, ऑफिसला कार्यालय, लिफ्टला उद्वाहक वगैरे वगैरे... हे शब्द मराठीत भाषांमध्ये दैनंदिन आयुष्यात बोलले जात नाहीत. त्यामुळे आपण इंग्रजी शब्द मिश्रित करून बोलतच आहोत. पण, यामुळे हळू हळू मराठीतून विचार करण्याची शक्ती गमावायला नको... एवढेच. त्याकरिता मराठी पुस्तके वाचन, आपले श्लोक, स्तोत्र, नाटक, सिनेमे यासाठी जे- जे करता येईल ते करूच शकतो. त्यामुळे मराठी भाषा व संस्कृती कालबाह्य होणार नाही किंवा नवीन पिढीला अनोळखी तरी वाटणार नाही. शेवटी प्रत्येक माणूस आपल्या मातृभाषेतच पहिला विचार करतो. तिला टिकवायला पण प्रत्येकाने विचार करावा एवढेच!

कथा

डॉ. सुमेधा हर्षे

## म्हशीचे शिंग



काल दुपारी अचानक बाबा घरी आले. आई गेल्यापासून तसे ते मूक मूकच राहायचे. कधी आठवणींचे पक्षी घिरट्या घालू लागले की, काही न कळवता त्यांचे अवचित येणे व्हायचे. बाबांजवळ मोबाईल नव्हता. सदान्कदा मोबाईल बघण्यावर ते नेहमी टीका करीत म्हणून स्वतःपासून सुरुवात करावी या हेतूने ते प्रयत्नपूर्वक मोबाईल वापरत नसत.

थेट भेट घेणे यावरच जास्त कटाक्ष असे. हल्ली कामाच्या व्यापात आमचीही त्यांच्याशी महिनोन्महिने गाठभेट होत नसे. एकदा माणसाचं वय झालं आणि इतरांचा फारसा काही स्वार्थ नसला की माणूस अगोदर एकटा आणि नंतर एकाकी होत जातो. तो एकांतवासात रमू लागतो. खेड्यात शेताजवळ जुने घर होते. तेथेच बाबांचा जीव रमायचा. सुधाकर नोकरीनिमित्ताने शहरात येऊन स्थायिक झाला. बाबा उत्साही होते. बैलासोबत घाम गाळायचा एवढेच त्यांना माहीत होते. शेतीच्या कामात त्यांचा हातखंडा असला तर पूरक उत्पन्नाचे काहीतरी साधन असायला हवे. इतका व्यवहारीपणा अजून नक्कीच शाबूत होता. पूरक शेतीव्यतिरिक्त फावल्या वेळात विविध किरकोळ उद्योग करून पैसा कमवीत होते. पण आता डोळ्यांनी जरा कमी दिसते. कानांनी पूर्वीसारखे ऐकू येत नाही. वाढतं वय या सर्व समस्यांच्या मुळाशी असते, याचा त्यांनी मानाने स्वीकार केला होता. पूर्वीसारखी काम होत नसे. त्यामुळे मनाची तगमग होत होती. जी कुठे बोलून दाखविता येत नव्हती.

साहजिकच पैशाची गरज पडली तर सुधाकर हाच एकुलता एक हक्काचा मुलगा होता. पण ते कधी त्याला काही मागत नसत. बाबांची ही स्वाभिमानी वृत्ती सुधाकर चांगली ओळखून होता. तरीही सुनंदाला नेहमी भीती वाटायची की, बाबा आले तर काहीतरी पैशाची गरज असणार. आताही बाबांना बघून तिच्या मनात तीच शंका आली. एखादे वेळेस ठीक आहे, पण पुन:पुन्हा पैसे मागितले तर कोठून देणार?

''मामंजींना पैशाची गरज आहे वाटतेय! तरीच आठवण आलेली दिसते. आमचंच धड चालत नाही, तुमचं कुठून पूर्ण करायचं?'' सुनंदाची भूणभूण कानावर पडत होती. सुधाकर ऐकून न ऐकल्यासारखे करू लागला. कारण बाबांची काही चूक नव्हती आणि सुनंदाही काही चुकीचं बोलत नव्हती. सुधाकरला काय बोलावे कळेना. घरी नळ होता; तरीही बाबा नेहमी त्यांच्या जुन्या सवयीप्रमाणे विहिरीचे पाणी शेंदूनच हात-पाय धुवायचे. विहिरीजवळ सावकाश तोंड खंगाळून बाबांनी प्रवासाचा शीण दूर केला. दूरवर नजर टाकत थोडा वेळ बघत राहिले. खरं तर 'बाबा चहा घ्या!' असा सूनबाईचा आवाज येईल, असं त्यांना मनापासून वाटत होतं; पण असं काही घडलं नाही. बाबा स्वतःच हळूहळू आत येऊन बसले. त्यांनी खांद्यावरच्या उपरण्याने तोंड आणि मान पुसली आणि समोरचे वर्तमानपत्र उचलून पाने उलगडू लागले. कढत चहाचे दोन घोट घशाखाली गेले असते तर जरा बरं वाटलं असतं; तरीही त्यांचा चेहरा शांत आणि तृप्त दिसत होता ''आज मुक्कामाला आहात ना?'' सुनंदा विचारून गेली. बाबांनी मान वर करून बघितले. ''होय, आता बस नाही. उद्या सकाळच्या बसने निघीन म्हणतो.'' ''काय म्हणतो राजू आणि सुरेखा.'' बाबांनी नातवाची विचारपूस केली. ''होय. पोरं मोठी झाली आता. यांच्या शाळांचे आणि त्यांचे खर्च वाढले. गेल्या महिन्यात त्यांचेही डॉक्टर झाले. तपासण्या झाल्या. औषधावर भारी खर्च झाला...'' सुनंदा खर्चाचा पाढा वाचत होती. सुधाकर दाराआडून सगळं ऐकत होता. तेवढ्यात मुले शाळेतून आली, तसे आजोबांनी त्यांना जवळ घेतले.

''राजू-सुरेखा अभ्यासाला बसा.'' आईने आतून खूण करताच मुले आत निघून गेली. रात्री जेवायला पिठलं-भात-कांदा असा साधाच बेत होता. ''सूनबाई मिरचीचं लोणचं संपलं का? भारी चविष्ट झालं होतं बरं का! अजूनही चव जिभेवर कशी रेंगाळतेय बघ!'' ''हो. गेल्याच आठवड्यात बरण्या धुतल्या. आता पुन्हा मिरच्या आणणे आहेच. आपल्या वावरात मिरच्या पण लावा की जरा.'' सुधाकर काही बोलत नव्हता. तो मान खाली घालून जेवत होता. जेवण झाल्यावर बाबांनी नेहमीप्रमाणे जमिनीवरच आपली पथारी पसरली आणि झोपी गेले. खाट किंवा पलंगपेक्षा जमिनीवरच झोप छान लागते, असे ते नेहमी म्हणत.

सकाळी बाबा लवकर उठले. सात वाजताची बस पकडायची होती. बाबा तयार होऊन बसले. त्यांनी सुधाकरला जवळ बसण्याची खूण केली. सुनंदाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. नक्कीच आता काहीतरी पैशाचा विषय निघणार म्हणून वाट बघू लागली. सुनंदाने डोळ्याने सुधाकरचे लक्ष बाबांकडे वळवले आणि प्रश्नार्थक केला. श्वास रोखून सुधाकर सुनंदाकडे पाहू लागला. काहीतरी उत्तर द्यावे लागणार, जे सुनंदाला योग्य वाटेल असे, हे ओळखून सुधाकर सावध झाला. रात्रीच्याच बसने परत जायचं मनात होतं. पण रात्री माणूस थकलेला असला तर काही बोलणं होत नाही. तीन महिन्यांपासून तुमचे कोणतेही पत्र आलेले नाही. तुम्ही चिंतेत असता म्हणून मुद्दाम आलो'' असं म्हणत बाबांनी खिशातून ५०० रुपयाची जाडसर घडी काढली आणि पुढे केली. बाबा खुणेनेच म्हणाले, 'असू द्या. नेहमीच जमते असं नाही, पण यावेळी साधलं म्हणून ठेवा. यंदा सोयाबीन, पऱ्हाटी, धानाचे पीक चांगले आले. शेतमजूरही चांगले मिळाले. घरी काही अडचण नाही. आपल्या शेतावरच्या गाईला कालवड झालीय. मुलांसाठी थोडा खरवस आणला आहे.'' बाबांनी एक पितळेचा झाकणाचा डबा पुढे केला. ''तू खूप अशक्त दिसत आहेस. व्यवस्थित जेवत जा बरं आणि हो सुनंदा पण किती वाळलीय काळजी घे,'' असं म्हणताना बाबांच्या डोळ्यातला साचलेला थकवा जाणवला.

सुधाकरला काहीच बोलता येत नव्हते. शब्द जणू घशात अडकले होते. काही बोलायच्या आधीच बाबांनी प्रेमाने थोपटले. ''घ्या. तुम्ही मोठे झाले ना आता?'' मी अवघडलो आहे हे ध्यानात घेऊन बाबांनी सुनंदाच्या हातात नोटा ठेवल्या.

''हे तुझ्या आजीचे आहेत बरं का?'' ''बाबा कशाला हो इतकं सगळं...'' ''अरे तुला देण्याचं मनात येतच होतं. कसं आहे ना, माझ्या आयुष्याचा आलेख आता उतरंडीवर आहे. आता या म्हाताऱ्याचा काय भरोसा? त्यापेक्षा आपला हाताने दिलेलं बरं; नाही का?'' बाबा प्रश्नार्थक चेहऱ्याने सहेतूक हसले.

''बाळांनो ऐका, एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा की, कधी कधी पैसा असूनही आई-बाबा आपल्या मुलांवर ओझे असू शकतात. ओसंडून वाहणारे वृद्धाश्रम काय संदेश देताहेत? मुले मात्र आई-वडिलांवर कधीच ओझे नसतात. म्हशीचे शिंगं तिला कधीच ओझे वाटत नसतात.'' सुधाकर आणि सुनंदा दोघेही भावुक झाले. सुधाकरच्या मनात विचार येत होते. मी मोठा होत गेलो आणि बाबा म्हातारे होत गेले. बाबांच्या आयुष्याचा आलेख वेळोवेळी माझ्या डोळ्यासमोर तरळत होता. भाद्रपद महिन्यात घरी गणपती असायचा. अनंत चतुर्दशीला गणपतीचे विसर्जन करताना बाबांना रडू कोसळायचे, इतके ते भावुक होते. कधी जवळ बसून चार शब्द बोलण्याचं मनात येई, पण तरुणपणी आईबापांची ओढ इच्छा असो वा नसो तशी कमी होत जाते. कधी मनातलं तेच ते पुन्हा उगाळतील आणि मग माझी उगाच चिडचिड होईल. म्हणून कधी कधी बोलणे टाळतो. बाबांच्या तरुणपणी आपण लहान असतो. आता आपल्या तरुणपणी बाबा लहान झालेले असतात. ''बरं येतो मी. बस चुकायला नको.'' बाबा कमरेवर हात ठेवत कष्टाने उठले. पिशवी हातात घट्ट धरली. एकवार चष्मा ठिकठाक बसवला आणि हळूहळू पायीच निघाले.

''बाबा, मी येतो बस स्टॅन्डवर पोहोचवायला.'' सुधाकर हळू आवाजात म्हणाला. ''नको. त्याची गरज नाही. मी जातो हळूहळू. तुम्ही काळजी घ्या आपली'' असं म्हणून बाबा पुढे पुढे चालू लागले. पाठमोऱ्या बाबांची छबी बघताना सुनंदाचा चेहरा विचारमग्न दिसत होता आणि मागे उभा सुधाकर रुमालाने डोळे पुसत होता.

# 'राम म्हणता रामचि होईजे, पदीं बैसोनि पदवी घेईजे ।'

संत
प्रकाश एदलाबादकर



सृजनशील कलेच्या क्षेत्रातील कलावंताने आधुनिकतेचे कितीही अनुसरण केले, तरी त्याच्या कलाविष्काराची पाळेमुळे परंपरेतच सापडतात. आपल्या मातीमधील सांस्कृतिक आणि आध्यात्मिकतेचा आणि त्या श्रीमंत परंपरेचा स्पर्श कुठेतरी त्याच्या कलाकृतीला झालेला असतो. याचे कारण एकच, कलावंत आपल्या कलेतून स्वत्वाचा शोध घेत असतो. कळत-नकळत का होईना, परंतु आपली मुळे नेमकी कुठे आहेत, याचा शोध घेण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू असते. ही प्रक्रिया सामान्य माणसापासून उच्च कोटीच्या कलावंतांपर्यंत सतत सुरू असते. सामाजिक जाणिवांच्या टोकदार आणि त्याच बरोबर मोगऱ्याच्या फुलासारख्या मऊ मुलायम शृंगारिक कविता लिहिणारे कविश्रेष्ठ सुरेश भट एके ठिकाणी लिहून जातात...

'माझिया शब्दात वेडे दु:ख संतांचे भिनावे ।
वाळल्या वेलीस माझ्या अमृताचे फूल यावे ।।'

संतांच्या मनात असलेल्या करुणेचा पाझर आपल्याही प्रतिभेला फुटावा, अशी इच्छा केवळ सुरेश भटच करीत नाहीत तर अनेक कवी-लेखकांनी या करुणेची आराधना केली आहे. आपल्या परंपरेतील कथांचे, आख्यान-कीर्तनाचे, पारंपरिक काव्याचे साद-पडसाद त्यांच्या साहित्यात उमटलेले दिसतात. कविवर्य ग्रेस यांनी रामायणावर १९ कविता लिहिलेल्या आहेत. त्यातील सेतुबंधनाची कविता वाचली आणि मनात लख्ख प्रकाश पडला. ग्रेस लिहितात...

'समुद्राच्या दराऱ्यात । सेतू बांधती माकडे ।
अंजनीच्या सुतालाही । फक्त एकच साकडे ।
आम्ही जिवाच्या करारे । उभारले शिलाखंड ।
कधी आमुच्या वाट्याला । यावा रघुजी अखंड ।
पण खारुटली उभी । तिची पाठ रामाकडे ।
तिला स्पर्शाची अक्षरे । आम्ही राहिलो कोरडे ।'
'राम म्हणता रामचि होईजे, पदीं बैसोनि पदवी घेईजे ।'

सुरेश भट काय किंवा ग्रेस काय, दोघांच्याही प्रतिभेला परतत्त्वाचा स्पर्श झालेला होता. या कविद्वयाच्या बऱ्याचशा रचनांचे मूळ संतवचनांच्या तुलसीबनातच सापडते. संतांचे हे देणे म्हणजे, मानवाला आपल्या जगण्याचे रहस्य, स्वत:विषयीचे ज्ञान, आत्मानुभव प्राप्त होण्यासाठी मिळालेले असे अक्षर संचित आहे. आपल्याला आयुष्यात एकदा तरी परमेश्वराचे दर्शन व्हावे; किंबहुना परमेश्वरी स्पर्शाची अनुभूती आपल्या व्यक्तित्वाला व्हावी, अशी प्रत्येकाची धडपड असते. पण या प्रक्रियेत आपण कुठेतरी उणे पडतो. परंतु हेही तितकेच खरे की, एकदा का हे उणेपण ध्यानात आले की, परमार्थाची वाट सोपी होते.

सीतामाईच्या शोधासाठी प्रभू रामचंद्रांना सहाय्य करायला वानरदळ आले. कारण एकच, प्रभूंविषयीचा अपार विश्वास आणि अतूट भक्ती. अनेक वानरांनी मोठमोठाले शिलाखंड समुद्रात टाकून सेतुबंधन केले. परंतु आपल्या वाट्याला हा प्रभू राम अखंडपणे येईल का, अशी शंका हनुमंताच्या मनात आली. काय बरे कारण असेल?

लहानशी खार मात्र आपले काम अबोलपणे करीत राहिली. हे आपण का करतोय, हे सुद्धा तिला कदाचित माहीत असेलच असे नाही. या सेतुबंधनात आपलाही वाटा असावा, हा एकच नि:स्वार्थ भाव तिच्या मनात होता. या कार्याचे फलित मला मिळाले काय किंवा न मिळाले काय, परंतु हे कार्य समाजाच्या आणि राष्ट्राच्या उद्धरणाचे आहे, कुणाला तरी जोखडातून मुक्त करण्याची इच्छा या कार्यामागे आहे, याची जाण तिला असली पाहिजे. ती रामाच्या सन्मुख आली नसेलही तरीही, खारीची प्रामाणिक भावना प्रभूंच्या लक्षात आली. म्हणूनच केवळ ती खारच नव्हे, तर तिच्या येणाऱ्या पिढ्यांसाठी त्यांनी आपल्या हाताच्या आशीर्वादाचा ठसा खारीच्या पाठीवर कायमचा उमटवला. कारण खार त्या आशीर्वादाची अधिकारी होती. तात्पर्य काय, रामनाम आणि रामकार्य हे जीवनात तारक आहे. संतश्रेष्ठ जगद्गुरू तुकोबारायांनीही याचा अनुभव घेतलेला आहे. ते म्हणतात...

'राम म्हणता रामचि होईजे ।
पदीं बैसोनि पदवी घेईजे ।।
ऐसे सुख वचनी आहे ।
विश्वासें अनुभव पाहें ।।
राम रसाचिया चवी ।
आन रस रूचती केवी ।।
तुका म्हणे चाखोनि सांगे ।
मज अनुभव आहे अंगे ।।'

तुकोबारायांनाही हा अनुभव आला होता. रामभक्त गोस्वामी तुलसीदासजी म्हणतात...

'नाम राम को अंक है सब साधन हैं सून। अंक गए कछु हाथ नहिं अंक रहें दस गून।। रामनाम अवलंब बिनु परमारथ की आस। बरषत बारिद बूंद गहि चाहत चढन अकास ।।'

केवळ रामाचेच नाव हृदयावर अंकित करा; त्याशिवाय पर्याय नाही. रामाचे नाव न घेता परमार्थ करणे व्यर्थ आहे. गोस्वामीजी म्हणतात, समुद्रावर पडणाऱ्या पावसाच्या धारांची शिडी करून कुणी स्वर्गाला जाऊ शकतो काय? समुद्रावर पडणाऱ्या धारा जशा व्यर्थ जातात तसेच, रामनामाशिवायचे आयुष्य व्यर्थ जाते. हृदयात परमेश्वराचे सातत्याने स्मरण करीत केलेले कार्य आपल्या पदरात उत्तम फळ देतेच.

कर्मफळाची आशा न बाळगता केलेल्या कार्याची नोंद जरी कुणी घेतली नसेल तरी देवाच्या दरबारात याची नोंद अवश्य घेतली जाते. गीतेत या कर्मविचाराला एक वेगळी दिशा दिलेली आहे. निष्काम आणि अहंकाररहित कर्म हाच गीतेचा प्रमुख संदेश आहे. कोणतीही व्यक्ती कर्मापासून दूर राहू शकत नाही. प्राणिमात्रांच्या उत्पत्तीला कारण होणारा विसर्ग किंवा विश्वनिर्मितीचा व्यापार म्हणजे कर्म अशी गीतेने कर्माची व्याख्या केलेली आहे.

निष्काम बुद्धीने आणि निरहंकारी वृत्तीने आपले प्राप्त कर्म करीत राहणे हीच ज्ञानाची परिणती आहे. या दृष्टीने खारीच्या कार्याचे मूल्यमापन केले तर ती आपल्यापेक्षा कितीतरी ज्ञानी होती, असा निष्कर्ष काढता येईल काय? प्रत्येक शुभ कार्यात आपला वाटा असला म्हणजे ते कार्यच

केवळ उत्तमाकडे जात नाही तर, आपल्याही व्यक्तित्वाचा विकास होत जातो. आपल्या मनातील अवांछनीय गोष्टी आपोआपच नष्ट होतात. मनाचा आरसा असा स्वच्छ झाला की, आपले त्यात पडलेले प्रतिबिंब आपल्यालाच ओळखू येत नाही. आपल्या प्रत्येक शब्दात संतांचे दु:ख भिनावे असे जे कवीला वाटते त्यामागे हे कारण आहे. दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होणे आणि त्याच्या भावनांशी एकरूप होणे याला सत्पुरुषांनी जे महत्त्व दिले आहे, त्याचे कारण हेच आहे.

'माझियासाठी जगाचे रोज जाते घरघरावे ।
मात्र मी सोशीन जे जे ते जनाईचे असावे ।।'

या भटांच्या ओळी पुन्हा तेच सांगतात. संत तुकोबारायांच्या मनामध्येही दयाभावाची पूर्ण अवस्था होती म्हणूनच ते म्हणतात...

'दया तिचे नाव । भूतांचे पालन ।
आणिक निर्दालन । कंटकांचे ।।
धर्मनीतीचा तो । ऐकुनी व्यवहार ।
निवडिले सार । असार ते ।।
पाप त्याचे नाव । न आचरिता नीत ।
लतेचि उन्मत्त । करती सदा ।।
तुका म्हणे धर्म । रक्षावया साठी ।
देवासही आटी । जन्म घेणे ।।'

या शब्दातील मूळ हे दयेचे बीज आहे. तुकोबारायांच्या अनुभूतीची तीव्रता अत्यंत लक्षवेधी आहे. आपल्या अनुभवातून आलेले दु:ख समाजासमोर मांडताना त्यांनी मनातले भयही व्यक्त केलेले आहे. हे भय आणि हे दु:ख नष्ट करण्याचा तुकोबारायांजवळ एकच उपाय होता. तो म्हणजे पांडुरंगाला शरण जाणे. परंपरेशी, तत्कालीन वर्तमानाशी, भवतालच्या वास्तवाशी, देह आणि मनाशी तुकोबांचा सतत संघर्ष सुरू होता. या संघर्षातून त्यांना एकाच सत्य जाणवले, ते म्हणजे परोपकार करणे आणि परपीडा कधी न करणे. दुसरे म्हणजे कुणाकडूनही कोणतीही अपेक्षा न ठेवणे. 'ऐशी कळवळ्याची जाती, करी लाभाविण प्रीती' या त्यांच्या शब्दांमधील गहनार्थ म्हणजेच उपनिषदांचे सार आहे.

(पान ६ वर)


# या गीतार्थाची थोरी

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

'या गीतार्थाची थोरी स्वये श्री शंभू विवरी ।'
गीतेची महती सांगताना शंकर पार्वतीला म्हणतात की, तुझे स्वरूप जसे दरवेळेस नावीन्याने प्रकट होते तसेच हे गीतातत्त्व मला दरवेळेस नवीनच भासते. खरे आहे. जितके अधिक चिंतन करू तितक्या नवनवीन आविष्काराने गीतातत्त्व प्रकटते. व्यासांनी महाभारत रचनेत एकही शब्द वृथा लिहिलेला नाही. प्रत्येक मुद्याचे, गोष्टीचे तेथेच असण्यात औचित्य आहे. हे औचित्य कधी सहज लक्षात येते तर कधी चिंतनाने.

प्रयोजन आणि प्रसंग : युद्धारंभाची सूचक रणवाद्ये वाजू लागली. योद्ध्यांनी शंख फुंकले. इतके दिवस शौर्याच्या आणि हक्काच्या गोष्टी करणारा धनुर्धारी अर्जुन ऐनवेळी 'किं कर्म कि कर्मेति' म्हणत विचलित झाला. अशावेळेस अच्युताने त्याला कर्तव्याची जाणीव करून देत स्थिर केले. पार्थ म्हणजे अर्जुन असा जरी अर्थ असला, तरी मला पार्थ म्हणजे समस्त पृथ्वीवासी हा अर्थ जास्त सयुक्तिक वाटतो. आचार्य म्हणतात-
'सर्व लोकानुग्रहार्थं अर्जुनं निमित्तीकृत्य आह भगवान् ।'

गोपालनंदन कृष्णाने सुधीर अशा पार्थासाठी केले. यावेळेस सुधीर हे विशेषण हेतुपुरस्सर वापरले आहे. गीता म्हणजे फक्त उपनिषदांचे सार असे नसून त्याहीपलीकडे गीतेने ती पृष्ठभू ी न नाकारता त्यातून सर्वसमावेशक असा नवा गीताधर्म सांगितला. आणि म्हणूनच गीताप्रशस्तीत म्हटल्याप्रमाणे अध्यायाच्या शेवटी आपण 'इतिश्री मद्भगवद्गीतासूपनिषत्सु' म्हणतो. नीलकंठी महाभारतात 'इति श्री गीतायां.. अध्याय:' असे आहे. याचा अर्थ गीता हेच एक नवे उपनिषद. त्याचे स्वरूप म्हणजे ज्ञानाधिष्ठित भक्तिपूर्ण कर्म ार्ग. यादृष्टीने बघितल्यास उपनिषदातील अनेक वचने कधी जशीच्या तशी तर कधी तत्सम गीतेतही आढळतात. उदा. ईशावास्यमिदं सर्वं आणि ईश्वर:सर्वभूतानां किंवा कुर्वन्नेवेह कर्माणि...न कर्मलिप्यते नरे व मयि सर्वाणि कर्माणि किंवा मदर्थपि कर्माणि इत्यादी. अशी अनेक उदाहरणे देता येतील. आणि हेच कारण असावे की कर्म, ज्ञान किंवा भक्ती अशा सर्वच पंथीयांना गीतेविषयी आपुलकी वाटते. गीता विचाराचे प्रतिबिंब ते स्वत:च्या आचरणात बघतात आणि प्रत्येकाला ती इतकी आपलीशी वाटते की, माझेच विचार गीतेत आहेत, दुसऱ्याचे नाहीत असेही वाटते. हे म्हणजे एकाच आईच्या तीन मुलांना आपली आई ही फक्त आपलीच आहे. दुसऱ्या दोन भावंडांची नाही असे आहे.



निमित्त अर्जुनाचे पण या उपदेशाचे महत्त्व सर्वांनाच आहे. मध्ये महाभारतम्: कधी वाटते की गीता ही शांतिपर्वात जास्त शोभली असती. पण रचनाकाराने तिची योजना केली ती भीष्म पर्वात युद्धाच्या आधी. असे का याचे स्पष्टीकरण शांकरभाष्यात आहे. गीतेत विशव्यापी युद्धानिमित्त कर्म आणि अकर्म यांची चिकित्सा करण्यात आली.

'द्विविधो हि धर्म: प्रवृत्तिलक्षणो निवृत्तीलक्षणश्च जगत: स्थितिकारणम् । तं धर्मं भगवता यथोपदिष्टं वेदव्यास: सर्वज्ञो भगवान् गीताख्यै श्लोकशतै: उपनिबंध ।।..समस्तपुरुषार्थसिद्धि:।'

महाभारताच्या १८ पैकी आदि, सभा, वन आणि विराट ही ४ पर्वे आरंभीची. पाचव्या उद्योगपर्वात गमावलेले राज्य परत मिळविण्याची खटपट आणि अंतिम प्रयत्न म्हणून विफल झालेली कृष्णशिष्टाई इ. नंतरच्या ६ ते १० व्या पर्वात प्रत्यक्ष युद्ध वर्णन व शेवटच्या ११ ते १८ या पर्वात युद्धोत्तर परिणाम, राज्यव्यवस्था, नीतिशास्त्र इत्यादी. म्हणून उद्योगपर्वानंतर आणि ६ व्या भीष्म पर्वातील प्रत्यक्ष युद्धारंभापूर्वी गीतोपदेश असणे असे व्यासांचे विचारपूर्वक नियोजन आहे.

आज उपलब्ध असलेल्या महाभारत ग्रंथाच्या पूर्व अवस्था म्हणजे जय आणि भारत. हे उपलब्ध नाहीत तसेच आजची प्रचलित गीता आणि प्रत्यक्ष युद्धभूमीवर सांगितलेला उपदेश यांचेही आहे. इतकी मोठी प्रश्नोत्तरे युद्धभूमीवर व्हायला तेथे क्रिकेटप्रमाणे स्ट्रॅटेजिक टाई पद्धत नव्हती. व्यासांनी जय नावाचा इतिहास लिहिला. वैशंपायनाने लिहिले ते भारत नावाचे ऐतिहासिक काव्य. सौतिने सांगितले ते महाभारत. यात भरतवंशाची विस्तृत माहिती, भागवत म्हणजे नारायणीय धर्म, निष्काम कर्मयोगाचे महत्त्व, युद्धाची अपरिहार्यता आणि समर्थन हे सर्व समाविष्ट करण्यात आले. मूळ लहान उपदेशाची परिष्कृत आवृत्ती म्हणजे आजची विस्तारीत ७०० श्लोकी गीता. अर्थात गीता प्रशस्तीमधील 'व्यासेनग्रथितां पुराण मुनिनां मध्ये हाभारतम्' या शब्दांकडे दुर्लक्ष करता येत नाही. सु ारे ३००० हजार वर्षांपूर्वी वैशंपायनाने भारत ग्रंथाचे निवेदन अर्जुनाचा पणतु जनमेजयाला केले.

गीतापूर्वकाळातील तत्त्वज्ञान म्हणजे मीमांसकांचा कर्म मार्ग, जनकादिकांचा ज्ञानमार्ग, उपनिषदकार आणि सांख्य विद्वानांचा ज्ञान व संन्यासमार्ग, योगिजनांचा अवघड योगमार्ग आणि सामान्यांचा सुलभ भक्तिमार्ग. हे सर्व 'यथा नदिनां बहवो म्बुवेगा: समुद्रमेवाभिमुखा द्रवन्ति ।।' म्हणजे विविध नद्यांच्या प्रवाहांनी एकाच समुद्रात विलीन व्हावे त्याप्रमाणे एकाच गंतव्याकडे नेणारे अनेक मार्ग. तसेही बघितले तर वरील विचारात कर्म, ज्ञान आणि भक्ती हाच क्रम विकसित होत जातो.

'सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदन: ।
पार्थो वत्स: सुधीर भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ।।'

सर्व उपनिषदरूपी गायींच्या उपदेशामृती दुधाचे दोहन प्रत्यक्ष

गीतेवर काही जण आरोप करतात की, त्यात परस्पर विसंगत वचने आणि मार्ग आढळतात. सुरुवातीला अर्जुनही चिडून म्हणतो-'व्यामिश्रेणव वाक्येन बुद्धिमोहयसीव मे। तदेकं वद निश्चित्य।'

म्हणजे एक काय ते बोल. उगिच माझा बुद्धिभेद करू नकोस. पण हाच अर्जुन शेवटी 'स्थितोस्मि गंतसंदेह' झाल्याचे मान्य करतो. पार्थासारखे सुधीर भोक्ता होऊन अभ्यास केल्यास वरील आरोपाचे खंडन होईल. 'तत्त्वज्ञान' विषयावरील गीता हा ग्रंथ आकाराने सर्वात लहान असूनही त्याच्यावरच आतापर्यंत हजारो वर्षांत विचारवंतांनी सर्वात जास्त भाष्ये केलेली आहेत. कोणी संन्यासयोग सांगितला तर कोणी भक्तियोग, कोणी निष्काम कर्मयोग तर कोणी अनासक्तिविचार. कोणाला फक्त अध्यात्म दिसते तर कोणाला नीतिशास्त्र. इतक्या प्रदीर्घ काळानंतरही धर्म, नीती, आचारपद्धती, व्यवहार, तर्क या सर्वातच गीतेचे अनन्यसाधारण महव टिकून आहे. प्रत्येकालाच गीतेचे मत आपल्या स्वत:च्या विचार-आचारांशी जुळवून पाहावे असे वाटते. गीतेचा आधार सर्वजण शोधत असतात व सर्वांना तो सापडतोही. इतकी गीता सर्वसमावेशक आहे.

**कृष्णाचे ट्रम्प कार्ड :** कौरव पांडवातील संघर्षाचा परिणाम फक्त त्यांच्यापुरताच मर्यादित नसून विश्वव्यापी होता. विश्वातील सर्वच राष्ट्रे त्यात ओढली गेली. अशावेळेस आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वात प्रभावी व्यक्तिमत्त्व कोणाचे तर कृष्णाचे. संजय म्हणालाच-


'यत्र योगेशर:कृष्णो यत्र पार्थो धनुर्धर:।
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिमतिर्म ।।'

जिकडे कृष्ण आणि अर्जुन तिकडे धर्म, नीती आणि म्हणून विजय हे निश्चित. त्यावेळच्या इतक्या मोठ्या राजकीय, सामाजिक घटनेपासून कृष्णाने अलिप्त राहणे अशक्यच. आपला प्रभाव तो जाणून होता, बोलूनही दाखवत होता आणि प्रसंगी आपले ट्रम्प कार्ड वापरीतही होता. गीतेत तर याची कितीतरी उदाहरणे आहेत. मी, मला, माझे, माझ्यासाठी, माझ्यामुळे.. इतकी की कोणी त्याला अहंकारी म्हणेल. पण त्याच्या तोंडची 'यदा यदा हि धर्मस्य' आणि 'परित्राणाय साधूनां..' ही वचने आजही सर्वांना आश्वस्त करतात.

राष्ट्रनेत्याला असे बोलावेच लागते... 'तु मुझे खून दो, मैं तुम्हे आझादी दूंगा।' हे सुभाषजींचे वचन. यातून राष्ट्रनेत्याची निर्णायक भूमिका प्रचीतीस येते. 'मोदी की गॅरंटी' हेही याच पद्धतीचे वचन. इतकेच नव्हे, तर 'हा योग मी फार पूर्वी सूर्याला सांगितला, तेथून तो मनु, इक्ष्वाकू या परंपरेत पोचला आणि आता तुला सांगतो' असे अशक्य वाटणारे विधानही केले. विभूतियोग अध्यायात कृष्णाने आपल्या विश्वव्यापी अस्तित्व व प्रभावाची कितीतरी उदाहरणे दिली आणि लगेच विश्वरूप दर्शनात त्याचे प्रत्यंतरही दिले.

(पान ६ वर)

# कादंबरीत हरवलेला माणूस



पहिल्या कादंबरीपासून मी एस. एल. भैरप्पांची वाचक आहे. मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला त्यांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यामुळे लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आज देहरूपाने ते आपल्यामध्ये नाहीत. पण त्यांचे लेखन पुढच्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल, यात शंका नाही.

श्रद्धांजली
डॉ. तारा भवाळकर

एस. एल. भैरप्पा यांच्या निधनाची वार्ता साहित्यप्रेमींना दु:ख देऊन गेली. त्यांच्या नसण्याने साहित्यविश्वाचे किती मोठे नुकसान झाले आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. लेखनासाठी कादंबरी हा साचा निवडणारे भैरप्पा तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आणि अभ्यासक होते. कुटुंबात घडलेल्या विपरीत प्रसंगांना तोंड देत ते लहानाचे मोठे झाले. लहानपणीच आईचे छत्र हरवले. १५ वर्षांचे असताना रानात नेऊन आपल्या अवघ्या पाच वर्षांच्या लहान भावावर अन्त्यसंस्कार करण्याचा प्रसंगही त्यांच्यावर आला. असे विविध प्रकारचे दु:ख भोगत एका अर्थी जगण्याकडून तत्त्वज्ञानाकडे आणि तत्त्वज्ञानाकडून जगण्याकडे त्यांचा सतत प्रवास होत राहिलेला आपल्याला दिसतो.

पुढे शिक्षणामध्येही अनेक अडथळे आले. तरीदेखील त्यांनी शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतलीच; डॉक्टरेटही घेतली. १९५८ च्या आसपास त्यांनी लेखनाला सुरुवात केली. 'वंशवृक्ष' ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीने कन्नड साहित्यात मोठे वादळ निर्माण केले. त्यावेळचे उदयोन्मुख आणि नामांकित लेखक, नाटककार गिरीश कर्नाड यांनी त्यावर एक चित्रपटही काढला. त्यात स्वत: काम केले. मात्र, पुढील काळात गिरीश कर्नाड, लेखक अनंत मूर्ती यांच्या आणि भैरप्पांच्या विचारसरणीमध्ये अंतर निर्माण होत गेले. यातून त्यांनी एकमेकांवर केलेली टीकाही आपण जाणतो. असा सगळा इतिहास बराच मोठा आहे.

पहिल्या कादंबरीपासून मी भैरप्पांची वाचक आहे. याचे कारण मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला भैरप्पांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यांना प्रत्यक्ष भेटीचा योग काही आला नाही. त्यामुळे व्यक्ती म्हणून त्यांचा परिचय नाही. मात्र लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अखेरपर्यंत त्यांनी कादंबरी हाच लेखनाचा साचा कायम ठेवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाल्याचे आपण जाणतो. त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांमध्ये 'दुभंग'चा उल्लेख करावा लागेल. यात त्यांनी सोसलेले दारिद्र्य दिसते. त्यांच्या 'वंशवृक्ष' या कादंबरीने मराठी वाचकांना चांगलेच बांधून ठेवले.

बऱ्याच कादंबऱ्यांची मराठीत भाषांतर झाल्यामुळे तेदेखील, मी कन्नडपेक्षा मराठी वाचकांना अधिक परिचित आहे, असे म्हणत असत. महाराष्ट्रात त्यांचे सतत जाणे-येणे होते. काही दिवस ते मुंबईमध्ये राहायला होते. त्यांनी सुरुवातीच्या काळात सयाजीराव गायकवाड यांच्या कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम केले होते. त्यामुळेच त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील वाचकांनाही मोठा धक्का बसलेला आपण पाहिला. त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांपैकी एक म्हणजे 'पर्व.' मला स्वत:ला ती खूप आवडली. विशेषत: यातील शेवटचे प्रकरण मला भावले. यात त्यांनी महाभारत युद्धाचा शेवटचा काळ चित्रित केला आहे. हे सगळे वर्णन खरोखर अंगावर काटा आणणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे यातून आपल्या जीवनाची नश्वरता आणि भीषणता प्रामुख्याने समोर येते. आपण भीष्मांना पितामह म्हणून वंदनीय, पूजनीय मानतो. पण या प्रकरणात त्यांच्या माध्यमातून निसर्गाच्या दरबारात एक माणूस म्हणून शरीराची होणारी विकलांगता लेखकाने अत्यंत परखडपणे मांडली आहे. या प्रकरणात भैरप्पांनी केलेले महायुद्धाचे वर्णन, नंतरची पडझड आणि विविध पातळीवरील माणसासमोर येणाऱ्या दु:खाचे स्वरूप आपल्यालाही अंतर्मुख करून जाते. राजपदावर असणारी व्यक्ती असो की सामान्य शिपाई, सगळ्यांना दु:खाचा सामना करणे ही बाब अपरिहार्य आणि अटळ असते हे यातून अधोरेखित होते. जगाच्या पाठीवर झालेल्या सगळ्या महायुद्धांचा इतिहास पाहिला, वर्णने वाचली तरी हेच जाणवते. दुसऱ्या महायुद्धाचा काळ, हिटलरने केलेला छळ, विषारी वायूने मारलेले जीव हे सगळेच आपण विविध माध्यमांतून जाणले आहे. समजून घेतले आहे. खरे तर कथाकादंबऱ्यांमधून वा चित्रपटातून दाखवलेल्या या गोष्टी बघून जगातील क्रौर्य कमी व्हायला हवे होते.

भैरप्पांसारख्या लेखकांनी आपल्या लेखणीतून जनांना या अर्थाने शहाणे करण्याचा प्रयत्न केला आहे. पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. भैरप्पा यांची गाजलेली आणखी एक कादंबरी म्हणजे 'आवरण.' यामध्ये त्यांनी आधुनिक विश्वचित्रित केले आहे. यावर पुरोगामी लोकांचा बराच आक्षेप येत राहिला. डाव्या-उजव्या बाजूने चर्चा झाली. मात्र भैरप्पांनी माणसाच्या जीवनातील सगळी उलथापालथ प्रत्यक्षातही अनुभवली होती आणि तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून अभ्यासलीही होती. यातून आलेले महत्त्वपूर्ण विचार त्यांच्या लेखणीतून समोर येत होते.

(पान ६ वर)

### भैरप्पा यांना मिळालेले काही महत्त्वपूर्ण पुरस्कार

- भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार, २०१६
- आसाम साहित्य सभेचा मामोनी रईसो गोस्वामी राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, २०१६
- म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट, २०१६
- भारत सरकारकडून साहित्य अकादमी फेलोशिप, २०१५
- २०१५ मध्ये म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट
- बेतागेरी कृष्ण शर्मा पुरस्कार, २०१४
- दीनानाथ मेमोरियल फाऊंडेशन, मुंबईकडून वाग्विलासिनी पुरस्कार, २०१२
- बिर्ला फाऊंडेशनकडून 'मंद्र' या कादंबरीसाठी सरस्वती सन्मान, २०११
- गुलबर्गा विद्यापीठामधून मानद डी. लिट, २००७
- हेडगेवार पुरस्कार (कलकत्ता), २००७
- एनटीआर पुरस्कार (आंध्रप्रदेश), २००७
- कर्नाटक सरकारी मुक्त विद्यापीठ, म्हैसूरकडून मानद डी.लिट., २००५
- पंपा प्रशस्ती (कर्नाटक राज्य) पुरस्कार, २००६

# ग्रहसंकेत

**(रविवार, १२ आक्टोबर ते शनिवार, १८ आक्टोबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

**ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)**

✻ **रविवार,** १२ आक्टोबर- वसगडे यात्रा, बिरदेव यात्रा पट्टणकोडोली, साजोबा यात्रा कडेठाण (ता. दौड), भीमदास करांडे महाराज पुण्यतिथी पंढरपूर, भैरवनाथ यात्रा प्रारंभ किकळी (ता. वाई) ✻ **सोमवार,** १३ आक्टोबर- कालाष्टमी, कराष्टमी बिरदेव यात्रा हुन्नूर (ता. मंगळवेढा), दीक्षित महाराज पुण्यतिथी औरवाड (ता. शिरोळ), श्री बिरुदेव यात्रा हुनूर (मंगळवेढा) ✻ **मंगळवार,** १४ आक्टोबर- काळोजी महाराज पुण्यतिथी जरंडा (जि. सातारा)✻ **बुधवार,** १५ आक्टोबर- जागतिक अंध साहाय्यता दिन, चक्रपाणी प्रभू महाराज जयंती (महानुभव), भारतीय वृत्तपत्र विक्रेता दिन, राष्ट्रीय विद्यार्थी दिन ✻ **गुरुवार,** १६ आक्टोबर- संत गजानन महाराज पट्टेकर पुण्यतिथी (ठाणे) ✻ **शुक्रवार,** १७ आक्टोबर- रमा एकादशी, गोवत्स द्वादशी, वसूबारस, गायीचे पूजन, रवि तूळेत, सिद्धरामेश्वर महाराज पुण्यतिथी (बसवंत बागेवाडी), सद्गुरू सिद्धरामेश्वर महाराज पुण्यतिथी पथरी (सोलापूर), कवळाईदेवी यात्रा टेंभवली (ता. देवगड), कावेरी संक्रमण स्नान ✻ **शनिवार,** १८ आक्टोबर- शनि प्रदोष, धनत्रयोदशी, श्री धन्वंतरी जयंती, गुरू द्वादशी, यमदीपदान शनिप्रदोष, श्री दत्त उत्सव शेणगाव

**मुहूर्तः-✻ साखरपुडा-** १२ आक्टोबर (१४ पर्यंत), १६ (१३ नंतर), १७ (१४ पर्यंत) आक्टोबर ✻ **डोहाळ जेवण-** १२ आक्टोबर (१४ पर्यंत) ✻ **बारसे-** १२ आक्टोबर (१४ पर्यंत) ✻ **जावळ-** १२ आक्टोबर (१४ पर्यंत) १५ आक्टोबर (१२ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** १२ आक्टोबर (१४ पर्यंत), १३ आक्टोबर (१२ नंतर)

### मेष :- आशेचा दिवा लावावा

रमा एकादशी वसुबारसपासून सुरू होणाऱ्या दिपोत्सवासाठी शुभेच्छा. सप्ताह अखेरीस गुरु रौप्यपादाने सुखस्थानी येत आहे. फल शुभ आहे. राशी स्वामी मंगळ सप्तमात त्यामुळे दिवाळी आनंदात साजरी करावी. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. महापुरामुळे नुकसान झालेल्यांच्या घरी एक तरी आशेचा, आनंदाचा दिवा लावावा. शुभ ता. १४, १७

### वृषभ:- मनासारखे घडेल

अष्टमेश, लाभेश गुरु शनिवारी लोहपदाने तृत्तीयात येत आहे. फल कष्ट आहे. दीपोत्सवात दगदग वाढणार असली तरी सर्वकाही मनासारखे घडणार आहे. उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या कामांना गती मिळेल. उपजत कला गुणांचा विकास होत जाईल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. विचाराने रहावे. शुभ ता. १४, १७

### मिथुन:- दीपोत्सव आनंदात

सप्तमेश, दशमेश गुरु ताम्रपादाने धनस्थानी येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. आर्थिक समस्या कमी होणार असल्याने दीपोत्सव आनंदात साजरा करू शकाल. यांत्रीक क्षेत्रात पुढचे पाऊल पडेल. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंदही घटना घडतील. अपेक्षित संधी मिळणार आहेत. घरात सुखसोयीच्या वस्तू घ्याल. शुभ ता. १४, १७

### कर्क:- सुख समाधान

गुरु सप्ताह अखेरीस रौप्यपादाने राशीत येत आहे. फल शुभ आहे. कौटुंबिक जीवनात सुख समाधान देणार्या घटना घडतील. रवी, मंगळ, बुध समवेत चौथे त्यामुळे फार दगदग करू नका. वाहनांपासून जपून असावे. धार्मिक, समाधानकारक कार्य घडतील. अंगच्या कलागुणांचा विकास होईल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. १३, १५

### सिंह:- विचाराने रहावे

पंचमेश, अष्टमेश गुरु सुवर्णपादाने बारावा होत आहे. फल चिंत आहे. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. गायन, वादनादि कलेचा विकास होईल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. महत्त्वाचे निर्णय पूर्ण विचारणे घ्यावे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अडचणींवर मात कराल. नोकरीत वरिष्ठांच्या विरोधात जाऊ नका. त्रास संभवतो. शुभ ता. १३, १७

### कन्या:- अडचणींवर मात

गुरु लोहपादाने लाभस्थानी येत आहे. फल कष्ट आहे. धनात रवि, मंगळ बुधासह राहणार आहेत. त्यामुळे आर्थिक कामे परिश्रमाने होतील. अडचणींवर मात करू शकाल. महत्त्वाचे निर्णय विचारणे घ्यावेत. राशीतील शुक्रामुळे वावटळीतही दिवा लावू शकाल. मागील कटू प्रसंगाने आता दुःख करीत बसू नका. मोजकेच पण विचाराने बोलावे. शुभ ता. १३, १५, १७

### तुला:- स्वमतग्रह टाळावा

गुरु १८ तारखेस सुवर्णपादाने दशमात येत आहे. फल चिंता आहे. राशीत रवि बुधपण मंगळासमवेत आहे. त्यामुळे मार्ग सरळ सोपा असणार नाही. अंगीकृत कार्यात अधिक लक्ष घालावे. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात चांगला प्रभाव पाडू शकाल. अपेक्षित संधी प्रयत्नाने मिळवू शकाल. फार चिंता करू नका. शुभ ता. १४, १५

### वृश्चिक:- आनंदाने दीपोत्सव

धनेश, सुखेश गुरु ताम्रपादाने भाग्यस्थानी येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. दीपोत्सव आनंदाने साजरा करू शकाल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. जामीन कोणास राहू नका. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित प्रगती होत जाईल. दगदग टाळावी. शुभ ता. १५, १७

### धनु:- फटाक्यांपासून सावध

राशी स्वामी गुरु रौप्य पादाने अष्टमात कर्क या उच्च राशीत येत आहे. फल शुभ आहे. दीपोत्सवात आपले वेगळे समाधान आपणास मिळणार आहे. लाभातील ग्रहांमुळे प्राप्तीचे प्रमाण विविध मार्गाने वाढेल. जुने येणे वसूल होईल. फटाक्यांपासून सावध रहावे. अपेक्षित कामे होतील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १३, १५

### मकर:- सुसंधी निर्माण

लोहपदाने गुरु सप्तमात येत आहे. फल कष्ट आहे. कार्यक्षेत्रात रवि, मंगळ बुधामुळे विचाराने रहावे. घाईने निर्णय घेऊ नका. कौटुंबिक जीवनात आनंदायी घटना घडतील. जमा खर्चाचे योग्य नियोजन करावे, अन्यथा समस्या संभवतात. सुसंधी लाभतील. घरात शुभ कार्य ठरतील. अनुकूलता वाढत जाईल. सरकारी नोकरीत अनुकूलता राहील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. १५, १७

### कुंभ:- समाधानकारक प्रगती

धनेश, लाभेश गुरु ताम्रपादाने षष्ठात येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. कार्यक्षेत्रात समाधानकारक प्रगती होईल. यांत्रीक क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. अडचणीची चिंता नको, मार्ग निघत जाईल. विलंबाने पण चांगली प्रगती साधता येईल. चिकाटीने रहावे. फार दगदग करू नका. जुने येणे वसूल होईल. स्पर्धांमध्ये यश मिळेल. शुभ ता. १५, १७

### मीन:- आनंददायी घटना

राशी स्वामी गुरु सुवर्णपादाने पंचमात येत आहे. फल चिंता आहे. आठवा मंगळ रवि बुधासह आहे. इच्छित कार्य सिद्धीसाठी अधिक परिश्रम घ्यावे लागतील. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात आनंददायी घटना घडतील. संतती संबंधात शुभ घटना घडतील. शारीरिक तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. शुभ ता. १७


!! शुभ भवतु !!

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# हरिहर

सह्याद्री पर्वताच्या पश्चिम घाटातील त्र्यंबकेश्वर डोंगररांग अनेक गडकिल्ल्यांनी आणि डोंगरमाथ्यांनी नटलेली आहे. हरिहरगड हा नाशिक जवळील त्र्यंबकेश्वर डोंगर रांगेतील प्रसिद्ध आणि तितकाच दुर्गम किल्ला आहे. पश्चिम घाटाच्या माथ्यावर वसलेला हरिहर नाशिक शहरापासून ४० किलोमीटर अंतरावर आहे. ब्रह्मगिरीच्या पश्चिमेस सुमारे २० किलोमीटर अंतरावर असलेला हरिहर किल्ल्याचे गिर्यारोहकांना प्रचंड आकर्षण आहे. नाशिकवरून घोटीला जाणाऱ्या मार्गावर निरगुडपाडा गावातून हरिहर किल्ला दिसतो तसेच त्र्यंबकेश्वर मार्गाने यायचे असल्यास जव्हार मार्गाने हर्षवाडी गावात यावे. गावातून खडा पहाड चढून गेल्यावर आपण किल्ल्याच्या समोरील मोकळ्या पठारावर पोहोचतो. ही वाट बिकट असली, तरी रम्य असून या वाटेवर णपतीचे मंदिर आणि एक दगडी पुष्करणी आहे. कातळात खोदलेल्या उभ्या सरळसोट पायऱ्यांमुळे हा किल्ला सर्वांच्या आकर्षणाचा विषय झाला आहे.



महाराष्ट्र राज्याला गुजरातशी जोडणाऱ्या गो`डा या घाटमार्गावर लक्ष ठेवण्यासाठी या किल्ल्याची निर्मिती झाली. हरिहर सर करणे गिर्यारोहकांचे स्वप्न असते, हा किल्ला दुर्गम असूनही सर्वांचा आवडता किल्ला आहे. किल्ल्यांची उंची समुद्रसपाटीपासून साधारण ३७०० फुट आहे. किल्ला यादवकाळातील असून त्या काळात व्यापारी मार्गाचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात असे. यादवांची सत्ता संपुष्टात आल्यावर किल्ला अहमदनगरच्या निजामशहाच्या ताब्यात होता. १६३६ मधे शहाजीराजांनी त्र्यंबकगड जिंकला तेव्हा हरिहरदेखील ताब्यात घेतला. पुढे किल्ला मोगलांच्या ताब्यात गेला; मात्र १६७० मध्ये हरिहर मोरोपंत पिंगळे यांनी या भागातील इतर किल्ल्यांसह गड स्वराज्यात सामील करून घेतला. त्यानंतरही या किल्ल्यावर मोगलांची नजर होतीच; पुढे मोगल सरदार मातब्बरखान याने १६८९ मध्ये किल्ला पुन्हा ताब्यात घेतला. मराठे आणि मोगल अशी सत्तांतरे अनेकदा झाली. त्यानंतर किल्ला इंग्रजांच्या अधिपत्याखाली होता.

किल्ल्याची रचना अत्यंत आकर्षक असून किल्ला दुर्गम असल्याने गिर्यारोहणाचा अनुभव असल्यास चढणे सोयीचे होते. किल्ल्याला 'हर्षगड' असेही नाव आहे, किल्ल्याच्या पायथ्याशी हर्षेवाडी, निरगुडपाडा, कोटमवाडी ही गावे आहेत. आपण निरगुडपाडा गावातून चालत किल्ल्याचा पायथा गाठायचा. पायथ्याला पोहोचल्यावर त्रिकोणी आकाराचा हरिहरगड अद्वितीय भासतो. पायथ्यापासून किल्ला चढायला सुरुवात केली की, अतिशय सावधपणे दगडी पायऱ्या चढायला सुरुवात करायची. कातळकड्यात खोदलेल्या या सरळसोट पायऱ्या बघून इंग्रज अधिकारी कॅप्टन ब्रिग्ज आश्चर्यचकित झाला आणि या किल्ल्याच्या प्रेमात पडला होता. पूर्वीपासून हिंदुस्थानातील स्थापत्यकला अद्वितीय होती, हे आपण त्याकाळी केलेले बांधकाम अभ्यासकाच्या दृष्टीने पाहिल्यास समजते. इंग्रजांनी अनेक किल्ल्यांवर जाणारे मार्ग तोफा डागून उद्ध्वस्त केले. त्यांनी सर्व किल्ल्यांच्या बाबतीत हेच धोरण सर्वत्र अवलंबिले होते. मात्र, हरिहर किल्ल्याच्या अद्वितीय पायऱ्यांना इंग्रजांनी हातही लावला नाही.

हरिहर किल्ल्याची चढाई तीन टप्प्यात पूर्ण होते. थोडे चढून आपण किल्ल्याच्या पहिल्या सपाटीवर पोहोचतो. तेथे डोंगराच्या मध्यभागी शेंदूर फासलेले अनगड देव, एक त्रिशूळ आपले लक्ष वेधून घेतात. थोड्या अंतरावर किल्ल्याच्या अजस्त्र अशा कातळकड्याचे दर्शन घडते. काळ्या कातळात खोदलेल्या उभ्या पायऱ्या अरुंद असल्याने एकापाठोपाठ सावकाश चढायला सुरुवात करावी. या पायऱ्या चढताना सावध राहावे. कारण समोरच्या माणसाची एक चूक त्याच्यासह मागच्यालासुद्धा धोक्याची ठरू शकते.

साधारण ८०९० पायऱ्या चढल्यावर, किल्ल्याच्या पहिला आकाराने लहान परंतु देखण्या दरवाज्यातून आपला गडप्रवेश होतो. प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला असलेले दोन बुरूज आणि मधला दरवाजा पाहून मन आनंदी होतं. प्रवेशद्वाराच्या बाजूला गणपतीची मूर्ती आहे. दर्शन घेऊन पुढे डोंगरात खोदलेल्या वाटेने सावधपणे चालत दोन दरवाजे पार करावे. पुढे पुन्हा दगडी पायऱ्या आहेत. त्या वळणाच्या असल्याने लक्षपूर्वक चढायला सुरुवात करावी. पायऱ्यांवर खोदलेल्या खोबणीचा आधार हातांना देत सर्व कातळ पायऱ्या पार कराव्या लागतात. पुढे एका छोट्या दरवाज्यातून आत प्रवेश केल्यावर डाव्या हाताला एक गुहा आहे. गुहा वरतूनच पाहावी. कारण गुहा खाली जाऊन पाहायची असल्यास प्रस्तरारोहण साहित्य असल्यास सोयीचे आहे.

आपण वरतून गुहा पाहून गडाच्या सदरेचे अवशेष पाहण्यास जावे. सदरेचे अवशेष पाहून पुढे गेलात की, पाण्याचे तीन टाके आणि एक तलाव दिसतो. येथे दगडी भिंत बांधून पाणी अडविले आहे. त्याकाळी इतक्या उंचीवर अत्यंत कौशल्याने पाण्याची सोय केलेली आहे. तलावाच्या काठावर श्री हनुमानाचे देऊळ आणि खडकावर शिवलिंग आणि नंदी आहे. खाली गोल घुमट असलेली एक कोठी आहे. कोठीचे प्रवेशद्वार खिडकीसारखे असून हे किल्ल्यावरील कोठार आहे.

किल्ल्यावरील इतर बांधकाम सुस्थितीत नसून ही एकच वास्तू बऱ्या अवस्थेत आहे. इमारत आत जाऊन पाहता येते. इमारत पाहून आणि महादेवाचे आणि हनुमंताचे दर्शन घेऊन पुढील पायवाटेने उजव्या बाजूस चालत जावे. येथे आपल्याला एक उंच टेकडी दिसते, हा कातळटप्पा कठीण आहे; मात्र इतकं चढून आल्यावर गडाच्या सर्वोच्च स्थानावर जायलाच हवे. हा टप्पा पार केल्यावर आपण किल्ल्याच्या सर्वोच्च स्थानावर पोहोचतो. येथे अगदी अरुंद जागा आहे. गडमाथ्यावर काही देवतांच्या मूर्ती आहेत. येथून सभोवतालच्या परिसराचे विहंगम दृश्य पाहून आपला थकवा निघून जातो. तसेही निर्धारित लक्ष्य पूर्ण करण्याचा आनंद अवर्णनीयच असतो. पूर्वेला पाहिल्यास कापड्या डोंगर आणि ब्रह्मगिरी किल्ला दिसतो. इतक्यात सोशल मीडियावर आपण बरेचदा हरिहर किल्ल्यावर



झालेल्या गर्दीचे दृश्य पाहतो. सुट्टीच्या दिवशी किल्ल्यावर पर्यटकांची इतकी गर्दी पाहिली की, एखादी भयानक घटना घडेल अशी भीती वाटते. हा किल्ला दुर्गम किल्ल्याच्या यादीत आहे आणि येथे एक छोटीशी चूकसुद्धा जीवघेणी ठरू शकते. किल्ले पाहणे उत्तमच; किल्ल्यांवर जायला हवेच, मात्र काही किल्ले असे आहेत, जिथे जाण्यासाठी गिर्यारोहणाचा पूर्वानुभव असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या किल्ल्यावर जाणाऱ्या पायऱ्या अरुंद आणि उभी चढण असलेल्या आहे.

पावसाळ्यात तर पायऱ्या निसरड्या झाल्याने धोका अधिकच वाढतो. कुठल्याही प्रकारची सुरक्षा व्यवस्था नसल्याने या किल्ल्यावर गर्दी करणे योग्य नाही. पूर्वी गिर्यारोहक मंडळी मोजक्या लोकांना घेऊन किल्ल्यावर यायची. आता काहीही अनुभव नसलेले लोकं अवघड किल्ल्यांवर केवळ हौस म्हणून येतात.

गिर्यारोहण करताना शिस्त अत्यंत महत्त्वाची असते; शिवाय अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन आवश्यक असते. आता तर अनुभवी लोकांनी सांगितलेले न ऐकण्याची आणि मी किती वेगळा आहे हे दाखवण्याची सवयच रुजली आहे. त्यामुळे प्रत्येकाला काहीतरी वेगळं दिव्य करून ते जगाला दाखवायचे असते. दिखाव्याच्या नादात इतके अपघात होतात तरी डोळे उघडत नाही याचे वाईट वाटते. निसर्गाशी खेळ नेहमीच महागात पडतो याची जाणीव असणे आवश्यक आहे. गिर्यारोहण हे कायम अनुभवी व्यक्तीच्या मार्गदर्शनात आणि सतर्कतेनेच करावे, इतकीच विनंती करावीशी वाटते.

हरिहर किल्ल्याचे या व्यतिरिक्त काही ठळक ऐतिहासिक महत्त्व ज्ञात नाही. किल्ल्यावर चढण्यासाठी तीनही टप्पे मिळून साधारण ११७ कातळकोरीव पायऱ्या आहेत. या पायऱ्यांमुळेच हरिहर किल्ल्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणूनच एकदा तरी हरिहरवर जावे असे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते.

पान ५ वरून

## राम म्हणता रामचि होईजे...

खारीने कुठे उपनिषदे वाचली होती? परंतु रामकार्यात आपला वाटा असायला हवा, ज्यायोगे आपले जीवन सफल होईल, ही जाणीव तिच्या मनात होती. प्रभू रामचंद्रांनी हे ओळखले होते. आपणही या जगात खारीसारखे आहोत; किंबहुना तिच्यापेक्षाही लहान आहोत, आपल्याही मनात प्रत्येक सत्कार्याविषयी 'लाभाविण प्रीती' असली पाहिजे. असे जर घडले तर आधुनिक काळातील प्रत्येक रामकार्यात आपल्या सारख्या अनेक खारींचा वाटा केवळ आपल्याच व्यक्तिमत्त्वाचे उन्नयन घडविणार नाही तर, संपूर्ण समाज उन्नत होईल. आजच्या घडीला अशा रामकार्यासाठी, ईश्वरी कार्यासाठी हनुमंताची दास्यभक्ती आणि निष्ठा तसेच खारीची निष्काम कर्मवृत्ती या सोबतच परोपकाराची भावना आपण अंगीकृत केली पाहिजे. रामाच्या आशीर्वादाची खूण आपल्याही पाठीवर नक्कीच उमटेल.

## या गीतार्थाची थोरी

त्याने कधी नीतिनियमांचा अतिरेककेला नाही. उलट सद्रक्षण आणि खलनिर्दालन यासाठी जे करावे लागेल तीच नीती व तोच धर्म अशी व्याख्या सांगितली. मोरोपंत कर्णवधात कृष्णाच्या तोंडी एक आर्या घालतात तिचे येथे स्मरण होते. **'रक्षावा धर्म करिसी उपदेश तरी असे मान्य। रक्षितसो धर्मातें आम्हा धर्म ठावूका नान्य।।'** मत्स्यावतारात अधर्माच्या महासागरात बुडणारी विश्वाची नौका तारुन नेण्याचे अवघड कार्य त्याने केले. याहीवेळेस तो कुशल नावाडी होता. गीताप्रशस्तीत म्हणूनच त्याला 'कैवर्तक: केशव' म्हटले आहे.वेद किंवा उपनिषदांच्या तुलनेत गीतेची भाषा सोपी आहे. यावरूनही तिच्या कालाविषयी तर्क करता येतो. त्यातील अनेक वचनांना सुभाषितांचे मोल मिळाले. गीता ही युद्धनिमित्ताने आकारास आली म्हणूनच आजही ती सर्वांना कठीण प्रसंगात मार्गदर्शक वाटते. काय करू, काय नको, योग्य काय आणि अयोग्य काय अशा आवर्तात सापडलेल्या प्रत्येकालाच योग्य मार्गदर्शन करून गतसंदेह करते. **'गीताई माउली माझी, मी तिचा बाळ नेणता। पडता रडता घेई उचलोनि कडेवरी।'** हे विनोबांचे वचन प्रत्येकालाच अनुभवास येते.

## कादंबरी हरवलेला माणूस

एकंदरच त्यांच्या लेखनात इतिहास, समाजशास्त्र, पुराण, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र या सर्वांचे एकत्रीकरण दिसून येते. माझ्या मते, कोणत्याही विषयाचा एकरेषीय विचार करून आपल्याला त्या विषयाचे नेमके भान येत नाही तर आंतरज्ञानशाखीय चिंतन करून केलेली मांडणी असेल तरच जीवनाचे सगळे पैलू उलगडतात.

भैरप्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये मला हा घटक महत्त्वाचा वाटतो. अशा विचारातून लेखन होते तेव्हा स्वाभाविकच तो केवळ मनोरंजनाचा भाग राहत नाही तर माणसाला अंतर्मुख करणारा, चिंतनशील बनवणारा भाग ठरतो. जीवनावर गांभीर्याने विचार करण्याची प्रवृत्ती अशा कादंबऱ्यांमधून दिसते. भैरप्पांच्या कादंबऱ्या हे याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणाव्या लागतील.

पान २ वरून

## शब्द खेळांचे सांगती अर्थ

परीक्षा जसजशा जवळ येतात, तसतशी अनेक विद्यार्थ्यांची मनःशांती ढळते. विद्यार्थ्यांच्या मनावर परीक्षेचं दडपण येतं. अभ्यास भरपूर असतो, वेळ मर्यादित. अशा वेळी गोंधळून न जाता शांत डोक्यानं अभ्यासक्रम समजून घेणं, आपल्या उपलब्ध वेळेचं योग्य नियोजन करणं, आणि रोज थोडं थोडं करून अभ्यास करणं- हेच यशाचं खरं सूत्र आहे. आपल्या कुटुंबात अनेक वेळा मतभेदाचे प्रसंग येतात. कामाच्या ठिकाणी किंवा आपले मित्र आणि सहकारी यांच्याशी देखील संघर्षाचे प्रसंग निर्माण होतात. भावनांचा उद्रेक होतो. पण अशा वेळी तात्काळ प्रतिक्रिया देण्यापेक्षा थोडं थांबणं, समोरच्या व्यक्तीची भूमिका समजून घेण्याचा प्रयत्न करणं, आणि संवादाचे दरवाजे खुले ठेवणं या गोष्टींमुळे नातेसंबंध पुन्हा सुरळीत होऊ शकतात. तिथेच तर 'परिस्थितीचा आदर' येतो. आणि शांत डोकं नात्यांची वीण घट्ट करतं. ध्यान, योग आणि अध्यात्म हे सुद्धा आपल्याला हेच सांगण्याचा प्रयत्न करीत असतात की वर्तमानात जगासमोर आलेली परिस्थिती स्वीकारा, भावनांचं निरीक्षण करा. दिव्या देशमुखच्या डावांतून, विराट कोहलीच्या विचारांतून, आणि द्रविड, गावस्कर, कपिल यांच्या उक्ती आणि कृतीतून एक गोष्ट आपल्याला उमजते. यश हे कौशल्य, नियोजन आणि विपरीत परिस्थितीतही आपलं डोकं शांत ठेवणं या त्रिसूत्रीच्या पायावर उभं असतं. हा मंत्र आयुष्याच्या प्रत्येक वळणावर उपयोगी पडणारा आहे. कधी डाव आपल्या विरोधात जाईल, कधी मैदान आपलं होईल. पण मन जर शांत असेल, तर कुठलीही परिस्थिती आपल्याला हरवू शकत नाही.

पान ४ वरून

## शरदातल्या चंदेरी आकाशाचे रुपेरी कवडसे

ही दोन्ही कामे तेच करतात हे महत्त्वाचे. सुरुवातीच्या काळात कोजागिरी म्हटली की शाळेतील मास्तरने दरवर्षी आवर्जून हिरकणीची कथा सांगावी आणि रात्रीच्या चांदण्यात ज्यांचा आवाज बरा आहे अशा कोणी ताई किंवा काकू यांनी पुढाकार घेत, शारद सुंदर चंदेरी राती अशा गाण्यापासून सुरुवात करून पुढे ती मैफिल खोया खोया चांद, चंदा मामा से प्यारा मेरा मामा, चांद चुरा कर लाया हु, चंद्र आहे साक्षीला अशा गाण्यातून पुढे न्यावी. आजच्या काळात कोजागिरीच्या दिवशी कोणते गाणे म्हटले जातात ते मी न सांगितलेले बरे. पण अजूनही कोजागिरीच्या निमित्ताने घराच्यावर बसून अनेक लोक कोजागिरीच्या चांदण्याचा आनंद घेतात त्यानिमित्ताने एकत्र येतात, चुलीची जागा गॅसने घेतली तरी त्या दुधातील गोडवा कायम आहे असे निश्चितपणे म्हणता येईल नाही का? जशी अश्विनातली पौर्णिमा विशेष असते तशीच अश्विन अमावस्याही सर्वपित्री अमावस्या या विशेषणाने ओळखली जाते. सर्वपित्री अमावस्येच्या गर्द काळोख्या रात्री किती पित्र येऊन जेवून जातात? ते मला माहित नाही मात्र त्या दिवशीचे चांदणे विलोभनीय असते. शरदाच्या या चांदण्यात चकोर पक्षी न्हाऊन घेतो. चंद्राकडे पहात चंद्राचे विखुरलेले तुकडे म्हणून रात्रीच्या अंधारात काजव्यांचे भक्षण करणार्या चकोर पक्षाला तो चांदणे पिऊन जगतो असे का म्हटले जात असावे ते कळत नाही. शरदातील कार्तिक पौर्णिमा ही त्रिपुरारी पौर्णिमा म्हणून ओळखले जाते. दिव्याच्या झगमगटात रात्र उजळून काढण्याचे काम या दिवशी केले जाते. कार्तिक अमावस्येला दिवे लावून लक्ष्मीचे स्वागत केले जाते. या रात्री आकाशात होणारी आतिषबाजी शरदाच्या चांदण्याला निश्चितपणे एका दिवशी पूरती का होईना पण तुल्यबळ लढत देते हे नक्की. एकंदरीत शरदाचे चांदण्याची भुरळ सर्वांना पडलेली असते. अशा चांदण्यात फिरताना हळुवार थंड हवेचे एखादी झुळूक अंगावरती शहरा उमटवते, काजव्यांची जत्रा एखाद्या बाभळीच्या झाडावर उतरलेली असते. त्या झाडावर जणू कोणीतरी चांदणे ओतले आहे असे वाटू लागते आणि रात्रीस खेळ चाले या धुंद चांदण्यांचा, संपेल ना कधीही हा खेळ सावल्यांचा अशा एकांत निवांत जाणीवेसह चराचरातील प्रत्येक घटक चांदण्यांमध्ये भिजून मोहक दिसला पाहिजे म्हणून पंडित भीमसेन जोशी यांच्या स्वरात म्हणावेसे वाटते हे सुरांनो चंद्र व्हा, चंद्र व्हा!!!

# मानवाचे निसर्गाशी लुप्त होत चाललेलं नातं !

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com




निसर्गाचा मानवावरील मालकी हक्क म्हणजे नेमके काय? मानवाचे निसर्गाशी असलेलं नातं कमी झालंय आणि त्याचा पृथ्वी नामक ग्रहावर आणि तेथे वास्तव्यास असलेल्या मानव प्रजातीवर तीव्र परिणाम झालाय.

**काही महत्वाचे मुद्दे -**

(१) इसवी सन १८०० पासून मानव-निसर्ग सान्निध्यात सुमारे साठ टक्के घट झालीय. याचे संशोधक अनुभवाचा लोप होणे असं वर्णन करतात. जसे की विशिष्ट प्राणी किंवा वनस्पती नामशेष होतात, त्याचप्रमाणे काही मानवी अनुभवही पूर्णपणे नाहीसे होऊ शकतात.

**उदाहरणे:**

एखाद्या शहरातील विशिष्ट संस्कृती किंवा पारंपरिक चालीरीती पूर्णपणे नाहीशा होणे. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे काही जुने अनुभव आता लोकांना मिळत नाहीत, जसे की पूर्वीच्या काळात रेडिओ ऐकणे किंवा पत्र लिहिणे. एखाद्या व्यक्तीने भूतकाळात घेतलेला कोणताही विशेष अनुभव, जो आता त्याच्या जीवनात परतून येऊ शकत नाही.पर्यावरणाच्या सान्निध्यात खंड पडला की स्वास्थ्यावर परिणाम होतो, परस्पर विश्वास उणावतो आणि मालकी हक्काची भावना लोप पावते. हिरवाई, भूपृष्ठावर आधारित ज्ञानवर्धन गमावत जाणे आणि तंत्रज्ञानामुळे दुरावत जाणे हे अपरिहार्य होत जातं. निसर्गाची मालकी या संकल्पनेत काळजी, जबाबदारीचे विभाजन आणि परस्परसंवाद सारं काही येतं. यूकेतील डर्बी विद्यापीठात काम करणाऱ्या संशोधकांनी यंदा संशोधन छापलं की १८०० सालापासून आजवर माणसाच्या निसर्ग सान्निध्यात आजवर साठ टक्क्यांवरून घट झालेली आहे. काही प्रातिनिधिक निकषांचा विचार करून त्यांनी हे निष्कर्ष काढलेले आहेत- निसर्गाशी जोडल्या गेलेल्या शब्दांचा वापर (उदा- नदी, शेवाळं, मोहोर (ऋतूंमधील बहर) कमालीचा उतरणीला लागलाय. पुस्तकांमध्येच नव्हे तर शहरीकरण, वन्यजीवनाशी कमी झालेली जवळीक आणि पालक आपल्या पाल्यांना निसर्गाचा परिचय करून देण्यात कमी पडताहेत. संशोधक यालाच अनुभवांचा लोप /समाप्ती असं नांव देतात. याचा गहिरा परिणाम आपल्या निसर्ग समस्या सोडविण्यावर होणार आहे.

मानवाची व्यक्तिगत बांधिलकी स्थानिक पर्यावरणाशी निगडित असल्याने पर्यावरणीय बदल आपण कसे हाताळतो यांवरही बरंच अवलंबून आहे- ग्राहक म्हणून आणि मतदाते म्हणून आपल्या निवडी यांवर प्रचंड प्रभाव टाकणाऱ्या असतात. निसर्ग सानिध्यातील घट आपोआप आपलं आणि निसर्गाचं संयुक्त भवितव्य डागाळणार आहे. मानवी मानसिकतेशी आणि परस्पर संवादांशी हे सारं अदृश्यपणे जोडलेलं आहे. वाढत्या अविश्वासाच्या युगात, एकाकीपणात,सामाजिक संदर्भात, मोठ्या औद्योगिकीकरणामुळे किंवा इतर कारणांमुळे व्यक्तीला समाजापासून किंवा लोकांपासून तुटल्यासारखे वाटण्यात आणि उसवत जाणाऱ्या समाजजीवनात या सान्निध्याची नको तितकी गरज पडणार आहे.

**(२) निसर्गाची मालकी म्हणजे काय?**

मालकी हक्काबद्दल चर्चा सुरु असताना आपण स्वाभाविकपणे मानवी संबंध गृहीत धरतो. कुटुंब प्रणाली, मित्रांचे वर्तुळ, शाळा, कार्यस्थळ आणि शेवटी समाज यांची वर्तुळे भोवताली असतात. पण निसर्गात यापेक्षा अधिक काही अभिप्रेत असते. अनेक तज्ञांशी चर्चा केल्यावर, सखोल आयुष्य जगलेल्या व्यक्तींचे निरीक्षण केल्यावर असं जाणवतं की हे मालकीचे बंध केवळ सामाजिक नसतात. आपण आपल्या भौतिक विश्वाशी कसे जोडले गेलेलो असतो, गावामध्ये रुतलेली मुळे, भवतालाच्या गंधात रममाण झालेलं मन आणि वास्तव्य करतो ते ठिकाण/ तो परिसर (भलेही ते सौंदर्याच्या व्याख्येत बसत नसले तरीही) यामध्ये गुंतणे याला निसर्गाची मानवावरील मालकी म्हणतात.

अलीकडच्या अनेक संशोधनांनी असं सिद्ध केलंय. हिरवाईत आणि निळाईत नियमित वेळ घालविणे मानवी चिंताग्रस्ततेला आणि नैराश्याला कमी करते. मूड/ मनःस्थिती सुधारते, आकलन वाढविते आणि सुखनिद्रेला आमंत्रित करते. निसर्गात घालविलेला वेळ बालकांच्या नवसर्जनाला वाव देतो, मेंदूच्या कार्यकारी क्षमतेला जोड देतो ज्यायोगे जटील समस्या सुटू शकतात, एकाग्रता वाढते (बागेत होणाऱ्या चित्रकला स्पर्धा), चिंतनाची सवय लागते आणि कॉर्टिसॉल या तणावनिर्मितीस कारणीभूत असलेल्या अंतःस्त्रावाचे प्रमाण कमी करतो. या साऱ्याचा लाभ जोडून घेण्यास होतो. जेव्हा आपल्या भवतालापासून आपण विलगतो, तणावात असतो केव्हा मनोभूमीत चाललेल्या युद्धांमध्ये व्यग्र असतो तेव्हा आपले श्रवण मंदावते, काळजी घेणे दुरावते आणि इतरांच्या जोड्यात स्वतःचे पाऊल टाकून बघण्यास आपण धजावत नाही.

निसर्ग आपल्या ज्ञानेंद्रियांना समृद्धी बहाल करतो, आपल्याला त्याच्या वैविध्याने आ वासायला लावतो . तेव्हा आपली इतरांशी जोडून घेण्याची क्षमता वाढते, आपले परीघ रुंदावतात आणि जीवनाला अर्थ आहे याची जाणीव होते. विभागलेल्या जबाबदाऱ्या उदा पाळीव प्राण्यांबरोबर चक्कर मारणे यातूनही भरोसा, सामाजिक वर्तन, एकसंधता वाढीला लागते.

**(३) हे परतवून लावता येईल का?**

मानवतेच्या निसर्गाशी असलेल्या नात्यामध्ये झालेली साठ टक्के घसरण ही निश्चितच गंभीर बाब आहे. पण भविष्यात हे अधिक गडद होत जाणार आहे. कृत्रिम प्रज्ञेच्या माध्यमातून कदाचित अधिक सर्वव्यापी उपकरणे बनविली जातील, आणि आपला ऑनलाईन वेळ वाढत जाईल. अंगणातील वेळ धक्का मारून माणसाच्या अखत्यारीतून घालविला जाईल आणि ज्या वास्तव्याच्या ठिकाणांशी आपण जोडलेलो असतो, तेथून विस्थापित केले जाऊ. म्हणून तरी हिरवाईशी असलेल्या नात्यात खंड पडलेला असला तरी पुन्हा हातमिळवणी करणे गरजेचे आहे. त्याहीपेक्षा अधिक महत्वाचे आणि मूलभूत आहे निसर्गाच्या प्रेमात पडणे.

वृक्ष लावणे हा मानवी अस्तित्वाशी निगडित असा मूलमंत्र आहे, तो जीवनाचा मतितार्थ आहे. जंगल केवळ प्राणवायूचा पुरवठा करीत नसते तर तो वन्यप्राण्यांचे निवासस्थान असते, गोंगाटाला दूर ठेवीत असते आणि खाद्यपदार्थांचा स्रोत असते. झाडाच्या सावलीत वन आणि मानवी शहाणीव दोघांनाही छप्पर गवसते. झाड केवळ सावली देत नाही तर आपली पाळेमुळे जमिनीत खोलवर रुजविते. जंगल वाचविणे म्हणजे तेथील औषधी वनस्पतींचा खजिना वाचविणे, पावसाला छत पुरविणे आणि वन्यजीवांना आवाज पुरविणे असते. विभाजित झालेल्या या काळात एकमेकांशी जोडले जाणे महत्वाचे बनलेले आहे. शाश्वत वगैरे आजकालचे शब्द आहेत पण खरेतर आपण आपल्या वास्तव्य स्थानांशी घट्ट बांधलेले असतो त्यामुळे त्याची काळजी घेणे हि आपली जबाबदारी असते. निसर्गाकडून भरणपोषणाच्या भेटवस्तू स्वीकारणे, जमीन-पाणी यांच्या कडून मिळणारी ऊर्जा, प्रेरणा परतफेडीसाठी असते हे ध्यानी ठेवायला हवे. परस्परसंवादाच्या नात्याकडे कसे बघायचे हे शिकणे आता महत्वाचे बनलेले आहे. काही उपाय आहेत आणि ते विविध मार्गांनी जगभर अवलंबिले जाताहेत. कॅनडा मधील मॅनिटोबा प्रांतात विद्यार्थी निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन पर्यावरणाबद्दल माहिती मिळवतात. शेती करणे, मातीची गुणवत्ता तपासणे, वनस्पती वाढवणे आणि एकूणच जमीन व्यवस्थापनाचे ज्ञान तेथे दिले जाते. मासेमारी, नैसर्गिक औषधे आणि स्थानिक इतिहास, पारंपरिक भाषेतून शिकविला जातोय. मानव-निसर्ग नातं असं एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केलं जातंय. अनेक व्यावहारिक उदाहरणांच्या माध्यमातून हे सर्वदूर पसरविणे सहजसाध्य आहे. उदा. डेन्मार्क मध्ये वनशाळा नामक उपक्रम अत्यंत यशस्वीपणे चालविला जातो. तेथे विद्यार्थी निसर्गाने वेढलेल्या वातावरणात गणित, विज्ञान, सामाजिक कौशल्ये शिकतात. आपल्याकडे रवींद्रनाथ टागोरांनी शांतिनिकेतन याच तत्वज्ञानावर उभारले. शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, छोटी उद्याने, परागीकरणासाठी राखीव पट्टे, वन्यजीवांसाठी आरक्षित मार्ग असे उपक्रम प्राधान्याने हाती घेता येतील. बालवाडीपासून बागकाम शिकविले तर बालकांमध्ये पर्यावरणाबद्दल आत्मीयता निर्माण होईल. हात मळले की ज्ञान वाढेल, स्वास्थ्यवर्धक सवयी वाढीला लागतील.

पडीक जमीन हा जर प्रश्न असेल तर तिच्यावर वृक्षारोपण करणे हे त्या प्रश्नाचे उत्तर आहे. झाडांची खूप जपणूक करावी लागते कारण ती विश्व वाचविण्यामध्ये मग्न असतात. झाडांचे पुनर्रोपण करणे म्हणजे फक्त एका भूप्रदेशातील झाडे दुसऱ्या मातीत लावणे नसते तर ते भावी पिढ्यांसाठीच आनंदाचे औक्षण असते. उद्याचे भवितव्य खचितच काँक्रिट नसून जमिनीतून उगवलेले रसरशीत कोंब असणार आहे. कारण अस्फाल्टमध्ये बनविलेल्या रस्त्यापेक्षा दुतर्फा झाडे असलेला मार्ग अधिक जिवंत आणि सळसळता असतो. काँक्रिटने चोरलेल्या भवितव्याला झाडे आपल्या हिरव्यागार पर्णराशीतून श्वासोच्छश्वास घ्यायला शिकवितात.

पाण्याविना जंगल तडफडून मरते आणि दोन्ही (पाणी आणि जंगल) नसलेले जग निरर्थक/ असून नसल्यासारखे असते. कारण जंगल आणि पाणी एकत्रितरित्या सोनंही विकत घेऊ शकत नाही, ते असतं प्रत्यक्ष जीवन!

शहरांमध्ये काँक्रिट व अस्फाल्टने प्रायः रस्ते बनविलेले असतात आणि विशेषतः उन्हाळ्यात त्यांचे तापमान वाढते. तेथे वृक्षारोपण केले की पर्यावरण तापमान घटते. केवळ एक वृक्ष रस्त्याचे तापमान दोन अंश सेल्सियसने कमी शकतो. शहरात वास्तव्य असणाऱ्यांना हा किती मोठा दिलासा आहे. एखाद्या वृक्षाने वाऱ्याची बहाल केलेली झुळूक आपल्या अंगणाला गारवा देते आणि मग ते इवलेसे अंगण एखाद्या अभयारण्याचे रूप धारण करते. म्हणूनच कि काय बरीच शहरे हरित संरचनेवर (ग्रीन डिझाईन) वर दृष्टिकोन केंद्रित करीत आहेत. झाडे आणि वेली यांचे रोपण पर्यावरणात वाढवीत आहेत. हा रंग केवळ सौंदर्य बहाल करतो असे नाही तर तो डोळ्यांना एक सुखद गारवा देतो. मग हवेची गुणवत्ता वाढते आणि रस्त्यावरील पांथस्थांना सावली देतो. सगळं शहरच मग देखणं होऊन जातं. ऊर्जेचा अपव्यय टाळण्यास वृक्षराजी हातभार लावते. नैसर्गिक गारव्यामुळे वातानुकूलन यंत्रांचा वापर उणावतो इतकेच काय तर पंख्यांचीही गरज कमी होते.

बचतीच्या मार्गाने शहरे निघाली की ती आपोआप निरामय, संतुष्ट आणि शीत होत जातात. माथ्यावर सावली, फळे खाली आणि भोवताली स्वच्छ हवा अशी निसर्गाने केलेली संरचना खास आनंदासाठी केलेली असते. आपल्यासाठी शांतपणे कामात गढलेला एकमेव घटक म्हणजे अंगणातील झाड- श्वास देणारे, फळ देणारे आणि संतुलनही बहाल करणारे!

शहरांमध्ये रस्त्याच्या कडेला वृक्षारोपण करणे, छोटी उद्याने, परागीकरणासाठी राखीव पट्टे, वन्यजीवांसाठी आरक्षित मार्ग असे उपक्रम प्राधान्याने हाती घेता येतील. बालवाडीपासून बागकाम शिकविले तर बालकांमध्ये पर्यावरणाबद्दल आत्मीयता निर्माण होईल. हात मळले की ज्ञान वाढेल, स्वास्थ्यवर्धक सवयी वाढीला लागतील. आपण निसर्गाला आव्हान देण्यासाठी किंवा पर्याय म्हणून तंत्रज्ञानाचा वापर किंवा नवीन संरचनांचे शोध न लावता त्यामुळे मानव-निसर्ग साखळी कशी मजबूत होऊ शकते यासाठी झटायला हवे. आपण टाकलेली पावले जशी एखाद्या ॲप च्या मदतीने मोजता येतात तस्सा आपण रोज घरात आणि सूर्यप्रकाशात किती वेळ घालवितो याचे मापन करता आले पाहिजे. जंगलाचे वाटाडे किंवा नकाशे याबाबत उपयुक्त ठरतील.

वैद्यकीय व्यवसायातील मंडळी औषधांव्यतिरिक्त गरजा- एकाकीपणा, चिंता, आर्थिक अडचणी ओळखून त्यासाठी उपचार लिहून देतात, याला सोशल प्रिस्क्राइबिंग म्हणतात. याचा वापर आता वाढायला हवा म्हणजे बागकाम, आनंदासाठी हिंडणे ( हायकिंग) यांच्या मदतीने चिंता, खंत अशा नकारार्थी संवेदना कमी व्हायला मदत होते. सुरुवात स्वतःच्या अंगणापासून अथवा परसदारापासून व्हायला हवी. निसर्ग सान्निध्याची स्वतः पुरती, कुटुंबापुरती सोय तिथे करता येते. जाणीवपूर्वक प्रयत्न करून घरापर्यंत आलेला निसर्ग, स्वतःच्या आतपर्यंत नेता आला पाहिजे. या मोठ्या पसाऱ्यातील आपले स्थान शोधून काढून किंवा निर्माण करून निसर्गाची सोबत अट्टाहासाने जगता आली पाहिजे. सगळ्या निराशाजनक वातावरणात काही आशेची किरणे शोधता आली पाहिजेत. डर्बी विद्यापीठाला अलीकडे निसर्गविषयक शब्दांच्या संख्येत लक्षणीय वाढ होताना दिसली. तोत्तोचान नाटकात प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत स्वतःचे एक स्वतंत्र झाड बहाल करण्याची सुंदर कल्पना आहे. शाळेत अलीकडे स्वहस्ते पिटुकल्या गणेशमूर्ती बनविण्यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. नैसर्गिक जगताचा नव्याने परिचय तितकाच महत्वाचा आहे कारण कार्बन उत्सर्जन (वातावरणात कार्बन डायऑक्साइड आणि मिथेन यांसारखी संयुगे सोडणे, ज्यामुळे पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकून जागतिक तापमानवाढ होते आणि हवामान बदलासारख्या समस्या निर्माण होतात. ही प्रामुख्याने जीवाश्म इंधने जाळल्याने होणारी एक प्रक्रिया आहे आणि याला प्रदूषणासमान मानले जाते.) हि समस्या भविष्याला गिळंकृत करण्याइतपत अजस्त्र आहे. जैव विविधता जपणे आणि तिचे महत्व शाळेपासून समजावून सांगणे तितकेच अगत्याचे आहे.

आपण ज्याला घर म्हणतो, त्या फक्त चार मर्यादित भिंती नसून हे विश्वचि माझे घर या संकल्पनेपर्यंत खऱ्या अर्थाने पोहोचायचे असेल तर आतापासूनच सुरुवात करायला हवी. वर्षभरात २२ किलो कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेणारा एक वृक्ष बदल्यात मला फक्त प्रेम द्या एवढंच विनवत असतो.

उष्णता वाढायला लागली की सावली पेरायची असते, तक्रार करायची नसते. वातानुकूलन यंत्रणा बंद जागेतून उष्णता काढून टाकून हवा थंड करते आणि हवेतील आर्द्रता नियंत्रित करते, ज्यामुळे आतील तापमान आरामदायक राहते तद्वत वृक्ष, निसर्ग जगाचे तापमान आल्हाददायक करीत असतात. जपानमधील संशोधनातून कळतं की,तीन दिवस जंगलात घालवल्याने कॅन्सर प्रतिकारक्षमता वाढू लागते.

शिनरिन-योको (जंगलात रमणे) या जपानी पद्धतीने जंगलात तीन दिवस घालवल्याने नैसर्गिक रोगप्रतिकारक पेशी ८० टक्क्यांपर्यंत अधिक सक्रिय होतात. या पेशी कर्करोग आणि विषाणूंशी लढतात. पेशींची ही वाढलेली सक्रियता जंगलातून परतल्यानंतर किमान एक आठवडा ते कमाल एक महिना टिकते.

देवदार आणि पाइनच्या झाडांमधील फायटोन्साइड्स - झाडांमधून निघणारे खास सुगंधी रसायन (उदा., अल्फा-पायनीन, लिमोनीन) श्वासाद्वारे शरीरात जातात आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात.

- निसर्गात वेळ घालविल्याने तणाव कमी होतो आणि रोगप्रतिकारक शक्ती सुधारते.
- इतर फायदे : जंगलात रमण्याने रक्तदाब कमी होतो, मूड सुधारतो आणि कर्करोगाशी लढणारी प्रथिने (उदा., पर्फोरिन, ग्रॅन्झाइम्स) वाढतात.

जंगलातील पाण्याचे झरे, नद्या, असंख्य जीव हा विनामूल्य खजिना असतो.

राजकीय, सामाजिक आणि पर्यावरणीय पेचप्रसंग भविष्यात हा पृथ्वीनामक ग्रह येणाऱ्या पिढ्यांसाठी जतन करू शकणार आहोत कां आणि असल्यास कसा हे प्रश्न आपल्याला जितक्या लवकर पडतील तितके श्रेयस्कर कारण उत्तरे आपल्यालाच शोधायची आहेत. कारण समस्या निर्माण करणारा तिच्या निराकारणापासून सगळ्यात जास्त जवळ असतो.

चिलीच्या वाळवंटात यंदा दशकभराने सुंदर फुले उमलली आहेत हा किती विसाव्याचा क्षण आहे. असे आश्वासक दृश्य वारंवार आणि मोठ्या प्रमाणात दिसले तर आपल्या भावी पिढ्या आपल्याला नक्कीच दुवा देतील. डॉ. जेन गुडाल यांचे नुक्तेच निधन झाले आहे. त्याबाबत सगळ्यांना दुःख होणे स्वाभाविक आहे आणि प्रत्येकाला ते आपापल्यापरीने अनुभवण्याचा अधिकार आहे. पण त्यांचे नैसर्गिक विश्वावरचे प्रेम आपल्या अंगी बाणण्यासाठी आपण स्वतःला निसर्गात विलीन केले तर तीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

---



# ग्लोबल वॉर्मिंगनंतर हिमयुग

**सध्या जागतिक हवामान बदलाची चर्चा सुरू आहे; मात्र यानंतर हिमयुग अवतरण्याची शक्यता आहे. अलिकडेच कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या संशोधकांनी पृथ्वीच्या नैसर्गिक कार्बनचक्रातील एक मोठी त्रुटी शोधून काढली. ही त्रुटी पृथ्वीच्या तापमानात असामान्य बदल कसे होऊ शकतात आणि दीर्घकालीन जागतिक तापमानवाढीनंतर हिमयुगासारखे अत्यंत थंडीचे युग कसे येऊ शकते, हे स्पष्ट करण्यास मदत करते.**

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे


पृथ्वीचे तापमान प्रामुख्याने खडकांच्या नैसर्गिक क्षरणामुळे नियंत्रित होते. या प्रक्रियेत पाऊस वातावरणातून कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतो. पावसामुळे तो खडकात मिसळतो. खडक हळूहळू विरघळतात आणि कार्बन आणि कॅल्शियमच्या रूपात समुद्रात पोहोचतात.

समुद्रात हे कार्बन साठे एकत्र होऊन शंख, कोरल आणि चुनखडीचे खडक तयार होतात. त्यामुळे समुद्राच्या तळावरील कार्बन दीर्घकाळ स्थिर राहतो. शास्त्रज्ञांनी या कार्बनचक्राचा एक नवीन पैलू शोधला आहे. तो पृथ्वीला अत्यंत थंड वातावरणाकडे ढकलू शकतो. पृथ्वी गरम होताना खडकांची झीज वेगाने होते. त्यामुळे जास्त कार्बन डाय ऑक्साईड शोषले जाते आणि वातावरणातून ते बाहेर पडते. यामुळे पृथ्वी थंड होते. संशोधकांनी म्हटले आहे की, पृथ्वी गरम होताना खडक कार्बन जलद शोषून घेतात आणि पुन्हा थंड करतात. जुने भूगर्भीय पुरावे दर्शवतात की, पृथ्वीचे सुरुवातीचे हिमयुग इतके तीव्र होते की, संपूर्ण ग्रह बर्फाने झाकलेला होते.

संशोधकांना आढळून आले आहे की, समुद्रातला कार्बन संचय या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावतो. वातावरणातील कार्बन डाय ऑक्साईड वाढत असताना आणि पृथ्वी गरम होत असताना फॉस्फरससारखे अधिक पोषक घटक समुद्रात जातात. हे पोषक घटक प्लँक्टनच्या वाढीस चालना देतात. प्लँक्टन सूर्यप्रकाशाच्या मदतीने कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. प्लँक्टन मरतात, तेव्हा त्यांचे शरीर कार्बनसह समुद्राच्या तळाशी पडते आणि कार्बन कायमचा साठवला जातो; पण उष्ण, पोषक तत्त्वांनी समृद्ध महासागरांमध्ये ऑक्सिजनची पातळी कमी होते. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे समुद्राच्या तळाशी जमा होण्याऐवजी फॉस्फरसचा समुद्रात पुनर्वापर केला जातो. अधिक पोषक तत्त्वे, अधिक प्लँक्टन, अधिक कार्बन संचय, अधिक थंड होणे ही प्रक्रिया हळूहळू संतुलित होण्याऐवजी पृथ्वीला अत्यंत थंड होण्यास कारणीभूत ठरू शकते. या प्रक्रियेचे स्पष्टीकरण देताना संशोधक सांगतात की, तुम्ही आपल्या घरात एअर कंडिशनर (एसी) चालू करून तापमान २५ अंश सेल्सिअसवर ठेवू इच्छिता. बाहेरील तापमान वाढल्यास एसी अधिक थंडी निर्माण करतो. काही प्रकरणांमध्ये ही थंडी जास्त असू शकते. त्याचप्रमाणे पृथ्वीचा थर्मोस्टॅट कधी कधी जास्त थंडी निर्माण करतो. संशोधनात असेही आढळून आले आहे की, प्राचीन काळात वातावरणातील ऑक्सिजनची पातळी खूपच कमी होती. त्यामुळे हे थर्मोस्टॅट आणखी अनियमित आणि अस्थिर बनले. म्हणूनच मागील हिमयुग इतके तीव्र होते. आज उच्च ऑक्सिजन पातळी बदलाचा परिणाम कमकुवत करेल; परंतु तरीही पुढील हिमयुगाच्या प्रारंभास काही प्रमाणात विलंब होऊ शकतो. याचा अर्थ असा आहे का, की मानववंशीय जागतिक तापमानवाढीनंतर पृथ्वी पुढील हिमयुगात प्रवेश करू शकतात? याबाबत संशोधकांचे म्हणणे हो असे आहे; परंतु ते लवकर होणार नाही. त्यांचे मॉडेल असे सूचित करते की, जास्तीत जास्त थंडी असा परिणाम नक्कीच निर्माण करेल; परंतु सध्याचे हवामान संकट कमी करण्यासाठी हे पुरेसे नाही. संशोधन पत्रात म्हटले आहे की, पुढील हिमयुग ५०हजार वर्षांमध्ये सुरू होईल की दोन लाख वर्षांमध्येहा खरा प्रश्न आहे.

पृथ्वीचे नैसर्गिक थर्मोस्टॅट या आयुष्यात आपल्याला मदत करू शकत नाही. या संशोधनातून स्पष्ट होते की, पृथ्वीवरील नैसर्गिक प्रक्रिया गुंतागुंतीच्या आहेत. जागतिक तापमानवाढीच्या सध्याच्या युगात आपल्या क्रियाकलापांवर आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण ठेवणे आपल्यासाठी अत्यावश्यक आहे. नैसर्गिक प्रणाली अखेरीस ग्रह थंड करतील; परंतु ही प्रक्रिया खूप मंद आहे आणि त्याचे परिणाम आपल्या आयुष्यात जाणवणार नाहीत. म्हणूनच सतत प्रयत्न आणि जागरूकता ही आजची सर्वात तातडीची गरज आहे.

शास्त्रज्ञांचा विश्वास आहे की, आपल्याला अजूनही आपल्या उत्सर्जनावर नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे. हे खरे आहे की उष्ण झालेली पृथ्वी पुन्हा कधी तरी थंड होईल; परंतु ती इतकी मंद असेल की या पिढीला त्याचा काहीही उपयोग होणार नाही. म्हणून आपल्याला आजच कृती करण्याची गरज आहे, कार्बन उत्सर्जन कमी करणे, पर्यावरणपूरक वातावरण निर्माण करणे आणि शाश्वत ऊर्जास्रोतांकडे



वाटचाल करणे. जागतिक तापमानवाढ उलटवल्याने थेट हिमयुग सुरू होण्याची शक्यता नाही. त्याऐवजी पृथ्वीचे नैसर्गिक चक्र आणि हरितगृह परिणाम पुढील हिमयुग सुरू होण्यास विलंब करू शकतात, जे पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये अपेक्षित आहे. काही सिद्धांत सूचित करतात की, जागतिक तापमानवाढ समुद्राच्या प्रवाहांना, विशेषतः गल्फ स्ट्रीमला विस्कळीत करून हिमयुग सुरू करू शकते. त्यामुळे युरोपमध्ये नाट्यमय थंडी पडते.

कार्बन डाय ऑक्साईडचे उत्सर्जन ताबडतोब थांबले, तरी सध्याच्या जागतिक तापमानवाढीचे आणि महासागरातील बदलांचे परिणाम पुढील हजार वर्षांमध्ये अपरिवर्तनीय असतील. आपल्या आयुष्यात हिमयुग सुरू होणे अशक्य होईल. १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला सलग अनेक वर्षी थंडी जास्त होती, तेव्हा काही शास्त्रज्ञांनी तापमानातील घट ही पृथ्वी एका नवीन हिमयुगात प्रवेश करत असल्याचे लक्षण आहे, असा अर्थ लावला; परंतु त्या दशकाच्या अखेरीस भाकिते उलटली आणि तज्ज्ञ वाढत्या तापमानाबद्दल काळजी करू लागले. तेव्हापासून सरकारे आणि पर्यावरणीय गट वातावरणातील हरितगृह वायू आणि जागतिक तापमानवाढ कमी करण्यासाठी सार्वजनिक ऊर्जेच्या वापरात नियम आणि बदल करण्यासाठी दबाव आणत आहेत. आपण आपल्या ऊर्जावापराच्या सवयी बदलण्याचा प्रयत्न करत असताना काही शास्त्रज्ञ प्रश्न विचारत आहेत की, जागतिक तापमानवाढ खरोखरच काही उद्देश पूर्ण करत आहे का? ही वाढती उष्णता आपल्याला दुसऱ्या हिमयुगात प्रवेश करण्यापासून रोखत आहे का आणि आपण ही प्रक्रिया उलट केली, तर पुन्हा एकदा बर्फाने झाकले जाऊ का? अतिथंडी आणि उष्णता पृथ्वीच्या इतिहासात नवी नाही. एक अब्ज वर्षांपासून पृथ्वीने उष्णता आणि थंडीच्या कालावधीत तापमानात आलटून पालटून मंद चढ-उतार अनुभवले आहेत. समुद्राचे प्रवाह, सूर्याभोवती पृथ्वीच्या कक्षेत बदल आणि वातावरणीय रचना यासह अनेक घटक याला जबाबदार आहेत. यापैकी काही कालखंड इतरांपेक्षा जास्त तीव्र होते.

हिमयुग नावाच्या तीव्र शीतलहरीही येऊन गेल्या आहेत. त्या दरम्यान विशाल हिमनद्यांनी पृथ्वीचा बराचसा भाग व्यापला होता. हिमयुगांदरम्यान पृथ्वी सामान्यतः सापेक्ष उष्णतेच्या काळात प्रवेश करते, त्याला आंतरहिमयुग म्हणतात, जे आपण गेल्या १२ हजार वर्षांपूर्वीच्या हिमयुगाच्या समाप्तीपासून अनुभवत आहोत. आता दिसते की आपण तापमानवाढीच्या ट्रेंडमध्ये आहोत. अनेक शास्त्रज्ञांच्या मते तो पृथ्वीच्या वातावरणात उष्णता अडकवणाऱ्या हरितगृह वायूंचा परिणाम आहे. एका विचारसरणीच्या मते तापमानवाढ करणारा ग्रह म्हणजे असा ग्रह, जो हिमयुगात संपण्याची शक्यता कमी असते. पृथ्वी नेहमीच उष्ण आणि थंड चक्रातून जात असते. शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे की, पुढील दहा हजार ते एक लाख वर्षांमध्ये कधी तरी आपल्याला आणखी एका मोठ्या थंडीचा सामना करावा लागेल. असे झाले तर युरोप आणि उत्तर अमेरिकेसह जगाचा बराचसा भाग बर्फाच्या जाड चादरीने झाकला जाईल. काही संशोधकांच्या मते हरितगृह वायुच्या परिणामामुळे पृथ्वीच्या वातावरणात अडकलेली उष्णता या थंडीची भरपाई करेल. हिमयुग टाळणे ही चांगली बातमी वाटत असली, तरी संशोधकांच्या इशाऱ्यानुसार जागतिक तापमानवाढ ही सोपी कामगिरी नाही. त्याचे पृथ्वीवर इतर गंभीर आणि अप्रिय परिणाम होऊ शकतात.(लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

# भारत : पेट्रोकेमिकल महासत्ता होताना...


परराष्ट्रकारण

**संजीव ओक**

भारताने नुकतीच ३७ अब्ज डॉलर्सची मोठी गुंतवणूक पेट्रोकेमिकल क्षेत्रासाठी निश्चित केली आहे. ही गुंतवणूक म्हणजे देशाला स्वयंपूर्णतेकडे आणि जागतिक पातळी-वर भारताचे सामर्थ्य दाखवण्यासाठी टाकलेले एक निर्णायक पाऊल आहे., या पार्श्वभूमीवर भारतातील पेट्रोकेमिकल क्षेत्राची सद्यस्थिती जाणून घ्यायला हवी. पेट्रोकेमिकल उद्योग हा आधुनिक अर्थव्यवस्थेचा पाया मानला जातो. प्लास्टिक, सिंथेटिक फायबर्स, खते, औषधे, सौंदर्यप्रसाधने, इलेक्ट्रॉनिक्स, वाहने, बांधकाम अशा असंख्य क्षेत्रांमध्ये याचा वापर होतो. भारतातील मागणीत सातत्याने वाढ होत असून, सध्या देशांतर्गत उद्योग दरवर्षी सात ते आठ टक्के वेगाने वाढत आहे. तथापि, महत्त्वाच्या मध्यवर्ती घटकांसाठी भारत आजही आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे.

गेल्या दोन दशकांत जामनगर, पनिपत, हजिरा यांसारख्या प्रकल्पांनी भारताची पेट्रोकेमिकल घटकांची उत्पादन क्षमता वाढवली असली, तरीही चीनच्या तुलनेत भारत बराच मागे आहे. चीनने गेल्या दहा वर्षांत पेट्रोकेमिकल उत्पादनात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून, जागतिक बाजारात आपले वर्चस्व निर्माण केले आहे. भारताने चीनच्या या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठीच, पेट्रोकेमिकल क्षेत्रात गुंतवणूक करण्याचे निश्चित केले आहे.

केंद्राने जी गुंतवणूक केली आहे, ती स्वयंपूर्णता साध्य करण्यासाठीच. याचा थेट फायदा म्हणजे भारताची आयात कमी होईल. यामुळे विदेशी गंगाजळीत लक्षणीय बचत होताना दिसेल. याचबरोबर, ही क्षमतावृद्धी देशांतर्गत उद्योगांनाही अधिक स्थिर आणि स्पर्धात्मक करेल. भारतातील प्लास्टिक, वस्त्र, औषधे आणि वाहन उद्योगाला स्वस्तात व वेळेत आवश्यक तो कच्चा माल मिळू शकेल. यामुळे या क्षेत्रांना निर्यातीतही मोठ्या संधी उपलब्ध होतील. पेट्रोकेमिकल क्षेत्रातील वाढ ही केवळ उद्योगांच्या गुंतवणुकीवर अवलंबून नाही. सरकारने यासाठी 'पेट्रोकेमिकल ॲण्ड प्लास्टिक इन्व्हेस्टमेंट रिजन' (पीसीपीआयआर) योजना राबवली आहे. गुजरात, आंध्र प्रदेश, ओडिशा आणि तामिळनाडू येथे हे हब उभारले जात असून, नव्या धोरणांतर्गत करसवलती, पायाभूत सुविधा, पर्यावरणीय मंजुरी प्रक्रियेतील गतीसाठी विशेष उपाययोजना राबवण्यात येत आहेत. अर्थमंत्री आणि पेट्रोलियम मंत्रालयाने यंदाच्या अर्थसंकल्पात हरित रसायनांवर विशेषत्वाने भर दिला आहे.



**भारत ३७ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीसह पेट्रोकेमिकल क्षेत्रात मोठी झेप घेत आहे. स्वयंपूर्णता, ग्रीन केमिस्ट्री आणि धोरणात्मक पाठिंब्यामुळे, भारत हा आशियातील पुरवठा संतुलन बदलण्याच्या प्रयत्नात आहे. नवे तंत्रज्ञान व संशोधन भारताला 'पेट्रोकेमिकल हब' म्हणून, नवी ओळख प्रस्थापित करून देतील त्याविषयी...**

जागतिक बाजारात शाश्वत उत्पादनांची मागणी लक्षणीयरित्या वाढत आहे. त्यामुळे भारताने केवळ पारंपरिक पेट्रोकेमिकल उत्पादनावर भर देऊन चालणार नाही, तर जागतिक प्रवाहाशी सुसंगत राहण्यासाठी ग्रीन पेट्रोकेमिकल्स आणि बायो-बेस्ड केमिकल्सकडे वळावे लागेल. आयआयटी, एनआयटी यांसारख्या संस्थांमध्ये बायोपॉलिमर, ग्रीन सॉल्व्हेंट्स, कार्बन कॅप्चर तंत्रज्ञानावर संशोधन सुरू आहे. २०१५ सालानंतर पेट्रोकेमिकल संशोधन निधीची उभारणी सुरू झाली. गेल्या काही वर्षांत 'सीएसआयआर' तसेच खासगी उद्योगांच्या सहकार्याने, स्वदेशी कॅटॅलिस्ट्स, ऊर्जा बचत तंत्रज्ञान विकसित झाले आहे. या संशोधनामुळे भारताला उत्पादन खर्चात कपात करून, जागतिक स्पर्धेत उतरता येईल. आशियाई बाजारपेठेत चीन हा एकमेव प्रमुख पुरवठादार म्हणून उदयास आला आहे. तथापि, अतिउत्पादनामुळे चीनच्या उद्योगांना नफा कायम राखणे कठीण झाले आहे. याच वेळी अमेरिका आणि युरोपमध्ये ऊर्जा खर्च जास्त असल्यामुळे, उत्पादन महागडे ठरत आहे. त्यामुळेच भारताला नव्या संधीची द्वारे उघडली आहेत.

भारताची लोकसंख्या, अंतर्गत मागणी आणि तुलनेने कमी दरात उपलब्ध होणारे मनुष्यबळ, याचा फायदा उद्योगांना होऊ शकतो. २०३० सालापर्यंत भारत आशियाई बाजाराच्या सुमारे २० टक्के पुरवठा करण्यास सक्षम झाला असेल, असा अंदाज वर्तवला जात आहे. यामुळे भारत या क्षेत्रात निर्यातीसाठीही सक्षम होऊ शकतो. भारताकडे नैसर्गिक वायूचे व कच्च्या तेलाचे काही मर्यादित साठे आहेत. मात्र, गुजरात, ओडिशा आणि आंध्र प्रदेशमध्ये उभारल्या जाणाऱ्या प्रकल्पांसाठी एलएनजी आयात टर्मिनल, पाईपलाईन, स्टोरेज सुविधा यांचे जाळे उभारले जात आहे. याचबरोबर देशात कोल-गॅसिफिकेशन, मिथेनॉल-टू-ओलेफिन्स, कार्बन कॅप्चर यांसारख्या नव्या तंत्रज्ञानावर संशोधन सुरू आहे. ३७ अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीमुळे विविध क्षेत्रात लाखो रोजगार निर्माण होतील. या महासंकल्पात संधी असल्या, तरी त्यासोबतच काही आव्हानेही आहेत.

रसायन उद्योगामुळे पाणी व हवेच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे पर्यावरणीय सुरक्षेसाठी योग्य त्या उपाययोजना राबवाव्या लागतील. कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी चढउतार होत असल्याने, उत्पादन खर्चातही त्याच प्रमाणात बदल होतो. बंदरे, रेल्वे, पाईपलाईन यांचा अभाव हा सर्वांत मोठा अडथळा ठरणार आहे.

नवी बंदरे विकसित करण्यात येत असली, तरी त्या वेगाला काही मर्यादाही आहेत. तसेच, चीनच्या सध्याच्या क्षमतेला सामोरे जाणे ही सोपी बाब नाही. १९९५ साली भारताने पहिला पेट्रोकेमिकल हब, गुजरातमध्ये उभारण्याचा प्रयत्न केला. २०१० सालानंतर 'रिलायन्स', 'आयओसी', 'एचपीसीएल' यांसारख्या कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून, उत्पादन क्षमता वाढवली. मात्र, सातत्याने बदलणाऱ्या धोरणांमुळे हे क्षेत्र अपेक्षेप्रमाणे वाढू शकले नाही. आता मात्र परिस्थिती वेगळी आहे. 'मेक इन इंडिया', 'आत्मनिर्भर भारत', 'ग्रीन ट्रान्झिशन' या सर्व धोरणात्मक उपक्रमांनी, पेट्रोकेमिकल क्षेत्राला नव्याने चालना दिली आहे. भारत एका निर्णायक वळणावर उभा असून, चीननंतर आशियातील सर्वांत मोठा उपभोक्ता आणि उत्पादक बनण्याची क्षमता भारतात आहे. या गुंतवणुकीचा प्रभावीपणे वापर झाला, तर गुजरात, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, ओडिशा यांसारखी राज्ये जागतिक नकाशावर 'पेट्रोकेमिकल' हब म्हणून उदयास येतील. स्वयंपूर्णता, निर्यात, रोजगार, तंत्रज्ञान व शाश्वत विकास या सर्वांचा संगमच या गुंतवणुकीतून साधला जाणार आहे. तथापि, हे स्वप्न साकार करण्यासाठी धोरणातील सातत्य, तांत्रिक प्रगती आणि पर्यावरणपूरक दृष्टी अत्यंत आवश्यक आहे. पेट्रोकेमिकल क्षेत्रातील हा प्रवास भारताला आर्थिक महासत्ता बनवणार आहे असे नाही, तर जागतिक पुरवठा साखळीत तो एक महत्त्वाचा देश म्हणून उदयास येणार आहे.

---

**जंगलातील हत्यार घेतलेले नक्षलवादी आणि त्या नक्षलवाद्यांनी शस्त्र कुणाविरोधात कुठे कधी वापरावे याचे नियोजन करणारे, त्या नक्षलवाद्यांना सर्वस्तराचे समर्थन मिळवून देणारे शहरी नक्षलवादीही या देशाचे शत्रूच. युद्धात झालेल्या मनुष्यहानीपेक्षा नक्षलवाद्यांनी केलेली मनुष्यहत्या गंभीर आहे. मात्र, केंद्र सरकारच्या विशेष कारवाईमुळे आणि राज्याच्या विशेष समन्वयामुळे, ठिकठिकाणी नक्षली आत्मसमर्पण करत आहेत. त्या अनुषंगाने नक्षलग्रस्त परिसर आणि तेथील वास्तवाचा घेतलेला मागोवा...**



# नक्षलवाद मोजतोय शेवटची घटिका!

विशेष

**भागवत सोनवणे**

देश पोखरणाऱ्या या नक्षलवादाबद्दल गृहमंत्री अमित शाह म्हणाले होते की, 'मोदी सरकारचे लक्ष्य आहे की, भारतात मार्च २०२६ सालापर्यंत नक्षलवाद पूर्णपणे संपवून टाकायचा आहे.' सध्या या लक्ष्यपूर्तीजवळ मोदी सरकार आल्याचे दिसत आहे. नक्षलवाद संपवण्याच्या दिशेने वाटचाल होते आहे. छत्तीसगढ आणि झारखंड या राज्यात नक्षलग्रस्त जिल्हे आणि काही परिसर नक्षलग्रस्त आहे. मात्र, नुकत्याच जाहीर झालेल्या माहितीनुसार नक्षलग्रस्त असलेल्या प्रमुख १२ जिल्ह्यांची संख्या घटून, ती आता सहावर आली आहे. केंद्र सरकारच्या पुढाकारामुळे नक्षलवादी आता हत्यार फेकून, पुन्हा सर्वसामान्य जीवन जगण्यस उत्सुक असल्याचे आश्वासक चित्र दिसते आहे. याचे उत्तम उदाहरण म्हणजे झारखंड राज्य. त्यासाठी आजकालच्याच घटना पाहा.

सुरक्षा दलाने झारखंडच्या जंगलातील नक्षलवाद्यांचा विस्फोटकांचा साठा जप्त केला. बोकारो जिल्ह्यात सुरक्षा कारवाईत आठ नक्षलवादी मारले गेले, त्यातील एकावर एक कोटीचे बक्षीसही होते. तसेच, झारखंडमध्ये या वर्षाच्या मध्यापर्यंत १५ मोस्ट वॉटेंड नक्षलवादी आणि इतर १२ नक्षलवाद्यांचाही खात्मा करण्यात आला. दि. १५ सप्टेंबर रोजी 'नक्षली सेंट्रल कमेटी'चा सदस्य सहदेव सोरेन हा चकमकीत मारला गेला. छत्तीसगढ, झारखंड आणि तेलंगणमध्ये नक्षलवाद शेवटची घटिका मोजत आहे. पण, हे कसे शय झाले? तर याचे श्रेय जाते केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी परस्पदर सहकार्याने केलेल्या कारवाईला. मुळात गावखेड्यातील युवक-युवती नक्षलवादाकडे का वळतात? नक्षलवाद्यांच्या जाळ्यात ते कसे अडकतात? तर मुख्य कारण आहे, त्यांच्यापर्यंत कायदा, सुव्यवस्था शिक्षण न पोहोचणे. गावखेड्यातील युवक अज्ञानी निरक्षर राहावा, त्याला बाहेरच्या जगाचे काही ज्ञान मिळूच नये, यासाठी नक्षली आणि शहरी नक्षली सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यामुळेच गावात रस्ता, वीज, शाळा, रुग्णालय किंवा इतरही सुविधांच्या निर्माणाला नक्षली विरोध करतात. त्यासाठी भावनिक असा जलजंगल जमीनचा नारा देतात.

आमच्या जमिनीवर सरकारी कोणतीही वास्तू उभी राहणार नाही, असा अपप्रचार स्थानिक आदिवासींमध्ये करतात. या सगळ्या योजना कार्यन्वित करण्यासाठी जमीन तर हवी असते. त्याशिवात कार्यालय किंवा सेवा प्रकल्प उभे कसे राहणार? पण, गावात कुणीही यासाठी जमीन द्यायला तयार होत नाही. कारण, त्यांना सांगितलेले असते की, तुम्ही तर जंगलात राहता. हे बाबूलोक तर आता येतील आणि त्यांचे काम करून जातील. पण, एकदा की तुमच्या जागेवर त्यांनी शाळा, रुग्णालय आणि काहीही सेवेच्या नावाने बांधले, तर तुमची जमीन हातची जाईल. तुम्ही न्याय कुठे मागाल? शहरात बाबू लोकांना कुठे शोधाल. जंगलातला आदिवास्यांचा त्यांची जमीन, जंगल आणि नद्यांवर अतोनात जीव असतो. इतके वर्षे आपण शाळा, रुग्णालय आणि इतर सुविधांशिवाय जगतच आलो ना? काय बिघडलं. कशाला पाहिजे सुविधा? त्यामुळे आम्हाला सरकारी शाळापण नको आणि काहीच नको, असे लोक म्हणतात. मात्र, लोकांवर प्रकल्पांना विरोध करण्यासाठी दडपण आणणारे असतात, ते नक्षली आणि त्यांचे समर्थक. बरं कुणी या प्रकल्पांचे समर्थन केले, तर लागलीच त्यांची सरकारचा किंवा पोलिसांचा खबरी ठरवून हत्या केली जाते. ही हत्याही इतकी क्रूर आणि जाहीरपणे केली जाते की, इतर गाववाल्यांवर त्यातून धाक निर्माण झाला पाहिजे. या दहशतीच्या जोरावरच आजवर नक्षलवाद पोसला आणि फोफावलाही. मात्र, २०१४ साली केंद्रात भाजप सरकार आले आणि नक्षलवादाला घरघर लागणे सुरू झाले. सरकारने सगळ्यात पहिले काय केले असेल तर जनतेला दिलासा दिला की, तुम्ही घाबरू नका. राज्य संविधानाचे असून, कायदा- सुव्यवस्था तुमच्यासोबत आहे, असा विश्वास जनतेच्या मनात निर्माण करन्यात सरकार यशस्वी ठरले. छत्तीसगढच्या दंतेवाडामध्ये नक्षलवाद्यांचे समांतर सरकार चालते की काय, असेच दृश्य.

२०१४ सालानंतर याला आळा बसला तसेच, आताची युवापिढीही आम्हाला साथ देते आहे. असेच २०१८ साली झारखंडच्या खुंटीमध्ये गेले होते. तिथे तर नक्षलवाद्यांनी एकही सरकारी प्रकल्प येऊ नये, यासाठी हिंसेचा कडेलोट केला होता. गाव आमचे आहे, आम्ही मूळनिवासी आहोत. गावावर सरकारचे नाही, तर आमचे राज्य चालेल असे नक्षलवाद्यांनी गावातल्या लोकांना भडकावले होते. एकदा पोलीस कमिशनर खुंटीच्या एका गावात गेले असता, त्यांनाही नक्षलवाद्यांनी बंदी बनवले होते. पण, या परिस्थितीवर मात करण्यासाठी केंद्र सरकारने विशेष नियोजन केले. प्रत्येक गावात पोलीस चौकी उभारण्याचे ठरवण्यात आले. अर्थात पोलीस चौकी उभारण्यासाठी ती बांधावी लागेलच पण, ती बांधणार कोण? नक्षलवाद्यांच्या भीतीने पोलीस चौकीचे बांधकाम करायला कुणीही पुढे येणार नाही. बाहेरून माणसं आणली, तरी त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न आलाच. पण, या सगळ्यावर सरकारने मार्ग काढला. कडेकोट बंदोबस्तात गरजेच्या ठिकाणी पोलीस चौक्या उभ्या राहिल्या होत्या.

केंद्र सरकारने राज्य सरकारशी समन्वय साधत झारखंड, छत्तीसगढ आणि तेलंगणसह महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूरमध्येही जागोजागी मोबाईलचे टॉवर अशाच सुरक्षितेत बांधले. या जंगल परिसरात दुसरे काही मिळो ना मिळो; पण मोबाईलची रेंज मिळतेच मिळते. हे किती महत्त्वाचे आहे, हे तिथे जाणारे लोकच समजू शकतात. त्यामुळे लोक पोलिसांशी मोबाईलवर संपर्क साधू लागली. असो! देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात की, काँग्रेसचे राज्य असताना नक्षल प्रभावित भागाचा आर्थिक, सामाजिक आणि इतरही विकास झाला नाही. आदिवासी लोकवस्तीकडे पायाभूत सुविधा, आरोग्य-शिक्षण यांमध्येही अक्षम्य दुर्लक्ष झाले. त्यामुळेच नक्षलवादाचे फावले. जिथे विकास झाला नाही, तिथे नक्षलवाद वाढला. पंतप्रधान मोदींचे म्हणणे वास्तवदर्शीचे म्हणायला हवे. म्हणूनच सरकारने नक्षलग्रस्त म्हणून चिन्हित केलेल्या परिसरात, विशेष कार्यवाही सुरू केली. यामध्ये 'ऑपरेशन प्रहार', 'ऑपरेशन हंटडाऊन' अशा कारवायांचा समावेश आहे. सध्याही नक्षलवादी परिसरात सुरक्षा दलांच्या समन्वयाने सतत ऑपरेशन्स चालवली जात आहेत.

दुसरीकडे परिसराचा विकास करण्यासाठी तातडीचे नियोजन तसेच परिसरात पायाभूत सुविधा उपलब्ध होतील, याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. सर्वाधिक नक्षल प्रभावित जिल्ह्यांना केंद्र सरकारकडून विशेष निधी दिला जातो. त्यातून रस्ते, पिण्याचे पाणी, वीज, मोबाईल टॉवर, बँक शाखा, पोस्ट ऑफिस, आरोग्य व शिक्षण यांवर खर्च केला जातो. नक्षलवाद्यांनी शस्त्र टाकावे आणि सामान्य नागरिकासारखे जीवन जगावे, यासाठी सरकारने विविध योजना सुरू केल्या आहेत. आत्मसमर्पण करणार्या नक्षलवाद्यांना आर्थिक मदत, घर आणि नोकरीसाठी प्रशिक्षण दिले जाते. त्यांनी पुन्हा मूळ प्रवाहात यावे यासाठी त्यांच्या आवडीनुसार प्रशिक्षण दिले जाते. आता ग्रामीण भागातल्या किंवा दुर्गम जंगलातील बांधवांना नक्षलवादी भीती घालू शकत नाहीत, अफवा पसरवू शकत नाहीत.

नक्षलवाद्यांनी ग्रासलेला परिसर आता विकासाच्या आणि राष्ट्रहिताच्या कक्षेत येत असून, पूर्वीचे नक्षलग्रस्त जिल्हे प्रगतिशील म्हणून त्यांची नवी ओळख निर्माण करत आहेत. एकूणच काय तर, नक्षलवाद शेवटची घटिका मोजत आहे.

---

## वाहून गेली माती

दयाघना रे, आता काही
नाही उरले हाती,
किती बरसला शेतामधली,
वाहून गेली माती.
सोन्यासम हे शिवार माझे
घामाने सिंचले,
मोत्यासम ते बीज पेरले
कष्टाने जोपासले,

पाऊस आला पुन्हा पुन्हा तो
मग मन चिंतावले
पुन्हा पुन्हा बरसून उगवतो
सूड असे वाटले.
अरे थांब ना आता जरासा
उसंत थोडी मिळू दे,

जोपासाया रोपे इवली
ऊन जरासे मिळू दे.
दिवस उलटले गेले महिने
पूर वाहू लागले
गावे, रस्ते,नाले, ओहळ
पाण्याने ओसंडले.
वाहून गेली घरे, माणसे
गुरे आणि पाखरे

होई कृपाळू रे आता तरी
थांबव तांडव सारे.
कष्टकऱ्यांची आक्रोशाने
फाटून जाईल छाती,
वाहून गेली माती
काही नाही उरले हाती.

**अमोल तपासे**

## वनवास

इतुकाच तुझा माझा प्रवास आहे...
बाकी भोवती नुसताच अभास आहे...
विश्वासाची हिरवळ ऐन सुकून गेली पावसात
नि नाही आता कुणावरही विश्वास आहे...
हर्ष पहिल्या भेटीचा नि फुलांची ती पखरण
गंध ना आता प्रीतीच्या अत्तरास आहे...

मी पूजत बसलो श्रद्धेने पाषाण मनोभावे
पण किंमत कुठे माणसाची दगडास आहे...
नको चांदणे चमचमते मज समभ्रतेचे विषारी
निराशेचा तो केवळ सुंदर भास आहे...
ना आनंद ना उत्सव ना येईल आता बहर
पुढे फक्त आठवणींचा वनवास आहे...

**सुनील खोडके**